# देवाचे वचन चमत्कारिक बीज



देवाच्या वचनाद्वारे त्याच्या अलौकिक सामर्थ्याचा अनुभव घेणे

आशीष रायचूर

**विनामूल्य वाटपासाठी**
ऑल पीपल्स चर्च एंड वर्ल्ड आउटरीच, बैंगलोर, भारतद्वारे निर्मित आणि वितरित।
वर्तमान आवृत्ती: 2026

**संपर्क सूचना**

All Peoples Church & World Outreach,
# 319, 2nd Floor, 7th Main, HRBR Layout,
2nd Block, Kalyan Nagar, Bangalore 560 043
Karnataka, INDIA

Phone: +91-80-25452617
Email: **bookrequest@apcwo.org**
Website: **apcwo.org**

अन्यथा सूचित केले नसल्यास, पवित्र शास्त्रातील सर्व संदर्भ द बायबल सोसायटी ऑफ इंडिया (BSI) द्वारे प्रकाशित पवित्र बायबल, बीएसआय - मराठी - ओ.व्ही मधून उद्‌त करण्यात आले आहेत. परवानगीने. सर्व हक्क राखीव.

**आर्थिक भागिदारी**

या पुस्तकाचे विनामूल्य वितरण ऑल पीपल्स चर्चचे सदस्य, सहभागी आणि मित्रांच्या आर्थिक मदतीमुळे शक्य झाले आहे. जर आपण या विनामूल्य प्रकाशनाद्वारे आशीर्वाद प्राप्त केला असेल, तर आम्ही आपणास ऑल पीपल्स चर्चच्या विनामूल्य प्रकाशनांच्या मुद्रणासाठी तसेच वितरणासाठी आर्थिक अंशदान देण्यासाठी आमंत्रित करतो. कृपया **apcwo.org/give** वर जावे अथवा आपले दान कसे द्यावे हे पाहण्यासाठी या पुस्तकाच्या मागे “ऑल पीपल्स चर्चसोबत भागिदारी” हे पृष्ठ पाहावे. धन्यवाद!

**मुफ़्त संसाधन आणि संबंधित माहिती**

**संदेश:** apcwo.org/sermons | **पुस्तके:** apcwo.org/books | **चर्च ॲप:** apcwo.org/app
**बायबल कॉलेज:** apcbiblecollege.org | **ई-लर्निंग:** apcbiblecollege.org/elearn
**सल्ला:** chrysalislife.org | **संगीत:** apcmusic.org
**मिनिस्टर्स फेलोशिप:** pamfi.org | **एपीसी वर्ल्ड मिषन:** apcworldmissions.org
**विश्वासणाऱ्यांसाठी पवित्रशास्त्र टीकासंग्रह:** believersbiblecommentary.com

(Marathi—God’s Word—the Miracle Seed)

# देवाचे वचन चमत्कारिक बीज

देवाच्या वचनाद्वारे त्याच्या अलौकिक सामर्थ्याचा अनुभव घेणे

# अनुक्रमणिका


परिचय

1. देवाचे वचन: आपल्या विश्वासाचा पाया 1

2. देवाचे वचन: त्याची पवित्रता आणि सामर्थ्य 9

3. देवाचे वचन: चमत्कारी बीज 20

4. बीज हे देवाचे वचन आहे 24

5. बीज हृदयातच पेरले गेले पाहिजे 30

6. देवाच्या वचनावर मनन करणे 36

7. बीजाचे रक्षण आणि संगोपन केलेच पाहिजे 62

8. प्रकटीकरण: आध्यात्मिक समज प्राप्त करणे 67

9. कापणीस अडखळण आणणारे: वचनास विरोध 72

10. कापणीस अडखळण आणणारे: वचनाची वाढ खुंटविणारें 75

11. तीन किल्ल्या: समजणे, स्वीकारणे, राखणे 78

12. वचनाची बीजे 84

# परिचय

आपल्या सर्वांनाच आपल्या जीवनात देवाचे कार्य अनुभवण्याची इच्छा असते. व्यक्तिगतरित्या तसेच इतरांना तारण देण्यासाठी, आरोग्य प्रदान करण्यासाठी, मुक्त करण्यासाठी आणि चमत्कार घडवून आणण्यासाठी आपण देवाच्या सामर्थ्याची इच्छा धरतो. बऱ्याचदा, आपण देवाच्या सामर्थ्याचे एक नेत्रदीपक प्रदर्शन अपेक्षित करतो, जे आपल्याला "थक्क" करून टाकेल. हे खरे आहे की देव, त्याच्या पवित्र आत्म्याच्या सामर्थ्याद्वारे चिन्हे आणि कृत्यांद्वारे अद्‌तरित्या त्याचे कार्य प्रगट करतो, तरीही आपण हे विसरता कामा नये की देव त्याच्या वचनाद्वारे देखील कार्य करतो. देवाचा आत्मा देवाच्या वचनाद्वारे त्याचे सामर्थ्य मुक्त करतो. देवाचे वचन वाचण्याची, त्यावर मनन करण्याची आणि ते आमच्या जीवनात ग्रहण करण्याची प्रक्रिया जरी अद्‌त नसली तरी ती कमी अलौकिक नसते कारण यात कार्य करणारा परमेश्वर आहे. अनेक विश्वासणारे देवाच्या अलौकिक कार्याचा अनुभव घेण्यापासून वंचित राहतात कारण देव आपल्या वचनाद्वारे त्यांच्या दैनंदिन जीवनात ते प्रकट करण्याची इच्छा बाळगतो; पण ते चमत्कारांच्या मागे धावतात.

आणखी एक सामान्य समस्या अशी आहे की, अनेक विश्वासणारे देवाचे सामर्थ्य त्यांच्यासाठी कार्यकारी होण्यासाठी देवाच्या अभिषिक्त पुरुषाकडे किंवा स्त्रीकडे पाहतात. देवाने आपल्या आत्म्याच्या सामर्थ्याने लोकांची सेवा करणारे सेवक नेमले असले, तरी अखेरीस प्रत्येक विश्वासणाऱ्याने अशा ठिकाणी पोहोचले पाहिजे जेथे ते देवाच्या वचनाद्वारे आणि त्याच्या सामर्थ्याद्वारे देवाकडून प्राप्त करण्यास शिकतील. येशूने आपल्या सर्वांना थेट त्याच्याकडे येण्याचे, त्याच्याकडून खाण्याचे आणि पिण्याचे आमंत्रण दिले जेणेकरून आपल्यापैकी प्रत्येकजण त्याच्या कृपेचे इतरांना वाटप करू आणि त्यांना येशूकडे

आणू शकू जेणेकरून ते देखील त्याच्याद्वारे खाऊ पिऊ शकतील. आपण मध्यस्थांवर अवलंबून राहू नये.

आम्हास माहीत आहे की देव त्याच्या वचनाद्वारे कार्य करतो. अशा प्रकारे त्याने सर्व काही निर्माण केले—आपल्या वचनाद्वारे प्रकट झालेल्या त्याच्या सामर्थ्याने. देवाचे वचन, देवाच्या जीवनाचे आणि सामर्थ्याचे वाहक आहे जे आमच्या जीवनाच्या प्रत्येक पैलूवर प्रभाव पाडू शकते. देवाने आपल्याला त्याचे वचन दिले आहे आणि त्याच्या वचनाच्या सामर्थ्याद्वारे तो आपल्यामध्ये कार्य करू इच्छितो. त्याने आमच्यावर प्रगट केले आहे की त्याचे वचन कसे ग्रहण करावे यासाठी की त्याच्या वचनात समाविष्ट जीवन आणि सामर्थ्य आमच्यामध्ये प्रकट केले जावे ज्याद्वारे आमच्याठायी त्याचे अलौकिक कार्य घडून यावे.

देवाच्या वचनावर मनन ही अशी प्रक्रिया आहे ज्याद्वारे वचन आमच्या हृदयांत रोवले जाते. देवाच्या वचनावर मनन करण्यात चिंतन, दृश्यांकन आणि कबूल करणे या गोष्टींचा समावेश होतो. तुम्हाला देवाच्या वचनावर मनन करण्याचा सराव कसा करावा हे शिकाल, जेणेकरून देवाच्या वचनाचे चमत्कारी बीज तुमच्या जीवनात फळ देऊ शकेल. हे पुस्तक अशी साधी सत्ये प्रगट करते जी आम्हास त्याच्या वचनाच्या चमत्कारिक बीजाद्वारे आमच्याठायी मुक्त केलेले अलौकिक सामर्थ्य स्वीकारण्यास आणि अनुभवण्यास मदत करतील.

परमेश्वर तुम्हाला आशीर्वादित करो!
आशीष रायचूर

# 1
# देवाचे वचन: आपल्या विश्वासाचा पाया

आमच्या ख्रिस्ती जीवनाच्या वाटचालीत एक महत्वपूर्ण तत्व आहे, जे इतके अत्यावश्यक आहे की ते आमच्या संपूर्ण ख्रिस्ती अनुभवाची गुणवत्ता ठरवते. ते म्हणजे देवाचे वचन. आमच्या परिपक्कतेची पातळी ज्यात आमची वाढ होते आणि देवाठायी आपण किती खोल जातो, ते आम्ही आमच्या जीवनांत त्याच्या वचनाला किती स्थान देतो त्यावरून ठरवले जाते. आपण विजयात वाटचाल करीत आहोत किंवा नाही आणि आपण किती प्रमाणात आशीर्वादांचा अनुभव करीत आहोत हे आपण देवाचे वचन किती प्रमाणात ग्रहण करतो आणि आमच्या दैनंदिन जीवनात किती सुसंगतपणे आचरणात आणतो यावर मोठा प्रभाव पाडणारे आहे.

तथापि, आजचे जग, जे "चमत्कार पाहण्यावर" भर देते जेथे दर्शनीय गोष्टींचा पाठपुरावा केला जातो, तेथे एका "प्राचीन पुस्तकाच्या" आशयाकडे लक्ष देण्यास जास्त लोक तयार नसतात. काही जण सामाजिक, सांस्कृतिक आणि नैतिकदृष्ट्या असंबद्ध असल्याचा दावा करणाऱ्या धार्मिक पुस्तकातील शब्दांचा उलगडा करण्यात कोणी वेळ का घालवेल? आणि दुर्दैवाने, विश्वासणाऱ्यांमध्येही, "शांत वेळ" घालवण्याच्या कर्तव्याची पूर्तता करण्याव्यतिरिक्त, असे फार कमी लोक आहेत ज्यांना लिखित शास्त्रवचनांचा एखाद्याच्या जीवनावर किती खोलवर परिणाम आणि प्रभाव पडू शकतो याची समज मिळाली आहे. हे खरे आहे की सुरुवातीला, शास्त्रवचन निर्जीव वाटू शकते, कदाचित, सामान्य वाचकासाठी ते कंटाळवाणे देखील वाटतील. परंतु ज्यांना त्या वचनाच्या अंतर्भूत सामर्थ्याची आणि देवाने स्वतः त्याच्या लोकांच्या जीवनात त्याच्या वचनाला कोणते स्थान दिले आहे याची

समज मिळाली आहे, त्यांच्यासाठी वचन जिवंत आहे! त्यांच्यासाठी, वचन हे सामर्थ्य, सांत्वन, आशा, विश्वास, मार्गदर्शन आणि ज्ञानाचा स्रोत आहे. त्यांनी त्यांचे संपूर्ण वर्तमान आणि भविष्य शास्त्रवचन जे सांगते त्यावर आधारित ठेवले आहे. जीवनातील वादळांच्या गर्तेतही, त्यांना ठाऊक असते की 'वचन'च त्यांना आधार देईल आणि सावरून धरेल. आजारपणातही, त्यांना खात्री असते की 'वचन'च त्यांच्यासाठी आरोग्य आणि सुटका घेऊन येईल. आव्हानांस आणि दबावांस तोंड देत असतांना, ते वचन जे अभिवचन देते त्यावर विश्वास ठेवतात. वचनात दिसणाऱ्या शक्यतांमुळे ते अशक्य गोष्टींवर हसू शकतात. जरी ते पाहू शकत नाहीत, स्पर्श करू शकत नाहीत, ऐकू शकत नाहीत, वास घेऊ शकत नाहीत किंवा चव घेऊ शकत नाहीत, तरीही ते जाणतात कारण वचनाने त्यांच्यात एक आत्मविश्वास आणि एक मजबूत, अढळ विश्वास निर्माण केला आहे.

आमची मनापासून इच्छा आहे की हे पुस्तक वाचणाऱ्या प्रत्येकाला प्रभूसोबतच्या त्यांच्या वाटचालीत दृढ आश्वासन प्राप्त व्हावे. जर तुम्ही वचनात आधीच काही प्रमाणात समज प्राप्त केली असेल, तर आमची इच्छा आहे की तुम्ही आणखी बळकट व्हाल आणि प्रोत्साहन प्राप्त कराल.

## सार्वकालिक वचन, देहधारी वचन, लिखित वचन

**लूक 24:27**

**मग त्याने मोशे व सर्व संदेष्टे ह्यांच्यापासून आरंभ करून संपूर्ण शास्त्रलेखांतील आपणाविषयीच्या गोष्टींचा अर्थ त्यांना सांगितला.**

येशू, देवाचा पुत्र, सनातन वचन (योहान 1:1-4), जो देहधारी वचन बनला (योहान 1:14) लिखित वचनानुसार—म्हणजेच पवित्र शास्त्रानुसार—जीवन जगले, त्याचाच उपदेश केला आणि तेच शिकवले. लहानपणापासूनच, येशू शास्त्रवचनांचा अभ्यास करण्यात आणि शिक्षणात गुंतला होता (लूक 2:46). त्याने लिखित वचनाचा वापर करून परीक्षांना तोंड दिले (मत्तय 4:1-10). देहधारी शब्द

(वचन) आत्म्याने अभिषिक्त झाला आणि शास्त्रवचन पूर्ण करण्याच्या रीतीने तो चालला. (लूक 4:21; मार्क 14:49; लूक 24:44). हा एक अद्‌त विचार नाही का-सनातन वचन किंवा शब्द, देव जो देहधारी झाला-तो लिखित शब्दाशी इतक्या आदराने वागला. आपण आणखी किती करावे?

## गाजवलेल्या वार्तेच्या मूर्खपणाच्या योगे

**1 करिंथ 1:21**

**कारण जग देवाच्या ज्ञानाने वेष्टित असताही त्याला आपल्या ज्ञानाच्या योगाने देवाला ओळखता आले नाही, तेव्हा गाजवलेल्या वार्तेच्या मूर्खपणाच्या योगे विश्वास ठेवणाऱ्या लोकांचे तारण करणे देवाला बरे वाटले.**

देवाने, त्याच्या ज्ञानाने, हे ठरविले आहे की मनुष्याच्या जीवनाचे सार्वकालिक भवितव्य साध्या सुवार्तेच्या संदेशाच्या गाजवण्याद्वारे निश्चित होईल. यावर विचार करा! देवाने सर्व मानवांना ख्रिस्ताची सुवार्ता, जी *"तारणासाठी देवाचे सामर्थ्य आहे"* (रोमकरांस पत्र 1:16) पोहोचवण्यासाठी देवदूतांच्या सैन्याची निवड केली नाही. त्याऐवजी, जवळजवळ "मूर्खपणे" वार्ता गाजवण्याद्वारे, जे त्याने मर्त्य, चूक करणाऱ्या पात्रांद्वारे करण्याचे ठरवले आहे, त्याने हरवलेल्यांना जिंकण्याचे निवडले आहे. म्हणून, सुवार्तेचा प्रचार करणे किंवा ते इतरांपर्यंत पोहोचवणे अतिशय महत्वाचे आहे. प्रेषित पौलाने स्पष्ट केल्याप्रमाणे, काही जण संदेश आणि त्याचा प्रचार दोन्ही मूर्खपणा मानतील, परंतु ज्यांना पाचारण करण्यात आले आहे त्यांच्यासाठी, संदेश आणि त्याचा प्रचार ख्रिस्ताला प्रकट करतो, जो देवाचे सामर्थ्य आणि ज्ञान आहे (1 करिंथ 1:24). त्याचप्रमाणे, देवाने लिखित शास्त्रवचनास एक साधन म्हणून ठरवले आहे ज्याद्वारे देवाचे सामर्थ्य आणि ज्ञान आपल्या जीवनात आणले जाते. आपण ज्या पुस्तकास "बायबल" म्हणतो त्या पुस्तकाच्या पानांवर कोरलेल्या शब्दांद्वारे आपल्या जीवनात दैवी सामर्थ्य आणि ज्ञानाचे संक्रमण होते हे एक रहस्य वाटते. सामान्य शब्द, ज्यांचा आपण आपल्या दैनंदिन जीवनात उपयोग

करतो, ते बायबलमध्ये छापले गेले आहेत म्हणून त्यांस अचानक दैवी मूल्य कसे प्राप्त होऊ शकते? हे शब्द स्वतः जरी सामान्य असले, तरी त्यांनी मांडलेली सत्ये मात्र दिव्य आहेत. शब्द एकत्र करणारा माणूस होता, तर सादर केलेल्या सत्याला प्रेरणा देणारा देव होता. आणि पवित्र शास्त्रातील वचनांद्वारे व्यक्त केलेली सत्ये समजून घेऊन आणि स्वीकारून आपण त्यात प्रवेश करतो आणि देवाच्या ज्ञानाचा आणि सामर्थ्याचा अनुभव घेतो.

## प्रत्येक शास्त्रलेख "परमेश्वरप्रेरित" आहे

**2 तीमथ्य 3:15,16**

**15 त्या कोणापासून शिकलास हे, आणि बालपणापासूनच तुला पवित्र शास्त्राची माहिती आहे हे तुला ठाऊक आहे; ते ख्रिस्त येशूमधील विश्वासाच्या द्वारे तुला तारणासाठी ज्ञानी करायला समर्थ आहे.**

**16 प्रत्येक परमेश्वरप्रेरित शास्त्रलेख सद्बोध, दोष दाखवणे, सुधारणूक, नीतिशिक्षण ह्यांकरता उपयोगी आहे,**

जेव्हा प्रेषित पौलाने "शास्त्रलेखाचा" उल्लेख केला तेव्हा ते लिखित शास्त्रवचनांबद्दल बोलत होते. ते लिखित शास्त्रलेखनास दैवी लेखकत्वाचे श्रेय देतात जेव्हा ते म्हणतात, *"प्रत्येक शास्त्रलेख परमेश्वरप्रेरित"* आहे (2 तीमथ्य 3:16). जरी माणसाने शब्द लिहिले असले तरी, देव संदेशाचा स्रोत आणि प्रेरणा होते. प्रेषित पेत्र हे थोड्या वेगळ्या पद्धतीने मांडतो जेव्हा तो म्हणतो, *"प्रथम हे ध्यानात ठेवा की, शास्त्रातील कोणत्याही संदेशाचा उलगडा कोणाला स्वतःच्या कल्पनेने होत नाही; कारण संदेश मनुष्यांच्या इच्छेने कधी आलेला नाही; तर पवित्र आत्म्याने प्रेरित झालेल्या पवित्र मनुष्यांनी देवापासून आलेला संदेश सांगितला आहे"* (2 पेत्र 1:20,21). सर्व शास्त्रवचने भविष्यसूचक आहेत कारण ती देवाच्या आत्म्याच्या प्रेरणेने जन्माला आली आहेत. लिखित शास्त्रवचन परमेश्वरप्रेरित आहे. ही वस्तुस्थिती तुमच्या अस्तित्वाच्या अगदी गाभ्यापर्यंत मनापासून स्वीकारल्यास, शास्त्रवचनांबद्दलचा तुमचा दृष्टिकोन पूर्णपणे बदलू शकतो. जर तुमचा

खरोखरच असा विश्वास असेल की, सर्व शास्त्रवचने देवाकडून प्रेरित आहेत, तर तुम्ही तुमच्या जीवनात देवाच्या वचनाला उच्च प्राधान्य द्याल. तुम्ही तुमचे पवित्र शास्त्र उघडाल आणि तुम्हाला हे कळून येईल की या विश्वाचा परमेश्वर देव त्याचे विचार तुमच्यापर्यंत पोहोचवत आहे. त्याच्या अमर्याद ज्ञानातून, त्याने पृथ्वीवरील आपल्या जीवनासाठी आवश्यक आणि पुरेसे वाटणाऱ्या गोष्टींचे विश्लेषण करण्याचे निवडले आहे आणि त्यांना पवित्र शास्त्राच्या पानांवर ठेवले आहे. शास्त्रवचनांमध्ये सद्बोध, दोष दाखवणे, सुधारणूक, नीतिशिक्षण दिले आहे.

## शास्त्रलेख-देवाकडे पाहण्याची आपली खिडकी

**स्तोत्रसंहिता 119:18**

***तू माझे नेत्र उघड, म्हणजे तुझ्या नियमशास्त्रातील अद्‍भुत गोष्टी माझ्या दृष्टीस पडतील.***

पवित्र शास्त्र आपल्याला जिवंत देवाबद्दल अंतर्दृष्टी प्रदान करते. ते देवाचे स्वरूप, चारित्र्य, गुण आणि हृदय प्रकट करतात. पवित्र शास्त्राच्या पानांमध्ये, आपल्याला देव कोण आहे, तो काय करतो, त्याच्या भावना आणि त्याच्या इच्छा याबद्दल अंर्तज्ञान मिळते. परिणामतः, शास्त्रवचनांद्वारेच आपण देवाला ओळखतो आणि त्याद्वारे, त्याच्याशी वैयक्तिक नाते निर्माण करतो. नाते हे ज्ञानावर आधारित असते. जेथे वैयक्तिक ज्ञान नसते, तिथे नाते असू शकत नाही. शिवाय, ज्ञानाची खोली किंवा आत्मीयता किती आहे यावर नातेसंबंधाची खोली अवलंबून असते. म्हणूनच, जिवंत देवाशी सखोल आणि निकटचा संबंध प्रस्थापित करण्यासाठी, पवित्र शास्त्रामध्ये ज्याप्रमाणे त्याचे प्रकटीकरण झाले आहे, त्याप्रमाणे त्याला अत्यंत जवळून ओळखणे आवश्यक आहे. पवित्र शास्त्राची पाने उघडणे अत्यंत रोमांचक असते; कारण ती म्हणजे देवाकडे पाहणारी आपली खिडकीच आहेत. जेव्हा देव आपले डोळे उघडतो आणि आपण वाचलेल्या ओळींच्या “मागील” गोष्टी पाहू लागतो, तेव्हा आपल्याला देवाचे वैभव, त्याची महानता आणि त्याचा गौरव समजू

लागतो. देवाबद्दलची आपली समज इतर कोणत्याही गोष्टीवर आधारित करणे—मग ते आपले अनुभव असोत, इतरांची मते असोत इत्यादी—नेहमीच अचूक असू शकत नाही. हे खरे आहे की देव स्वतःला इतर ठिकाणी देखील प्रकट करतो, उदाहरणार्थ, त्याच्या सृष्टीमध्ये. तथापि, इतर स्त्रोतांकडून आपल्याला जी काही माहिती मिळते ती प्रथम लिखित शास्त्रांच्या प्रकाशात तपासली पाहिजे.

## पवित्र शास्त्रवचने-आमचे प्रमाण, आमचा आदर्श

**स्तोत्रसंहिता 119:133**

**तुझ्या वचनाच्या द्वारे माझी पावले स्थिर कर, आणि कसल्याही दुष्टाईची सत्ता माझ्यावर चालू देऊ नकोस.**

आजच्या जगात लोकांकडे काय बरोबर आणि काय चूक याचे ठोस मानक नसते, पण आपण देवाच्या वचनाला आपले मानक बनवण्याचा निर्णय घेतो. जीवनाच्या सर्व बाबतीत शास्त्र जे सांगते ते आपण सत्य मानतो. देवाचे वचन जे योग्य आणि उदात्त म्हणते तेच आपण योग्य आणि उदात्त मानतो. वचन जे चुकीचे म्हणते ते आपणही चुकीचे मानतो. शास्त्रात दिलेल्या नैतिक मापदंडांना आपण "तर्कसंगत" ठरवू शकत नाही, "उदारमतवादी" बनवत नाही किंवा "संदर्भानुसार" (सांस्कृतिकरित्या आणि सामाजिकरित्या प्रासंगिक ठरवत) बदलत नाही. शास्त्रवचनांमध्ये जे सांगितले आहे त्यापेक्षा कमी कोणत्याही गोष्टीवर आपण समाधान मानत नाही.

देवाचे वचन हे आपले मार्गदर्शक आहे. आपण शास्त्रात दिलेल्या शिकवणींनुसार आपले जीवन घडवतो. शास्त्रवचन पती, पत्नी, पालक, मुले, मालक, कर्मचारी, सेवक आणि सर्व विश्वासणाऱ्यांसाठी वर्तणुकीचे आदर्श घालून देतात. आपण पवित्र आत्म्याच्या सामर्थ्याने आपले आचरण, जीवनशैली, मूल्ये, विश्वास आणि ध्येये शास्त्रातील तत्त्वांनुसार करण्यासाठी आटोकाट प्रयत्न करतो. आम्ही आमचे संपूर्ण जीवन त्याच्या वचनानुसार चालवतो.

## शास्त्रलेख-आमचा अधिकार

**स्तोत्रसंहिता 119:101**

**तुझे वचन पाळावे म्हणून मी आपले पाऊल प्रत्येक वाईट मार्गापासून आवरतो.**

आम्ही शास्त्राला आमच्या जीवनातील अंतिम प्रमाण म्हणून मानतो. जरी कोणतीही मानवनिर्मित रचना किंवा कायदा आपल्याला सुधारत नसला तरी, आपण वचनाच्या सुधारणेला अधीन होतो. आपण दुसऱ्याने आपल्या चुका दाखवण्याची वाट पाहत नाही, जरी कधीकधी हे आवश्यक असू शकते. जर आपण स्वतःला अशा गोष्टी करत असल्याचे आढळले ज्या वचनाने चुकीच्या ठरवल्या आहेत, तर आपण वचनाचे पालन करण्यासाठी बदल करण्यास तयार असतो. आपण आपल्या जीवनात शिस्तीचे पालन करण्याची निवड करतो यासाठी की आपल्याला वचनानुसार चालता यावे. देवाच्या वचनाच्या अधीन होणे याचा अर्थ स्वतः देवाच्या अधीन होणे हा आहे. पवित्र शास्त्राच्या उपदेशाविरुद्ध बंड करतो तो देवाविरुद्ध बंड करतो. प्रभू येशूने म्हटले, *"जो माझा अव्हेर करतो व माझ्या वचनांचा स्वीकार करत नाही त्याचा न्याय करणारे कोणी आहे; जे वचन मी सांगितले, तेच शेवटल्या दिवशी त्याचा न्याय करील"* (योहान 12:48). देवाचे वचन हा नियम असेल ज्यानुसार सर्व लोकांचा न्याय केला जाईल.

अशी वेळ आली आहे की देवाच्या लोकांनी देवाच्या लिखित वचनाबद्दल आदरयुक्त भय बाळगले पाहिजे. आपल्या जीवनात त्याच्या वचनाच्या अधिकाराला शरण गेल्याशिवाय, आपण देवाचे अनुयायी होऊ शकत नाही. यासाठी की काही गोष्टी आमच्या शरीरास सुखद वाटतात किंवा आमच्या तर्कबुद्धीस स्वीकारणीय वाटतात म्हणून आपण पवित्र शास्त्राच्या विरोधात असलेल्या गोष्टी करत राहिलो, तर आपण "मजबूत विश्वासणारे" होऊ शकत नाही. विश्वासणारे म्हणून, आपण आपल्या भावना आणि तर्कबुद्धीस वचनाच्या अधीन करायला शिकले पाहिजे. आपण प्रत्येक वाईटापासून दूर राहतो आणि त्याच्या

वचनाशी स्वतःला जुळवून घेतो कारण ते अंतिम अधिकार आहे.

## वचन तुमच्यामध्ये भरपूर राहो

**कलस्सै 3:16**

**ख्रिस्ताचे वचन तुमच्यामध्ये भरपूर राहो; परस्परांना सर्व ज्ञानाने शिकवण द्या व बोध करा; आपल्या अंतःकरणात देवाला स्तोत्रे, गीते व आध्यात्मिक गायने कृपेच्या प्रेरणेने गा.**

देवाचे वचन आमच्या विश्वासाचा पाया आहे. आमच्या आध्यात्मिक वाढीत आणि परिपक्वतेत तो अत्यावश्यक घटक आहे. आम्हाला ख्रिस्तामध्ये राहायचे आहे आणि त्याचे वचन आमच्याठायी राहिले पाहिजे (योहान 15:7). तुम्हास आमची आज्ञा ही आहे की ख्रिस्ताचे वचन तुमच्यामध्ये भरपूर राहो. पवित्र शास्त्रातील वचनांचा शोध, अभ्यास आणि मनन करण्यात बराच वेळ घालवा. तुम्हास अंतर्दृष्टी आणि प्रकटीकरण देण्यासाठी पवित्र आत्म्यास विनंती करा. तुमच्या हृदयात प्रकटीकरण ज्ञानाचा समृद्ध साठा साठवून ठेवा. तुम्ही जे शिकला आहात त्याची वारंवार उजळणी करा. आध्यात्मिक सत्यांची स्वतःला वारंवार आठवण करून द्या ज्यांचा देवाच्या आत्म्याने तुम्हाला समज करून दिला आहे. प्रभूला वैयक्तिक स्तोत्रे, भजन आणि गाणी गाण्यासाठी वचनाचा उपयोग करा. इतर विश्वासणाऱ्यांना वचनाचे शिक्षण द्या आणि त्यांना प्रोत्साहन द्या. तुम्हाला देण्यात आलेले सर्व प्रकटीकरणाचे ज्ञान आचरणात आणा. अशा प्रकारे, तुम्ही एक भक्कम पाया उभाराल ज्यावर तुम्ही तुमचा खिस्ती अनुभव उभारू शकाल.

जो व्यक्ती वचन ऐकतो आणि त्यानुसार वागतो, तो प्रभूच्या म्हणण्यानुसार, एका बुद्धिमान व्यक्तीसारखा आहे ज्याने आपले घर मजबूत पायावर बांधले (मत्तय 7:24,25).

तुम्ही तुमचे जीवन कोणत्या प्रकारच्या पायावर बांधत आहात?

# 2
# देवाचे वचन: त्याची पवित्रता आणि सामर्थ्य

भारतातील मणिपाल येथे कॉलेजच्या चार रोमांचक वर्षांच्या अखेरीस; अनेक अद्‌त गोष्टी घडल्या होत्या. सर्वात महत्त्वाचे म्हणजे देवाने आमच्यापैकी काही तरुण लोकांस-फक्त सर्वसाधारण कॉलेज विद्यार्थ्यांस-एकत्र काम करण्यास आणि विद्यार्थी समुदायामध्ये एक मजबूत खिस्ती सहभागितेत बदलण्यासाठी पाया घालण्याचे सामर्थ्य दिले होते. तो शैक्षणिक वर्षाचा शेवट होता आणि माझे बरेच मित्र घरी गेले होते. यावेळी वसतिगृहे नेहमीपेक्षा अधिक शांत असतील हे जाणून, केवळ प्रभूच्या सान्निध्यात एकांतात काही वेळ घालवण्यासाठीच मी तिथे आणखी काही दिवस थांबण्याचा निर्णय घेतला होता. जरी बरेच काही अज्ञात असले तरीही मला माझ्या भविष्याबद्दल आणि माझ्यासमोर पुढे येणाऱ्या गोष्टींबद्दल प्रार्थना करायची होती. प्रार्थनेच्या या काळात यशया 45:1-3 या वचनाने माझ्या आत्म्यावर खोलवर छाप पाडली. माझ्यासाठी, ही कोनशिला वचने बनली-अशी वचने ज्यांनी माझ्या हृदयात एक विशेष स्थान व्याप्त केले आहे. मला त्यांचा अर्थ आणि ते माझ्या आयुष्यात कशा प्रकारे लागू होतील, हे समजले.

या अभिवचनाचा एक भाग म्हणून, प्रभूने म्हटले की तो आमच्यासमोर जाईल आणि आमच्यासाठी दारे उघडेल आणि हे दरवाजे बंद होणार नाहीत. तेव्हापासून, असे अनेक प्रसंग आले आहेत जेव्हा मला अशक्यतेचा आणि बंद दारांसमोर उभे राहावे लागले आहे.विद्यापीठांमध्ये प्रवेश आणि आर्थिक सहाय्यकपद मिळणे असो, देशांमध्ये व्हिसा मिळणे असो किंवा एखाद्या वैयक्तिक आर्थिक

संकटातून पुन्हा सावरण्याचा असो, आणि इतर अनेक परिस्थितींत, मी या वचनांकडे परत आलो आहे आणि देवासमोर उभा राहून हा अंगीकार केला आहे की त्याने जे वचन दिले आहे ते तो पूर्ण करेल. मी पवित्र शास्त्रातील या वचनांचा उपयोग केला आहे आणि ख्रिस्तामध्ये आपल्याला दिलेल्या अधिकाराने, परिस्थिती आणि परिस्थितींवर ते लागू केले आहेत आणि त्यांना बदलताना पाहिले आहे. मी या वचनांच्या पवित्रतेवर आणि सामर्थ्यावर इतक्या प्रमाणात अवलंबून राहिलो आहे की ते तर्कशुद्ध मनाला अवास्तव वाटू शकते, कदाचित मूर्खपणाचे देखील. आणि मी आनंदाने ही साक्ष देतो की देवाचे वचन कधीही अपयशी ठरले नाही! त्याचप्रमाणे, जगभरात असे अनेक लोक आहेत जे त्यांना आलेल्या आव्हानांबद्दल आणि त्यांनी केवळ देवाच्या अचूक वचनावर कसा विश्वास ठेवला आणि देवाने त्याच्या वचनाच्या सामर्थ्याने त्यांना विजयी मार्गाने कसे आणले याबद्दल साक्ष मागून साक्ष देऊ शकतात!

अशी एक जागा आहे जेथे आपण येऊ शकतो-अशी जागा जेथे आपण देवाच्या मौल्यवान वचनावर प्रीती करतो आणि त्याचा आदर करतो; एक असे ठिकाण, जिथे देवाच्या वचनाची सत्यता आणि सामर्थ्य यांविषयीच्या निर्विवाद विश्वासाने आमची अंतःकरणे भारलेली असतात; अशी जागा जेथे आपण त्याच्या वचनाला इतर कोणत्याही गोष्टींपेक्षा जास्त महत्त्व देतो; अशी जागा जेथे वचन आपले चारित्र्य बदलून टाकते, आपल्या विचारांवर प्रभाव पाडते आणि आपल्या कृतींस मार्गदर्शन करते; अशी जागा जेथे आपले अंतःकरण वचनाद्वारे प्राप्त होणाऱ्या प्रकटीकरणासाठी व्याकूळ होते आणि भुकेले होते, एक असे ठिकाण, जिथे शास्त्रवचनांमध्ये प्रकट झालेला त्याचा महिमा अधिक पाहण्याची आपल्याला उत्कट ओढ लागलेली असते; देवाच्या वचनातील निखळ आनंदाचे एक स्थान.

आमची प्रार्थना आहे की आपल्यापैकी प्रत्येकाला या ठिकाणी

सतत राहण्याचा आनंद अनुभवता यावा.

## देवाचा सार्वभौम हात

**रोमकरांस पत्र 11:33**

**अहाहा, देवाच्या बुद्धीची व ज्ञानाची संपत्ती किती अगाध आहे! त्याचे निर्णय किती गहन आणि त्याचे मार्ग किती अगम्य आहेत!**

देवाचे मार्ग *"अगम्य"* आहेत किंवा मानवी समजापलीकडे आहेत. मानव इतिहासाच्या काळात देवाचा सार्वभौम हात होता आणि तो अजूनही मार्ग काढत आहे, बरेचदा अशाप्रकारे जे अगदी शुल्लक आणि अस्पष्ट वाटते. बरेचदा देवाचे काम अतिशय सामान्य, सर्वसाधारण वाटते आणि तरीही अद्‌त चमत्कारांच्या कामापेक्षा ते देवाच्या हस्तकृती पेक्षा कमी नाही. मोशेने आपल्या काठीने खडकावर प्रहार केला त्यावेळी क्षणार्धात खडकातून पाणी काढणाऱ्या त्याच देवाने बसालेल आणि त्याचे सहकारी अरण्यात निवासमंडप बांधण्यासाठी दिवसेंदिवस परिश्रम करीत असताना त्यांच्याद्वारे कार्य केले (निर्गम 31:1-11). मानवी मनाला, बसालेल आणि त्याच्या कारागिरांच्या समूहाचे कठीण कष्टमय काम हे स्वतः देवाचे काम होते हे स्वीकारणे कठीण भासते. तरीही, देवाच्या आत्म्यानेच या कारागिरांना सोने, चांदी आणि पितळेपासून बनवलेल्या कलाकृतींची रचना करण्यासाठी बुद्धी, समज आणि ज्ञान दिले.

या सोप्या उदाहरणाचा विस्तार करून, आपण आत्मविश्वासाने म्हणू शकतो की देव सर्वसामान्य लोकांच्या जीवनाद्वारे त्याचे दैवी हेतू पूर्ण करत आहे. आणि पवित्र शास्त्राच्या 66 पुस्तकांच्या संकलनाबाबतही असेच घडले.पवित्र शास्त्राच्या संकलन आणि प्रमाणीकरणाच्या प्रक्रियेतही देवाचा सार्वभौम हात कार्यरत होता. मानवी मन अशा दाव्याच्या सत्यतेविषयी प्रश्न उपस्थित करू शकते. परंतु, आपल्यापैकी ज्यांना हे उमजले आहे की—मनुष्य आपल्या दैनंदिन व्यवहारांत मग्न असतानाही देव आपले कार्य शांतपणे पार

पाडत असतो, हे एक निश्चित सत्य आहे.

## त्याच्या नावापेक्षाही श्रेष्ठ

**स्तोत्रसंहिता 138:2**

**तुझ्या पवित्र मंदिराकडे वळून मी तुझी उपासना करीन, तुझ्या दयेमुळे व तुझ्या सत्यामुळे मी तुझ्या नावाचे उपकारस्मरण करीन; कारण तू आपल्या संपूर्ण नावांहून आपल्या वचनाची थोरवी वाढवली आहेस.**

देवाने आपल्या नावाहूनही आपल्या वचनाला अधिक श्रेष्ठ स्थान दिले आहे. त्याने आपल्या नावाहूनही आपल्या वचनाला उच्च केले आहे. देवासाठी, त्याने सांगितलेले त्याचे वचन त्याच्या प्रतिष्ठेपेक्षा अधिक महत्त्वाचे आहे. कारण त्याचे नाव-त्याची प्रतिष्ठा-ही केवळ त्याच्या वचनाइतकीच खरी आणि मोलाची आहे! आपणास याचा समज प्राप्त करणे अगत्याचे आहे. त्याची प्रतिष्ठा त्याच्या वचनावर अवलंबून आहे. त्याच्या नावाचा गौरव आणि सन्मान त्याच्या वचनातून मिळतो.

याचे दोन महत्त्वाचे परिणाम आहेत.

### *1) देवाच्या भूमिकेवर*

त्याने आपल्या वचनाला आपल्या नामापेक्षाही श्रेष्ठ मानले असल्यामुळे, तो आपल्या सर्व अस्तित्वासह आपल्या वचनाचे पालन करेल. देवाच्या वचनास स्वतः देवाच्या सर्वसामर्थ्याचा, सर्वव्यापीपणाचा आणि सर्वज्ञतेचा आधार आहे. त्याने म्हटले, *"मी सावध आणि सक्रिय आहे, माझे वचन पूर्ण करण्यासाठी मी त्यावर लक्ष ठेवतो"* (यिर्मया 1:12 एएमपीसी)

### *2) आपली भूमिका*

आपल्याला केवळ प्रभूचे नावच नव्हे तर त्याचे वचन देखील जाणून घेण्याचे महत्त्व लक्षात आले पाहिजे. आपण त्याचे नाव घेतले आहे आणि तारण मिळवले आहे (रोमकरांस पत्र 10:13). आता, आपल्याला

त्याचे वचन जाणून घेणे आवश्यक आहे कारण देवाने स्वतः त्याच्या नावापेक्षा त्याच्या वचनाला मोठे स्थान दिले आहे.

## देवाचे वचन त्याच्या चारित्र्याइतकेच सामर्थ्यवान आहे

**इब्री 6:11-18**

**11आमची अशी इच्छा आहे की, तुमच्यापैकी प्रत्येकाने आशेविषयीची पूर्ण खातरी करून घेण्याच्या हेतूने तशीच आस्था शेवटपर्यंत व्यक्त करावी;**
**12म्हणजे तुम्ही आळशी होऊ नये, तर विश्वासाच्या व धीराच्या योगे जे अभिवचनांचा वारसा उपभोगणारे होतात त्यांचे तुम्ही अनुकारी व्हावे.**
**13देवाने अब्राहामाला वचन दिले तेव्हा त्याला शपथ वाहण्यास स्वतःपेक्षा कोणी मोठा नसल्यामुळे त्याने 'आपलीच शपथ वाहून' म्हटले की,**
**14"मी तुला आशीर्वाद देईनच देईन व तुला बहुगुणित करीनच करीन."**
**15त्याने धीर धरला म्हणून त्याला अभिवचनानुसार लाभ झाला.**
**16माणसे आपणांपेक्षा मोठ्याची शपथ वाहतात; आणि आपल्या म्हणण्याचे समर्थन करण्यासाठी त्यांच्यामध्ये शपथ सर्व वादाचा शेवट आहे.**
**17म्हणून आपल्या संकल्पाची अचलता अभिवचनाच्या वतनदारांना विशेषत्वाने दाखवावी ह्या इच्छेने देव शपथेच्या द्वारे मध्ये पडला,**
**18ह्यासाठी की, जे आपण, स्वतःपुढे ठेवण्यात आलेली आशा हस्तगत करण्याकरता आश्रयाला धावलो, त्या आपणांला ज्याविषयी खोटे बोलणे देवाला अशक्य आहे अशा दोन अचल गोष्टींच्या द्वारे चांगले उत्तेजन मिळावे.**

जेव्हा देवाने अब्राहामाला वचन दिले तेव्हा त्याने स्वतःची शपथ घेऊन आपल्या वचनाचे समर्थन केले. तो म्हणाला, *"मी तुला आशीर्वाद देईनच देईन व तुला बहुगुणित करीनच करीन"* (इब्री 6:14). देवाने अब्राहामाला *"दोन अचल गोष्टी"* दिल्या (इब्री 6:18) त्याचे अभिवचन (वचन) आणि त्याची शपथ. जेव्हा देव म्हणतो, *"मी करीन..."* तेव्हा तो आपल्याला दोन अचल गोष्टी देत असतो-त्याचे अभिवचन (त्याचे वचन) आणि त्या वचनाचे समर्थन करण्यासाठी त्याची शपथ (शपथ, प्रतिज्ञा). देवाचा प्रत्येक शब्द (वचन) हे एक शपथपूर्वक केलेले विधान आणि सन्मानाचे वचन आहे; कारण ते एकाच वेळी वचन आणि शपथ—असे दोन्हीही आहे. *"आपलीच शपथ वाहून घेतली"* (इब्री 6:13). पुष्टी

करण्याची देवाची शपथ त्याच्या स्वतःवर आधारित आहे. त्याच्या स्वतःइतके अपरिवर्तनीय दुसरे काहीही नाही कारण तो असा देव आहे ज्याचे चारित्र्य अपरिवर्तनीय आहे. त्याने म्हटले, *"कारण मी परमेश्वर आहे, मी बदलणारा नाही"* (मलाखी 3:6). म्हणून, देवाच्या प्रत्येक वचनास देवाच्या अपरिवर्तनीय चारित्र्याचा आधार आहे. आणि देवाच्या चारित्र्याचा एक महत्त्वाचा पैलू म्हणजे देवाला खोटे बोलणे अशक्य आहे.

तो असा देव आहे जो *"सत्यप्रतिज्ञ आहे"* (तीत 1:2). तो जे काही बोलतो तो प्रत्येक शब्द सत्य आहे. जसे येशूने म्हटले होते, *"तुझे वचन सत्य आहे"* (योहान 17:17ब). आपल्याला अशा ठिकाणी यायचे आहे जेथे आपण देवाच्या अपरिवर्तनीय स्वभावाच्या या पैलूवर अवलंबून राहू. आपल्याला माहित आहे की खोटे बोलणे देवाला अशक्य आहे आणि म्हणूनच, त्याने बोललेला प्रत्येक शब्द परिपूर्ण सत्य आहे. *"देव काही मनुष्य नाही की त्याने लबाडी करावी; तो काही मानवपुत्र नाही की त्याने अनुताप करावा; दिलेले वचन तो पाळणार नाही काय? दिलेला शब्द तो पुरा करणार नाही काय?"* (गणना 23:19) जेव्हा आपल्याला याची खात्री दिली जाते, तेव्हा शास्त्रवचनांत म्हटल्याप्रमाणे, आपल्याला *"चांगले उत्तेजन"* मिळते किंवा ॲम्प्लिफायड बायबल क्लासिकमध्ये म्हटल्याप्रमाणे, आपल्याला *"सामर्थ्यशाली अंतर्वासी बळ आणि जोरदार प्रोत्साहन"* मिळते (इब्री 6:18, एएमपीसी).

## शुद्ध वचने

**स्तोत्रसंहिता 12:6**

**परमेश्वराची वचने शुद्ध वचने आहेत; भट्टीत सात वेळा शुद्ध करून जमिनीवरील मुशीत ओतलेल्या रुप्यासारखी ती आहेत.**

आपला देव सत्याचा देव आहे. त्याची वचने सत्य वचने आहेत, शुद्ध वचने आहेत. देवाचे वचन अमोघ आहे *"तुझे वचन संपूर्णपणे सत्य आहे"* (स्तोत्रसंहिता 119:160अ). *"जे वचन बोलला त्यातला एक शब्दही व्यर्थ गेला नाही"* (1 राजे 8:56ब). त्यांच्यावर दृढ विश्वासाने

अवलंबून राहता येते. त्याच्या वचनांवर निःसंशयपणे विश्वास ठेवता येतो, त्याच्या निर्देशांचा पूर्ण अंतःकरणाने स्वीकार करता येतो. देवाचे वचन स्वर्गात कायमचे स्थिर आहे (स्तोत्रसंहिता 119:89). ते बदलले जाणार नाहीत किंवा बदलणार नाहीत कारण तो कधीही त्याचा करार मोडणार नाही किंवा त्याने जे सांगितले आहे ते मागे घेणार नाही (स्तोत्रसंहिता 89:34). त्याचे वचन सर्वकाळ टिकते (1 पेत्र 1:23). त्याचे वचन मजबूत सुरक्षिततेचे ठिकाण आहे कारण त्याच्याइतके पवित्र, खात्रीशीर आणि टिकाऊ दुसरे काहीही नाही.

## देवाचे वचन देवाच्या सामर्थ्याचे वाहक आहे

**इब्री 11:3**
**विश्वासाने आपल्याला कळते की, देवाच्या शब्दाने विश्वाची रचना झाली, अशी की, जे दिसते ते दृश्य वस्तूंपासून झाले नाही.**

**इब्री 1:3अ**
**हा त्याच्या गौरवाचे तेज व त्याच्या तत्त्वाचे प्रतिरूप असून आपल्या सामर्थ्याच्या शब्दाने विश्वाधार आहे.**

**इब्री 4:12**
**कारण देवाचे वचन सजीव, सक्रिय, कोणत्याही दुधारी तलवारीपेक्षा तीक्ष्ण असून, जीव व आत्मा, सांधे व मज्जा ह्यांना भेदून आरपार जाणारे आणि मनातील विचार व हेतू ह्यांचे परीक्षक असे आहे.**

पवित्र शास्त्र आपल्याला शिकवते की, देवाने केवळ बोलूनच या विश्वाची निर्मिती केली. "बिग बँग" आणि इतर सिद्धांतांचे समर्थक दावा करतात की, कालांतराने गोष्टी जागीच एकत्र आल्या असे मानण्यापेक्षा यावर विश्वास ठेवणे खूपच वाजवी आहे. आम्हाला समजते की *"देवाच्या शब्दाने विश्वाची रचना झाली"* (इब्री 11:3). देवाने उच्चारलेल्या शब्दांमुळे हे विश्व निर्माण झाले, बांधले गेले, त्यास आकार मिळाला आणि ते घडवले गेले. *"जे दिसते ते दृश्य वस्तूंपासून झाले नाही"* (इब्री 11:3) याचा अर्थ असा की जे दृश्य आहे ते अदृश्यापासून बनले

आहे. नैसर्गिक जग हे आध्यात्मिक जगातून उत्पन्न झाले आहे. हे एक शक्तिशाली सत्य आहे जे आपण समजून घेतले पाहिजे. देवाचे वचन ही ती अदृश्य, आध्यात्मिक "सामुग्री" होती ज्याने हे दृश्यमान, नैसर्गिक जग अस्तित्वात आले. फक्त सर्व गोष्टी देवाच्या बोललेल्या वचनाने निर्माण झाल्या इतकेच नव्हे, तर इब्री 1:3 नुसार, संपूर्ण विश्व देवाच्या वचनाने टिकून आहे, नियंत्रित आहे आणि व्यवस्थित ठेवले आहे.

देवाचे वचन हे देवाच्या सामर्थ्याने परिपूर्ण आहे हे जेव्हा आपण ओळखतो तेव्हा आपल्याला हे सत्य समजते. भौतिकशास्त्रात, प्रकाशाच्या स्वरूपाच्या सिद्धांतांपैकी एक सिद्धांत हे स्पष्ट करतो की प्रकाशात प्रकाशाणू असतात. प्रकाशाणूत ऊर्जा सामावलेली असते. जेव्हा हे प्रकाशाणू योग्य लक्ष्यांवर धडकतात तेव्हा ते त्यांच्या उर्जेतील काहीचा उत्सर्ग होतो.त्याचप्रमाणे, देवाचे वचन सर्वशक्तिमान परमेश्वराचे सर्वशक्तिमान सामर्थ्य वाहून नेणारे ऊर्जा- स्रोत आहे असे चित्र आपण आपल्या मनात चित्रित करू शकतो. देवाचे वचन हे दैवी-ऊर्जेचा उत्सर्ग करते आणि देवाची सर्जनशील कामे घडवून आणते.

जर देवाने त्याच्या वचनाच्या सामर्थ्याने हे संपूर्ण जग अस्तित्वात आणले आहे, तर तो आपल्या जीवनात सध्या अस्तित्वात नसलेल्या गोष्टी अस्तित्वात आणू शकत नाही का? जेथे आजार आहे, तेथे देव त्याच्या वचनाच्या सामर्थ्याने आरोग्य आणि निरोगीपणा अस्तित्वात आणू शकतो. जेथे गरज आहे, तेथे त्याच्या वचनाच्या सामर्थ्याने देव तरतूद आणि पुरवठा अस्तित्वात आणू शकतो.देवाची सृजनात्मक सामर्थ्य त्याच्या वचनात आहे. म्हणूनच, देवाचा शब्द अशा गोष्टी निर्माण करू शकतो (अस्तित्वात आणू शकतो), ज्याचे वचन देवाने दिले आहे—मग त्या गोष्टी सध्या आपल्या जीवनात अस्तित्वात नसतील तरीही.

देवाने त्याच्या वचनाचा उपयोग करून हे विश्व घडवले, बांधले आणि त्यास आकार दिला. देव आपल्या वचनाद्वारे आपले वर्तमान

आणि भविष्य घडवू, रचू आणि आकार देऊ शकत नाही का? देवाच्या वचनात आपले वर्तमान बदलण्याचे आणि आपले भविष्य घडवण्याचे सामर्थ्य आहे.

हे संपूर्ण विश्व देवाच्या वचनाने टिकलेले, आधारलेल आणि नियंत्रित केलेले आहे. देवाचे वचन आपल्या जीवनालाही आधार देऊ, सावरू आणि नियंत्रित करू शकत नाही का? देवाच्या वचनात पृथ्वीवरील आपल्या जीवनाशी संबंधित गोष्टींचा सांभाळ करण्यासाठी, नियंत्रित करण्यासाठी आणि व्यवस्थित ठेवण्यासाठी पुरसे आणि अधिक सामर्थ्य आहे.

## वचनांवर स्थिर राहणे

**रोमकरांस पत्र 4:18**

**“तशी तुझी संतती होईल,” ह्या वचनाप्रमाणे त्याने ‘बहुत राष्ट्रांचा बाप’ व्हावे म्हणून आशेला जागा नसताही त्याने आशेने विश्वास ठेवला.**

वचनाची शुद्धता आणि सामर्थ्य समजून घेतल्याने आपल्याला त्यावर विसंबून राहण्याचा दृढ विश्वास मिळतो. देवाचे वचन सत्य आहे आणि म्हणूनच, वचनात आपल्याला जे अभिवचन देण्यात आले आहे ते प्राप्त करण्याची अपेक्षा आपण करू शकतो. देवाचे वचन सामर्थ्याने परिपूर्ण आहे आणि म्हणूनच, आपण खात्री बाळगू शकतो की त्याचे वचन आपल्या जीवनात फळ उत्पन्न करेल. जरी याचा अर्थ असा असला तरी, अब्राहामाप्रमाणे, आशेला जागा नसतांनाही, आपण आशेने विश्वास करतो की देवाने आपण जे बनू असे म्हटले आहे, ते सर्व आपण नक्कीच बनू. आपण हे करतो कारण आपल्याला देवाच्या वचनाची शुद्धता आणि सामर्थ्याचे आकलन झाले आहे. आपल्याला माहित आहे की त्याचे वचन अपयशी ठरू शकत नाही.

आमच्यापैकी काहीजण आर्थिक अडचणींचा सामना करीत असतील. जेव्हा आमच्या दैनंदिन गरजांची बाब येते तेव्हा आम्ही

विचार करतो की कधी परिस्थिती बदलेल का. देवाने आम्हास अभिवचन दिले आहे की आमच्या सर्व भौतिक गरजा पूर्ण होतील. आम्हास माहीत आहे की त्याने अभिवचन दिले आहे की तो *"माझा देव आपल्या संपत्त्यनुरूप तुमची सर्व गरज ख्रिस्त येशूच्या ठायी गौरवाच्या द्वारे पुरवील"* (फिलिप्पैकरांस पत्र 4:19). आम्ही जाणतो की जेव्हा आपण *"पहिल्याने देवाचे राज्य व त्याचे नीतिमत्त्व मिळवण्यास झटू" तेव्हा त्यांच्याबरोबर ह्याही सर्व गोष्टी आम्हांला मिळतील"* (मत्तय 6:33). आपल्याला माहित आहे की आपल्याजवळ जे काही आहे त्याने जेव्हा आपण देवाचा सन्मान करतो तेव्हा तो आपल्याला वाढवेल (नीतिसूत्रे 3:9,10; मलाखी 3:9-11). ही प्रत्येक अभिवचने शुद्ध आणि दैवी सामर्थ्याने युक्त आहेत हे जाणून, आपण त्यांना विश्वासाने धरून ठेवतो. आपल्याला माहित आहे की या वचनांमध्ये (अभिवचनांमध्ये) आर्थिक आशीर्वादांचे सृजनात्मक चमत्कार घडवून आणण्याची आणि आपल्या परिस्थितीत बदल घडवून आणण्याचे पुरेसे सामर्थ्य आहे. आपण त्याच्या वचनांवर टिकून राहतो.

काही जण त्यांच्या भविष्यासाठी देवाकडे पाहत असतील. जेव्हा परिस्थिती अस्पष्ट, अनिश्चित—किंबहुना कदाचित निराशाजनक आणि अंधकारमय भासते—तेव्हाही, देवाचे वचन आपल्या जीवनात आत्मविश्वास आणि खात्री घेऊन येते. वचन म्हणते, *"परंतु आपल्याला ठाऊक आहे की, देवावर प्रीती करणाऱ्याना म्हणजे त्याच्या संकल्पाप्रमाणे बोलावलेल्यांना देवाच्या करणीने सर्व गोष्टी मिळून कल्याणकारक होतात"* (रोमकरांस पत्र 8:28). देव आपल्यासाठी असलेल्या योजना, मोठ्या समृद्धीच्या योजना आणि आपण ज्या भविष्याची आशा करतो ते घडवून आणण्याच्या योजना जाणतो (यिर्मया 29:11). आपला मार्ग त्या तेजस्वी प्रकाशासारखा आहे जो अधिकाधिक उजळ होत जातो (नीतिसूत्रे 4:18). म्हणून, आपण गोष्टी अधिकाधिक स्पष्ट होण्याची अपेक्षा करतो. आपल्याला माहित आहे की परमेश्वरच आपली गती स्थिर करतो (स्तोत्रसंहिता 37:23,24). ही आणि इतर

अनेक वचने आपल्याला अढळ धैर्याने आणि आत्मविश्वासाने भरून टाकतात. आपण त्याच्या अभिवचनांवर उभे राहतो.

त्याचप्रमाणे, आपल्या जीवनाच्या विविध क्षेत्रांमध्ये आपण प्रभूची वचने आणि आज्ञा ओळखतो. आपल्या जीवनाच्या सर्व क्षेत्रांबद्दल त्याचे वचन शुद्ध आणि सामर्थ्याने भरलेले आहे हे आपण मान्य करतो.

वचनात असलेले अमर्याद सामर्थ्य समजल्यानंतर आणि आमच्या जीवनात ते मुक्त होण्याची क्षमता समजल्यानंतर आपण आपल्या जीवनांत देवाच्या वचनाचे सामर्थ्य अनुभवण्यासाठी काय केले पाहिजे? कोणती गोष्ट विश्वासणाऱ्याच्या जीवनात देवाच्या वचनाचे अंतर्निहित सामर्थ्य मुक्त करते? आपण पुढील प्रकरणांत आपण याविषयी विचार करणार आहोत.

# 3
# देवाचे वचन: चमत्कारी बीज

प्रभु येशू अनेकदा दाखल्यांचा उपयोग करून शिकवत असत. दाखले म्हणजे आपल्या जगातील गोष्ट किंवा उदाहरणे जी आपल्याला देवाच्या राज्याबद्दलचे सत्य समजण्यास मदत करतात. दाखले आपल्याला देवाचे राज्य कसे कार्य करते हे शिकवतात.

आपल्यापैकी अनेकांना परिचित असलेल्या दाखल्यांपैकी एक म्हणजे तीन शुभवर्तमानांमध्ये (मत्तय 13:1-9,18-23; मार्क 4:1-10,13-20 आणि लूक 8:4-15) आपल्यासाठी नमूद करण्यात आलेला पेरणाऱ्याचा दाखला. चला आपण या दाखल्याचा मार्कचा अहवाल वाचूया आणि तिन्ही शुभवर्तमानांमधील मजकुरातून अंतर्दृष्टी मिळवूया.

## बी पेरणाऱ्याचा दाखला

**मार्क 4:1-10,13-20**

**1पुन्हा तो समुद्रकिनाऱ्यावर शिक्षण देऊ लागला, तेव्हा त्याच्याजवळ फार मोठा समुदाय जमला; म्हणून तो समुद्रातील एका मचव्यात जाऊन बसला; आणि सर्व लोक समुद्रकिनारी जमिनीवर होते.**

**2नंतर तो त्यांना दाखले देऊन पुष्कळ गोष्टी शिकवू लागला आणि शिकवता शिकवता तो त्यांना म्हणाला,**

**3"ऐका; पाहा, एक पेरणारा पेरणी करण्यास निघाला.**

**4आणि तो पेरत असताना असे झाले की, काही बी वाटेवर पडले, ते पाखरांनी येऊन खाऊन टाकले.**

**5काही बी खडकाळ जमिनीत पडले, तेथे त्याला फारशी माती नव्हती; माती खोल नसल्यामुळे ते लगेच उगवले;**

**6आणि सूर्य वर आल्यावर ते उन्हाने करपले; व मूळ नसल्याकारणाने ते वाळून गेले.**

**[7]काही बी काटेरी झुडपांमध्ये पडले व काटेरी झुडपांनीच वाढून त्याची वाढ खुंटवली, म्हणून त्याला काही पीक आले नाही.**
**[8]काही बी चांगल्या जमिनीत पडले, ते उगवले, मोठे झाले व त्याला पीक आले; आणि त्याचे तीसपट, साठपट, शंभरपट असे उत्पन्न आले."**
**[9]मग तो म्हणाला, "ज्याला ऐकण्यास कान आहेत तो ऐको."**
**[10]तो एकान्तात असता त्याच्याबरोबर बारा जणांसह जे होते त्यांनी त्याला दाखल्यांविषयी विचारले.**
**[13]तो त्यांना म्हणाला, "हा दाखला तुम्हांला समजला नाही काय? तर मग सर्व दाखले कसे समजतील?**
**[14]पेरणारा वचन पेरतो.**
**[15]वाटेवर वचन पेरले जाते तेथील लोक हे आहेत की, त्यांनी ऐकल्याबरोबर सैतान येऊन त्यांच्यातले पेरलेले वचन हिरावून घेतो.**
**[16]तसेच खडकाळ जमिनीत पेरलेले हे आहेत की, वचन ऐकताच ते आनंदाने ग्रहण करतात;**
**[17]तथापि त्यांच्यामध्ये मूळ नसल्याकारणाने ते अल्पकाळ टिकाव धरतात; मग वचनामुळे संकट आले किंवा छळ झाला म्हणजे ते लगेच अडखळतात.**
**[18]काटेरी झुडपांमध्ये पेरलेले हे आहेत की, ते वचन ऐकून घेतात,**
**[19]व नंतर प्रपंचाची चिंता, द्रव्याचा मोह व इतर गोष्टींचा लोभ ही त्यांच्यामध्ये शिरून वचनाची वाढ खुंटवतात आणि ते निष्फळ होते.**
**[20]चांगल्या जमिनीत पेरलेले हे आहेत की, ते वचन ऐकून ते स्वीकारतात; मग कोणी तीसपट, कोणी साठपट, कोणी शंभरपट असे पीक देतात."**

पेरणाऱ्याचा दाखला सरळ आणि समजण्यास सोपा आहे, विशेषतः जे वाचनातून किंवा अनुभवातून बी पेरण्याच्या आणि रोपे किंवा पिके वाढवण्याच्या प्रक्रियेशी परिचित आहेत. आपल्या जीवनात देवाच्या वचनाच्या कार्याबद्दल खोल आणि सामर्थ्यशाली सत्ये सांगण्यासाठी प्रभु या साध्या दाखल्यांचा उपयोग करतो. आपल्याला माहित आहे की देवाचे वचन जिवंत, सक्रिय आणि त्याच्या सामर्थ्याने भरलेले आहे (इब्री 4:12). हा दाखला आपल्याला देवाच्या वचनातील जीवन आणि सामर्थ्य आपल्या जीवनात कसे मुक्त करता येते हे प्रकट करतो. देवाच्या वचनास फलद्रूप होण्यापासून रोखणाऱ्या गोष्टी देखील ते प्रकट करते.

हा दाखला इतर सर्व दाखले समजून घेण्याची गुरुकिल्ली आहे. येशूने म्हटले, *"तो त्यांना म्हणाला, "हा दाखला तुम्हांला समजला नाही काय? तर मग सर्व दाखले कसे समजतील?"* (मार्क 4:13). याचा अर्थ दोन महत्त्वाच्या गोष्टी आहेत.

- पहिले, जर आपण या दाखल्यातून आध्यात्मिक सत्य आणि अंतर्दृष्टी कशी मिळवायची हे शिकलो, तर आपण इतर सर्व दाखल्यांमधूनही असेच करू शकू.
- दुसरे, या दाखल्यात प्रकट केलेली सत्ये ही येशूच्या इतर सर्व दाखल्यांमध्ये समाविष्ट असलेल्या आणि प्रकट झालेली सत्ये समजून घेण्यास आणि त्याप्रमाणे चालण्यास समर्थ करणाऱ्या किल्ल्या आहेत.

पेरणाऱ्याच्या दाखल्यात आपल्यासाठी मांडलेल्या प्रमुख विचारांवर प्रकाश टाकूया. हा सारांश सादर करताना, आपण तीन शुभवर्तमानांमधील समांतर उताऱ्यांमधून माहिती काढतो.

1) देवाचे वचन एका बीजासारखे आहे. (मार्क 4:14)

2) आपले हृदय ही अशी जमीन आहे जेथे देवाच्या वचनाचे बीज पेरायचे आहे. (मार्क 4:15)

3) फळ हवे असेल तर बीजाचे संरक्षण आणि संगोपन केले पाहिजे.

4) सैतानास वचन चोरण्यापासून रोखण्यासाठी आपण वचन समजून घेतले पाहिजे (आध्यात्मिक सत्याची समज मिळवली पाहिजे). (मत्तय 13:19)

5) जगाकडून असो किंवा सैतानाकडून असो, आपल्याला कितीही त्रास किंवा छळ सहन करावा लागला तरी आपण वचनाला घट्ट धरून ठेवले पाहिजे आणि ते आपल्या हृदयात रुजू दिले पाहिजे

जेणेकरून ते फळ देऊ शकेल. (मार्क 4:16,17)

6) आपण आपल्या अंतःकरणाचे रक्षण अशा गोष्टींपासून केले पाहिजे ज्या वचनास गुदमरून टाकतात, जसे की या संसाराच्या चिंता, द्रव्याचा मोह, इतर गोष्टींची इच्छा आणि जीवनातील सुखविलास. (मार्क 4:19)

7) जेव्हा आपण (मत्तय 13:23) समजून घेतो, (मार्क 4:20) स्वीकारतो आणि आपल्या अंतःकरणात (लूक 8:15) ठेवतो, तेव्हा आपण आपल्या जीवनात फळ देऊ.

देवाच्या वचनाचे मनन करून आपल्या अंतःकरणात देवाच्या वचनाचे बीज पेरण्याच्या प्रक्रियेवर विशेष लक्ष देऊन आपण या प्रत्येक मुख्य अंतर्दृष्टीचे सविस्तर वर्णन करू.

# 4
# बीज हे देवाचे वचन आहे

**लूक 8:11**
**हा दाखला असा आहे: बी हे देवाचे वचन आहे.**

**1 पेत्र 1:23**
**कारण तुम्ही नाशवंत बीजापासून नव्हे, तर अविनाशी बीजापासून म्हणजे 'देवाच्या जिवंत व सर्वकाल टिकणाऱ्या' शब्दाच्या द्वारे पुन्हा जन्म पावलेले आहात.**

या दाखल्यात आपल्याला जे पहिले सत्य पाहावयास मिळते ते हे आहे की देवाचे वचन बीजासारखे आहे. जेव्हा तुम्ही एखादे बी हातात धरता तेव्हा ते अतिशय क्षूल्लक आणि निर्जीव वाटते. आपण कल्पनाही करू शकत नाही की आपण जमिनीत पेरलेले एक लहान बीज अंकुरेल, मूळ धरेल आणि अखेरीस एका रोपात किंवा अगदी एका मोठ्या झाडात त्याची वाढ होईल. त्या बीजात एक संपूर्ण नवीन रोप किंवा झाड निर्माण करण्याची क्षमता असते. एका अर्थाने, बीजामध्ये सर्जनशील क्षमता असते कारण ते असे काही निर्माण करते जे पूर्वी कधीही अस्तित्वात नव्हते. शिवाय, जर बी केवळ स्वतःपुरतेच राहिले—उदा. एखाद्या बियांच्या पिशवीत किंवा कोठारात—तर ते आपली क्षमता प्रकट करण्यास असमर्थ ठरते. बिजात असलेली शक्ती तेव्हाच मुक्त केली जाते जेव्हा ते पेरले जाते आणि योग्यरित्या जोपासले जाते.

देवाने आपल्याला उच्चारलेला प्रत्येक शब्द एक बीज आहे. पवित्र शास्त्र ही बियांची पिशवी आहे, किंवा बियांनी भरलेले कोठार आहे. आपण देवाच्या प्रत्येक वचनास किंवा अभिवचनास चमत्कारिक बीज

म्हणू शकतो. देवाने आपल्याला दिलेल्या या बिजांमध्ये सृजनात्मक सामर्थ्य आहे. जेव्हा देवाच्या वचनाचे हे बीज आपल्या हृदयात पेरले जाते आणि त्यांचे संगोपन केले जाते, तेव्हा ते आपल्या जीवनात त्यात असलेले अलौकिक सामर्थ्य मुक्त करेल.

1 पेत्र 1:23 मध्ये, देवाच्या वचनाचा उल्लेख *"अविनाशी बीज"* असा केला जातो. वापरलेला ग्रीक शब्द *'स्पोर'* आहे. देवाचे वचन म्हणजे चमत्कार *'स्पोर'*—चमत्कारिक बीज. मूळ तत्व हे आहे—देवाच्या वचनात उत्पादन करण्याची क्षमता आहे. त्यात जीवन देणारे, सर्जनशील, चमत्कारिक कार्य करणारे सामर्थ्य आहे. देवाने उच्चारलेला प्रत्येक शब्द हा निर्माण करण्याची क्षमता असलेले एक चमत्कारिक बीज आहे.

1 पेत्र 1:23 सांगते की आपला देवाच्या वचनाद्वारे नवा जन्म झाला आहे. याकोब 1:18 मध्ये हे पुन्हा सांगितले आहे की आपण *"सत्याच्या वचनाद्वारे"* पुन्हा जन्मलो आहोत. जेव्हा देवाच्या वचनाचे (शुभवर्तमानाचे) बीज आपल्या अंतःकरणात पेरले गेले आणि जेव्हा आपण त्यावर विश्वास ठेवला, तेव्हा त्याने आपल्यामध्ये जीवन देणारे सामर्थ्य मुक्त केले. क्षणार्धात, एका क्षणात, आपण नव्याने जन्मलो. आपण नवीन उत्पत्ती बनलो. *"म्हणून जर कोणी ख्रिस्ताच्या ठायी असेल तर तो नवी उत्पत्ती आहे; जुने ते होऊन गेले; पाहा, ते नवे झाले आहे"* (2 करिंथ 5:17). देवाचे सर्जनात्मक कार्य आपल्या आत्म्यात घडले (इफिसकरांस पत्र 2:10). आपल्याठायी पूर्ण झालेले (आणि तारण पावणाऱ्या अनेकांच्या हृदयात पूर्ण होत असलेले) हे सर्जनात्मक कार्य आपण अनुभवतो तो सर्वात मोठा चमत्कार आहे. हा नव्या जन्माचा चमत्कार आहे—ख्रिस्तामध्ये नवीन उत्पत्ती होणे. आणि हा सर्जनात्मक चमत्कार अविनाशी बीजाच्या (शुभवर्तमानाच्या) सामर्थ्याने, म्हणजेच देवाच्या वचनाच्या सामर्थ्याने घडवून आणला होता.

ख्रिस्तामध्ये नवी सृष्टी बनणे, हे आपल्यासाठी किती महान कार्य होते—याचाच जरा विचार करा. आपल्या जीवनातून सैतानाची शक्ती मोडून काढली गेली. आपल्याला सैतानाच्या सत्तेतून काढून देवाच्या स्वतःच्या पुत्राच्या राज्यात आणण्यात आले आहे (कलस्सै 1:13). आपल्याला देवाच्या कुटुंबात दत्तक घेण्यात आले. आम्ही देवापासून जन्मलो आणि दैवी स्वभावाचे भागीदार झालो. आपल्याला ख्रिस्तामध्ये आणण्यात आले आणि ख्रिस्तामध्ये राहण्याचे सर्व अद्‌त आशीर्वाद आपले झाले. जेव्हा देवाच्या वचनाच्या बीजाने आमच्या जीवनात आपली चमत्कारिक शक्ती मुक्त केली, तेव्हा हे सर्व आणि त्याहूनही कितीतरी अधिक—एका क्षणातच आमचे झाले.

देवाच्या वचनाच्या बीजाने आपल्यामध्ये कार्य करण्याची शक्ती किंवा क्षमता गमावली आहे का? वचनाचे हे अद्‌त चमत्कारिक बीज आता आपल्या जीवनात चमत्कार घडवू शकत नाही का? नाही, अजिबात नाही! कारण वचन हे अविनाशी बीज आहे. वचन जिवंत असते, कायम राहते आणि अनंतकाळ टिकते. देवाने आपल्याला सांगितलेल्या प्रत्येक वचनात आपल्या जीवनात फळ निर्माण करण्याची क्षमता आहे.

## देवाचे वचन हे उत्पन्न करण्यासाठी तयार केले गेले आहे

**यशया 55:10,11**

**10 पाहा, पाऊस व बर्फ आकाशातून पडतात; आणि पृथ्वी भिजवून, तिला सफळ व हिरवीगार केल्यावाचून, पेरणाऱ्यास बीज, खाणाऱ्यास भाकरी दिल्यावाचून ती परत वर जात नाहीत,**
**11 त्याप्रमाणे माझ्या मुखातून निघणारे वचन होईल; ते माझी इच्छा पूर्ण केल्यावाचून व ज्या कार्यासाठी मी ते पाठवले ते केल्यावाचून माझ्याकडे विफल होऊन परत येणार नाही.**

देवाने म्हटले आहे की त्याच्या मुखातून निघणारे वचन त्याच्याकडे विफल होऊन रिकामे परत जाणार नाही. उलट, तो जे इच्छितो आणि

जे उद्देशित आहे ते ते साध्य करेल.

यशया 55:10,11 मधून आपल्याला चार सोप्या अंतर्दृष्टी मिळतात.

1) देवाचे वचन निर्माण करण्यासाठी (किंवा पूर्ण करण्यासाठी घडविले गेले) तयार केले गेले आहे.

2) देवाचे वचन तो जे इच्छितो आणि जे उद्देशित आहे ते ते साध्य करेल.

3) जेव्हा देवाला त्याचा हेतू आणि संकल्प पूर्ण करायचा असतो, तेव्हा तो त्याचे वचन बोलतो.

4) देवाचे वचन, देवाचा हेतू आणि आपली इच्छा प्रकट करते.

देव जी वचने बोलतो (आणि जी वचने त्याने बोलली आहेत), ती पोकळ वचने नाहीत. ते स्वतः देवाच्या सर्वसामर्थ्याने भरलेले शब्द आहेत. ते उत्पन्न करण्यासाठी घडविले गेले आहेत. एखाद्या बीजाप्रमाणे, देवाने उच्चारलेले प्रत्येक वचन त्याची पूर्तता करण्याच्या अलौकिक क्षमतेने भरलेले आहे.

देवाने त्याचे वचन त्याला जे हवे आहे आणि त्याने पृथ्वीवर ठरविले आहे ते निर्माण करण्यासाठी तयार केले आहे. देवाचा हेतू त्याच्या लोकांना आशीर्वाद देण्याचा आहे (स्तोत्रसंहिता 3:8), त्याचे वचन तेच साध्य करेल. देवाने लोकांना बरे करण्याचा हेतू ठेवला आहे (निर्गम 15:26; निर्गम 23:25). म्हणून, त्याचे वचन आजारी लोकांना बरे करेल (स्तोत्रसंहिता 107:20). देवाने त्याच्या लोकांना त्यांच्या जीवनासाठी ज्ञान, समज आणि मार्गदर्शन मिळावे असा उद्देश ठेवला आहे. (यशया 48:17; स्तोत्रसंहिता 32:8) आणि म्हणूनच, त्याचे वचन त्याचा हा हेतू पूर्ण करेल. त्याचे वचन त्याने ठरवलेले, नियोजित केलेले, हेतू असलेले आणि इच्छित असलेले सर्व काही साध्य करेल.

प्रभु परमेश्वर स्वर्गात आहे. आणि जेव्हा तो पृथ्वीवर त्याचा हेतू आणि संकल्प पूर्ण करू इच्छितो तेव्हा तो त्याचे वचन पाठवतो. हे बोललेले वचन एक चमत्कारिक बीज आहे. ते देवाचा हेतू पूर्ण करेल. आपण, त्याचे लोक येथे पृथ्वीवर आहोत. त्याच्या अविनाशी वचनाच्या सामर्थ्याने आणि त्याच्या पवित्र आत्म्याच्या कार्याद्वारे, देव आपल्या जीवनात जे इच्छितो आणि जे त्याने योजिले आहे, ते साध्य करतो.

## विश्वास ठेवणाऱ्या तुम्हांमध्ये वचन प्रभावीपणे कार्य करते

**1 थिस्सल 2:13**

**ह्या कारणांमुळे आम्हीही देवाची निरंतर उपकारस्तुती ह्यामुळे करतो की, तुम्ही आमच्यापासून ऐकलेले देवाचे वचन स्वीकारले ते माणसांचे म्हणून नव्हे तर देवाचे म्हणून स्वीकारले, आणि वास्तविक ते तसेच आहे; ते तुम्हा विश्वास ठेवणाऱ्यात कार्य करत आहे.**

देवाने त्याचे वचन मानवी जीवनात त्याच्या सामर्थ्याचा वाहक म्हणून तयार केले आहे. प्रेषित पौलाने थेस्सलनीका करांना लिहिलेल्या पत्रात स्पष्ट केले आहे की देवाचे वचन त्याची दैवी ऊर्जा पाठवते आणि त्यावर विश्वास ठेवणाऱ्यांच्या जीवनात प्रभावीपणे कार्य करते. *"प्रभावीपणे कार्य करते"* हा शब्द ग्रीक शब्द *'एनर्जियो'* आहे जो आतून बाहेर पडणारी दैवी ऊर्जा किंवा अलौकिक सामर्थ्य दर्शवितो जे कार्य करण्यास प्रबळ आहे. एम्प्लीफाइड बायबलमध्ये ही कंसातील टीप समाविष्ट आहे, *"ह्या कारणांमुळे आम्हीही देवाची निरंतर उपकारस्तुती ह्यामुळे करतो की, तुम्ही आमच्यापासून ऐकलेले देवाचे वचन स्वीकारले ते माणसांचे म्हणून नव्हे तर देवाचे म्हणून स्वीकारले, आणि वास्तविक ते तसेच आहे; ते तुम्हा विश्वास ठेवणाऱ्यात कार्य करत आहे"* (1 थेस्सल 2:13). जेव्हा आपण देवाचे वचन स्वीकारतो आणि त्यावर विश्वास ठेवतो, तेव्हा ते आपल्या जीवनात देवाची अलौकिक शक्ती मुक्त करते.

शास्त्रवचनांमध्ये समाविष्ट असलेले देवाचे प्रत्येक वचन एक

चमत्कारिक बीज आहे ज्यामध्ये प्रत्येक विश्वासणाऱ्याच्या जीवनात देवाच्या गोष्टी निर्माण करण्याची क्षमता आहे. प्रत्येक बीज त्याच्या स्वतःच्या जातीनुसार उत्पादन करते (उत्पत्ती 1:11,12), देवाचा प्रत्येक शब्द, ज्यासाठी त्याची रचना केली गेली आहे, तेच साध्य करेल. आरोग्यप्राप्तीविषयीचे देवाचे वचन आरोग्य प्रदान करेल. आशीर्वाद आणि समृद्धीविषयीचे देवाचे वचन आशीर्वाद आणि समृद्धी निर्माण करेल. जीवनाच्या प्रत्येक क्षेत्राविषयीचे देवाचे वचन, आपल्या जीवनाच्या अगदी त्याच क्षेत्रात फळ निर्माण करेल.

‘वचनाचे बीज’ याविषयीचे हे सत्य मांडत असताना, आम्ही तुम्हाला याची आठवण करून देणे आवश्यक मानतो की, केवळ शास्त्रातील निवडक भागच नव्हे, तर देवाचे वचन संपूर्णपणे ऐकण्याचे आणि त्याचे पालन करण्याचेही एक तत्त्व अस्तित्वात आहे. जे लोक देवाचा संपूर्ण उपदेश ऐकतात आणि त्याचे पालन करतात, त्यांना जीवन, आरोग्य, आशीर्वाद आणि सर्वांगीण कल्याण यांचे अभिवचन देण्यात आले आहे (नीतिसूत्रे 3:1,2,7,8; नीतिसूत्रे 4:20-22).

# 5
# बीज हृदयातच पेरले गेले पाहिजे

## हृदयाची जमीन

**मार्क 4:14,15**

**14 पेरणारा वचन पेरतो.**

**15 वाटेवर वचन पेरले जाते तेथील लोक हे आहेत की, त्यांनी ऐकल्याबरोबर सैतान येऊन त्यांच्यातले पेरलेले वचन हिरावून घेतो.**

तिन्ही शुभवर्तमानातील पेरणाऱ्याच्या दृष्टान्तात नोंद आहे, हे स्पष्टपणे सांगतात की, वचनाचे बीज हृदयात पेरले गेले (मत्तय 13:19; मार्क 4:15; लूक 8:12). हृदय ही ती भूमी आहे, जेथे देवाच्या वचनाचे बीज पेरायचे आहे.

वाईन्स कम्प्लीट इक्स्पोज़िटोरी डिक्शनरी ऑफ न्यू टेस्टामेंट वर्ड्स नुसार, "हृदय" हे *"नैतिक स्वभाव आणि आध्यात्मिक जीवनाचे केंद्र; तसेच दुःख, इच्छा, स्नेहभाव, संवेदनशक्ती, विचार, आकलनशक्ती, तर्कशक्ती, कल्पनाशक्ती, हेतू, उद्देश, इच्छाशक्ती आणि विश्वास यांचे स्थान"* आहे. जुना करारामध्ये, व्यक्तीच्या नैतिक अस्तित्वाच्या संदर्भात "हृदय" या शब्दाचा वापर केला जातो; यामध्ये *"भावना, बुद्धी आणि इच्छाशक्ती"* यांचा समावेश होतो. जरी नवा करार आत्मा *('न्यूमा')* आणि जीव (*'सुके'*) यांच्यामध्ये फरक करत असला, तरी "हृदय" हा शब्द अनेकदा या दोन्हीचाही समावेश करणाऱ्या एका व्यापक अर्थाने वापरला जातो (इब्री 4:12). हृदय हे व्यक्तीच्या अंतःकरणातील गुप्त मनुष्याचे (1 पेत्र 3:4) किंवा खऱ्या व्यक्तीचे प्रतिनिधित्व करते. त्यामुळे, "वचन" हृदयात पेरले जाणे याचा अर्थ असा होतो की, ते वचन व्यक्तीच्या अंतःकरणातील गुप्त मनुष्यात म्हणजेच त्याच्या आत्मा व जीव यामध्ये,

आणि तिच्या अस्तित्वाच्या गाभ्यामध्ये स्वीकारले गेले पाहिजे.आपल्या श्रद्धा, विश्वास, इच्छा, प्रेम, धारणा, विचार, समज, तर्क, कल्पनाशक्ती, हेतू, उद्देश आणि इच्छाशक्तीच्या क्षेत्रात वचन स्वीकारले पाहिजे.

## रोवलेले वचन

**याकोब 1:21**

**म्हणून सर्व मलिनता व उचंबळून आलेला दुष्टभाव सोडून, तुमच्या जिवांचे तारण करण्यास समर्थ असे मुळावलेले वचन सौम्यतेने स्वीकारा.**

*"मुळावलेले"* (रोवलेले / रुजलेले) या शब्दामध्ये बीजाचे स्वतःला रुजवून घेणे—म्हणजेच आत खोलवर रुतणे, अंगभूत होणे आणि जमिनीमध्ये दृढपणे मूळ धरून राहणे—ही संकल्पना अंतर्निहित आहे. जमिनीतील बीजाप्रमाणेच, "वचन" देखील मानवी हृदयात कार्य करते. ते हृदयाच्या भूमीत प्रवेश करते, तेथे मूळ धरते आणि त्यानंतर अंकुरित होऊन आत्म्यास प्रभावित करते. हे सत्य पुन्हा एकदा अधोरेखित करते की, "वचन" हे आपल्या अंतर्मनात स्वीकारले गेले पाहिजे; आणि त्याला रोपण करण्याच्या आणि खोलवर रुजण्याच्या प्रक्रियेतून जाऊ दिले पाहिजे.

## तुमच्या हृदयात

**नीतिसूत्रे 4:20-23**

**20 माझ्या मुला, माझ्या वचनांकडे लक्ष लाव; माझ्या सांगण्याकडे कान दे.**

**21 ती तुझ्या डोळ्यांपुढून जाऊ देऊ नकोस; ती आपल्या अंतःकरणात ठेव.**

**22 कारण ती ज्यांना लाभतात, त्यांना ती जीवन देतात आणि त्यांच्या सबंध देहाला आरोग्य देतात.**

**23 सर्व रक्षणीय वस्तूंपेक्षा आपल्या अंतःकरणाचे विशेष रक्षण कर, कारण त्यात जीवनाचा उगम आहे.**

देवाचे वचन आपल्या अंतःकरणात स्वीकारण्याचे हे सत्य केवळ नवीन करारातीलच एक प्रकटीकरण नाही. जुन्या करारातही आपल्याला अशी उदाहरणे आढळतात, जेव्हा देवाने आपल्या

लोकांना त्याचे वचन आपल्या अंतःकरणात साठवून ठेवण्याची आज्ञा दिली होती. *"ज्या गोष्टी मी तुला आज बजावून सांगत आहे त्या तुझ्या हृदयात ठसव"* (अनुवाद 6:6; तसेच अनुवाद 11:18 देखील पाहा). स्तोत्रकर्त्याने म्हटले आहे, *"मी आपल्या मनात तुझे वचन जपून ठेवले आहे."* (स्तोत्रसंहिता 119:11).

नीतिसूत्रे 4:20-23 मधील परिच्छेद हा, देवाच्या वचनाला आपल्या हृदयात त्याचे यथायोग्य स्थान देण्याचे एक जबरदस्त पाचारण आहे.

***माझ्या वचनांकडे लक्ष दया***-आपले लक्ष वेधून घेण्यासाठी कोलाहल करणाऱ्या इतर सर्व गोष्टींपेक्षाही अधिक, आपण जाणीवपूर्वक देवाच्या वचनाकडे बारकाईने लक्ष देण्याचे निवडतो. प्रत्येक परिस्थितीत, त्या विशिष्ट बाबीबद्दल देवाचे वचन काय सांगते, तेथूनच सुरुवात करण्याचे आपण निवडतो. आपण देवाच्या वचनाला सर्वोच्च प्राधान्य देतो. देवाच्या वचनाकडे लक्ष देणे हेच होय.

***माझ्या सांगण्याकडे कान दे***-इतर अनेकजण आपली मते मांडत असताना, आपण देवाच्या बाजूस झुकतो आणि त्याला काय सांगायचे आहे, ते ऐकतो. आम्ही देवाच्या वचनाशी एकरूप होतो आणि विचलित करणाऱ्या आवाजांना दूर सारतो.

***ती तुझ्या डोळ्यांपुढून जाऊ देऊ नकोस***-आम्ही आमची दृष्टी सतत देवाच्या वचनावर खिळवून ठेवतो. आम्ही आमच्या कल्पनेच्या डोळ्यांनी देवाच्या वचनाची चित्रे रेखाटतो. आम्ही ते वचन "पाहतो". आम्ही देवाच्या वचनाला आमची कल्पनाशक्ती भरून टाकू देतो.

***आपल्या मनात वचन जपून ठेव***-याचे अंतिम उद्दिष्ट हे आहे की, आपल्या हृदयात देवाच्या वचनाचा एक समृद्ध साठा निर्माण व्हावा; जो आपल्या अंतरात्म्यास पूर्णपणे व्याप्त करील आणि आपल्या सर्व विचारांमध्ये, हेतूंमध्ये, भावनांमध्ये व तर्कशक्तीमध्ये सर्वत्र भिनून

जाईल. याचा परिणाम म्हणजे, वचनाद्वारे आपल्याला प्रदान केले जाणारे जीवन आणि आरोग्य.

देवाचे वचन आपल्या अंतःकरणात भरलेले असणे अत्यंत महत्त्वाचे आहे; कारण आपल्या जीवनात जे काही घडते, त्याचा मूळ स्रोत आणि उगमस्थान हे आपले हृदय आहे. जर आपले अंतःकरण वचनाने भरलेले असेल, तर ते वचन आपल्या जीवनामध्ये स्वतःचे जीवन आणि सामर्थ्य प्रवाहित करते. अशा प्रकारे, देवाच्या वचनाच्या सामर्थ्याद्वारे आपले जीवन प्रभावित होते, त्याला आकार मिळतो आणि ते घडवले जाते.

## वचन तुमच्या जवळ आहे

**अनुवाद 30:11-14**

**11 ही जी आज्ञा मी तुला आज देत आहे ती तुला अवघड नाही व ती तुझ्या आवाक्याबाहेर नाही.**

**12 ती स्वर्गात नाही; 'आम्ही ती पाळावी म्हणून आमच्यासाठी स्वर्गात चढून जाऊन कोण ती आमच्याकडे आणील आणि ती आम्हांला ऐकवील' असे तुला म्हणावे लागणार नाही.**

**13 ती समुद्रापलीकडे नाही; 'आम्ही ती पाळावी म्हणून समुद्रापलीकडे जाऊन आमच्यासाठी ती कोण आणील आणि आम्हांला ती ऐकवील' असे तुला म्हणावे लागणार नाही.**

**14 ते वचन तर तुझ्या अगदी जवळ, म्हणजे तुझ्या मुखात व तुझ्या अंतःकरणात आहे, म्हणून तुला त्याप्रमाणे वागता येईल.**

जर आपण देवाचे वचन आपल्या हृदयात साठवून ठेवण्याचा प्रयत्न केला असेल, तर ते वचन आपल्या नेहमीच "अगदी जवळ" असते. हृदय हे एका मोठ्या भांडारासारखे आहे, जिथे आपण देवाचे वचन साठवू शकतो. हृदयात जे भरलेले असते, तेच मुखावाटे बाहेर पडते. जेव्हा वचन आपल्या हृदयात आणि मुखात भरलेले असते, तेव्हा आपण कधीही निराशा किंवा हताशेचे शब्द उच्चारणार नाही. आपल्या बोलण्यातून निराशा व्यक्त होणार नाही, जणू काही देव आणि त्याचे

वचन दूर, स्वर्गात किंवा समुद्राच्या पलीकडे आहेत. जेव्हा देवाचे वचन आपले अंतःकरण आणि आपले मुख भरून टाकते, तेव्हा आपण त्या वचनानुसार जीवन जगतो आणि कृती करतो. विशेष म्हणजे, प्रेषित पौल अनुवाद 30:11-14 मधील हाच उतारा रोमकरांस पत्र 10:6-8 मध्ये पुनरावृती करतो आणि तो आम्हा नव्या करारातील विश्वासणाऱ्यांना उद्देशून सांगतो. म्हणूनच, देवाचे वचन आपल्या अंतःकरणात आणि मुखात साठवून ठेवण्याचे जे मूलभूत सत्य आहे, त्याचे आपण, म्हणजेच नव्या करारातील विश्वासणाऱ्यांनी देखील आपल्या जीवनात नक्कीच पालन केले पाहिजे.

## मननाद्वारे

मग आता मोठा प्रश्न असा निर्माण होतो की, आपण देवाच्या वचनाचे आपल्या अंतःकरणात मोठ्या प्रमाणात कसे साठवून ठेवू शकतो? पेरणाऱ्याच्या दृष्टांतात पेरणाऱ्याची बी पेरण्याची तुलना वचन ऐकण्याशी करण्यात आली आहे. आणि आपल्याला हे माहीत आहे की, केवळ बी पेरून भागत नाही; तर ते जमिनीत रुजणे आणि त्यातून अंकुर फुटणेही आवश्यक असते. त्याचप्रमाणे, देवाचे वचन देखील आपल्या अंतःकरणात खोलवर रुजले पाहिजे. हे साध्य आपण कसे करू शकतो?

पेरणाऱ्याच्या दृष्टांतात जरी हे सांगितलेले नसले तरीही, जर आपण पवित्र शास्त्राच्या शिकवणीशी सुसंगत राहिलो तर, आपल्याला असे आढळून येते की देवाच्या वचनावर मनन करण्याच्या सवयीद्वारे हे शक्य आहे.

देवाच्या वचनावर मनन करणे ही एक अशी प्रक्रिया आहे ज्याद्वारे आपण आपल्या हृदयात वचनाचा एक समृद्ध साठा जमा करतो. आपण वचन ऐकतो आणि ग्रहण करतो यासाठी की ते वचन आपल्या अंतकरणात रुजले जावे, त्याचे पोषण संगोपन व्हावे आणि आपल्या

जीवनात त्याद्वारे फळ निर्माण व्हावे.

जेव्हा आपण स्वतःला वचनावर मनन करण्याची शिस्त लावतो आणि आपल्या हृदयात वचन साठवून ठेवतो तेव्हा आपल्याला तेव्हा आपल्याला कोणत्याही वेळी आणि कोणत्याही ठिकाणी त्याचे वचन सहजपणे उपलब्ध होते. आपल्या अंतःकरणात साठलेल्या वचनाच्या साठ्यातून, आपण आपल्या मुखावाटे शब्द बाहेर काढू शकतो. आपण जे काही आत साठवले आहे, तेच आपण बोलून दाखवतो. जेव्हा वचन आपल्या मुखात आणि अंतःकरणात वसते, तेव्हा ते आपल्या अगदी जवळचे बनते. आणि चक्रीय पद्धतीने, हे आपल्याला जवळजवळ कुठेही आणि कधीही देवाच्या वचनावर मनन करण्यास सक्षम करते. आदर्श परिस्थितीमध्ये, आपल्याला एखादी शांत आणि कोणत्याही अडथळ्यापासून दूर असलेली जागा हवी असते; जेथे बसून, आपण पवित्र शास्त्र समोर उघडे ठेवून मनन करू शकतो. तथापि, जर आपण त्याचे वचन आपल्या अंतःकरणात साठवून ठेवले असेल, तर आपण कोणत्याही ठिकाणी, अगदी एखाद्या गजबजलेल्या रस्त्यावरून चालताना किंवा महामार्गावरून गाडी चालवताना देखील वचनावर मनन करू शकतो.

पुढील प्रकरणामध्ये, आपण देवाच्या वचनावर मनन करण्याच्या पवित्र शास्त्र-आधारित प्रक्रियेचा सखोल अभ्यास करणार आहोत.

# 6
# देवाच्या वचनावर मनन करणे

मागील प्रकरणांमध्ये, आपण या गोष्टीवर भर दिला आहे की, देवाचे वचन हाच आपल्या विश्वासाचा मूळ स्रोत आणि पाया आहे. आपण देवाच्या वचनाची शुद्धता आणि सामर्थ्य याचे परीक्षण केले. आपण हे सत्य मांडले की, देवाचे वचन हे देवाच्या सामर्थ्याने परिपूर्ण आहे आणि हे सामर्थ्य आपल्या जीवनात मुक्त केले जाऊ शकते. आम्ही हे देखील समजून घेतले आहे की देवाचे वचन एका बीजासारखे आहे, जे आपल्या अंतःकरणात पेरून त्याचे संगोपन केल्यावर, आपल्या जीवनात आपली परिवर्तन घडवणारी शक्ती प्रकट करेल. आता आपण देवाच्या वचनावर मनन करण्याच्या शिस्तीचा अभ्यास करण्यासाठी एक पाऊल पुढे टाकूया. मनन ही अशी एक प्रक्रिया आहे, ज्याद्वारे आपण आपल्या अंतःकरणात देवाच्या वचनाचे बीज पेरतो आणि त्याचे संगोपन करतो.

सामान्यतः जेव्हा आपण "मनन" या शब्दाचा उल्लेख करतो, तेव्हा लोकांच्या मनात साधारणपणे तपस्वींसाठी असलेल्या एखाद्या गूढ साधनेचा विचार येतो. कदाचित याच कारणामुळे, मंडळीमध्ये सामान्यतः मनन करण्याच्या सरावावर विशेष भर दिला जात नाही. जगभरातील अनेक संस्कृतींमध्ये ध्यान-मननाच्या प्रक्रियेच्या पद्धतीत विविधता आहे, हे जरी खरे असले, तरी आमचा हेतू मात्र ध्यान-मननाचा एक पवित्र शास्त्रीय दृष्टिकोन मांडणे हे आहे. विश्वासणारे म्हणून, आपण याचे महत्त्व समजून घेतले पाहिजे आणि आपल्या विश्वासाच्या वाटचालीत या शिस्तीचा विकास केला पाहिजे.

# मनन-शास्त्रशुद्ध शिस्त

**उत्पत्ती 24:63अ**

**इसहाक संध्याकाळच्या वेळी ध्यान करायला रानात गेला असता...**

पवित्रशास्त्रामध्ये "मनन करणे" या शब्दाचा सर्वात पहिला उल्लेख इसहाकाच्या संदर्भात उत्पत्ती च्या पुस्तकात आढळतो. इसहाक कोणत्या विषयावर किंवा कसे मनन करत होता, याविषयी यात फारशी माहिती मिळत नसली, पवित्र शास्त्रामध्ये प्राचीन काळी मननाचा सराव केला जात असे, ही बाब लक्षात घेण्यासारखी आहे. शिवाय, इसहाक ध्यान करण्यासाठी शेतात गेला; यावरून आपल्याला हे समजते की, साधारणपणे ध्यानासाठी योग्य वातावरण निर्माण करण्याकरिता, एखादी व्यक्ती सर्व प्रकारचे व्यत्यय आणि अडथळे दूर करण्यास पसंती देते.

**यहोशवा 1:8**

**नियमशास्त्राचा हा ग्रंथ तुझ्या मुखी सदैव असू दे; त्यात जे काही लिहिले आहे ते तू काळजीपूर्वक पाळ आणि रात्रंदिवस त्याचे मनन कर, म्हणजे तुझा मार्ग सुखाचा होईल व तुला यशःप्राप्ती घडेल.**

मननाविषयीचे सुप्रसिद्ध वचन म्हणजे यहोशवा 1:8 आहे. परमेश्वराने आपला सेवक मोशे याच्याद्वारे त्याचे लोक इस्राएल यांना नियमशास्त्र दिले होते. देवाची नियमशास्त्रे आपल्याला देण्यात आली आहेत, हा किती मोठा विशेषाधिकार आहे, हे मोशेने इस्राएल लोकांच्या मनावर ठसवले होते. उदाहरणार्थ, मोशेने इस्राएल लोकांस संबोधित केलेल्या या वचनांचा विचार करा.

**अनुवाद 4:5-8**

**5पाहा, ज्या देशाचे वतन मिळवायला तुम्ही जात आहात त्यात पाळण्यासाठी आपला देव परमेश्वर ह्याच्या आज्ञेप्रमाणे मी तुम्हांला विधी व नियम शिकवले आहेत त्याप्रमाणे तुम्ही चालावे.**
**6तुम्ही ते काळजीपूर्वक पाळावेत; कारण त्यामुळे देशोदेशीच्या लोकांच्या दृष्टीला तुम्ही सुज्ञ व समंजस असे दिसाल; त्या सर्व विधींसंबंधी ऐकून ते**

**म्हणतील की, 'हे महान राष्ट्र खरोखर बुद्धिमान व समंजस लोकांचे आहे. [7]कारण आमचा देव परमेश्वर ह्याचा आम्ही धावा करतो तेव्हा तो आमच्याजवळ असतो. ह्याच्यासारखे देव जवळ असणारे महान राष्ट्र दुसरे कोणते आहे? [8]हे सारे नियमशास्त्र मी आज तुम्हांला देत आहे. त्यातल्यासारखे यथार्थ विधी व नियम असणारे महान राष्ट्र दुसरे कोणते आहे?**

या व्यतिरिक्त, प्रभुने त्याच्या लोकांना सतत आठवण करून दिली की त्याची इच्छा आहे की त्यांनी त्याच्या वचनाची त्यांच्या हृदयात साठवणूक करावी आणि त्यांचे सतत पालन करावे. वेळोवेळी, आपण अशी विधाने आम्हाला वाचावयास मिळतात, जसे की, *"ज्या गोष्टी मी तुला आज बजावून सांगत आहे त्या तुझ्या हृदयात ठसव"* (अनुवाद 6:6). आणि *"म्हणून तुम्ही माझी ही वचने आपल्या ध्यानीमनी साठवून ठेवा"* (अनुवाद 11:18). इस्राएलच्या नेतृत्वाची जबाबदारी आता सांभाळणाऱ्या यहोशवाला तीच सूचना पुन्हा पुन्हा दिली जात होती. परमेश्वर यहोशवाला एक विशेष कामगिरी सोपवत होते आणि त्याला सांगत होते की, त्याने खंबीर व धैर्यवान व्हावे, तसेच मोशेद्वारे दिलेल्या संपूर्ण नियमशास्त्राचे काळजीपूर्वक पालन करावे (यहोशवा 1:7). त्यानंतर परमेश्वराने यहोशवाला एक अशी शिस्त सांगितली, ज्याद्वारे तो देवाचे वचन त्याच्या अंतःकरणात साठवून ठेवू शकेल आणि त्याचे काळजीपूर्वक पालन करू शकेल. परमेश्वराने यहोशवाला सांगितले, *"नियमशास्त्राचा हा ग्रंथ तुझ्या मुखी सदैव असू दे; त्यात जे काही लिहिले आहे ते तू काळजीपूर्वक पाळ आणि रात्रंदिवस त्याचे मनन कर, म्हणजे तुझा मार्ग सुखाचा होईल व तुला यशःप्राप्ती घडेल"* (यहोशवा 1:8अ).

हे लक्षात घेणे मनोरंजक आहे की, यहोशवाला देवाच्या वचनावर रात्रंदिवस मनन करण्याची आज्ञा देणारा स्वतः परमेश्वरच होता. म्हणूनच, देवाच्या वचनावर मनन करणे ही स्वतः देवानेच सांगितलेली आणि प्रोत्साहित केलेली एक शिस्त आहे. ही एक शिस्त आहे, जी आपण पाळावी अशी देवाची इच्छा आहे.

या प्रक्रियेकडे लक्ष द्या...

1) नियमशास्त्राच्या ग्रंथातील शब्द त्याच्या मुखात असावेत अर्थात त्याच्या संभाषणाचा एक भाग असावेत. ( *"नियमशास्त्राचा हा ग्रंथ तुझ्या मुखी सदैव असू दे"* (यहोशवा 1:8अ).)

2) त्याने वचनावर सतत मनन करावे. (*"रात्रंदिवस त्याचे मनन कर"* (यहोशवा 1:8अ).)

मनन ही पवित्र शास्त्रामध्ये आपल्याला दिलेली अशी एक शिस्त आहे, जी आपल्याला देवाचे वचन आपल्या अंतःकरणात (आत्म्यात) आणि जीवात (मनात) साठवून ठेवण्यास मदत करते. मननाचे इतरही अनेक उल्लेख आहेत, विशेषतः स्तोत्रसंहितेत. स्तोत्रसंहिता 1 हा शास्त्राचा एक सुप्रसिद्ध परिच्छेद आहे जो आपल्याला नीतिमान माणसाच्या शिस्तीबद्दल शिकवतो. तो आपल्याला सांगतो की असा माणूस दुर्जनाच्या मसलतीने चालत नाही, पापी लोकांच्या मार्गाचे अनुसरण करत नाही आणि निंदकांच्या कार्यात सहभागी होत नाही. *"तर परमेश्वराच्या नियमशास्त्रात रमतो, त्याच्या नियमशास्त्राचे रात्रंदिवस मनन करतो, तो धन्य"* (स्तोत्रसंहिता 1:2). त्याची नीतिमत्वाची शिस्त आणि वचनावर सतत मनन केल्याने तो जे काही करतो त्यात तो फलदायी, संपन्न आणि समृद्ध होऊ शकतो (स्तोत्रसंहिता 1:3).

शास्त्रवचनातील मनन हे केवळ देवाच्या वचनावर मनन करण्यापुरते मर्यादित नाही. आपल्याला इतर विषय किंवा मुद्दे सापडतात ज्यांवर आपण मनन करू शकतो. उदाहरणार्थ, आपण स्वतः प्रभूवर चिंतन-मनन करू शकतो. प्रभू, त्याचे चरित्र आणि त्याचे गुण आपल्या चिंतनाचे केंद्रबिंदू बनतात. इस्राएलचा मधुर स्तोत्रकर्ता दावीदाने म्हटले, *"मी रात्री आपल्या अंथरुणावर पडून तुझे स्मरण करतो, व प्रहरोप्रहरी तुझे ध्यान करीत असतो"* (स्तोत्रसंहिता 63:6). दुसरा स्तोत्रकर्ता लिहितो, *"परमेश्वराच्या ठायी मला हर्ष होईल.मी*

*केलेले त्याचे मनन त्याला गोड वाटो"* (स्तोत्रसंहिता 104:34).

आपण आपल्या जीवनात प्रभूने केलेल्या अद्‌त गोष्टींवर देखील मनन करू शकतो. दावीद म्हणाला, *"मी प्राचीन काळचे दिवस मनात आणतो; तुझ्या सर्व कृत्यांचे मनन करतो; तुझ्या हातच्या कृतींचे चिंतन करतो"* (स्तोत्रसंहिता 143:5). इस्राएलचा आणखी एक स्तोत्रकर्ता आसाफ याने लिहिले, *"मी तुझ्या सर्व कृत्यांचे मननही करीन आणि तुझ्या महत्कृत्यांचा विचार करीन"* (स्तोत्रसंहिता 77:12). आपण ज्ञान आणि समजाच्या बाबींवर चिंतन आणि मनन देखील करू शकतो. स्तोत्रकर्त्याने लिहिले,*"अहो सर्व लोकहो, हे ऐका; जगात राहणारे उच्च व नीच, श्रीमंत व दरिद्री लोकहो, तुम्ही सर्व कान द्या. माझे मुख ज्ञान वदणार आहे; माझ्या मनचे विचार सुज्ञतेचे असणार."* (स्तोत्रसंहिता 49:1-3).

## मनन-बायबलचा दृष्टिकोन

मनन ही पवित्र शास्त्राची पद्धत आहे आणि खरोखरच स्वतः देवाने त्यास प्रोत्साहन दिले आहे, आणि हीच पद्धत आहे ज्याद्वारे आपण देवाचे वचन आपल्या हृदयात साठवू शकतो हे समजल्यानंतर, आपले पुढील उद्दिष्ट मनन कसे करावे हे शिकणे आहे.

जुन्या करारात "मनन" या शब्दासाठी दोन मुख्य हिब्रू शब्द वापरले आहेत. *'हागाह'* या हिब्रू शब्दाचा अर्थ "चिंतन करणे, कल्पना करणे, मनन करणे, कण्हणे, गुरगुरणे, पुटपुटणे, कुजबुजणे, उसासा टाकण्यासारखा शांत आवाज काढणे, शब्दांची पुनरावृत्ती करत एखाद्या गोष्टीवर विचार करणे." असा होतो. स्तोत्रसंहिता 119 मध्ये प्रामुख्याने वापरल्या जाणाऱ्या *'सियाच'* या दुसऱ्या हिब्रू शब्दाचा अर्थ पुन्हा एकदा "चिंतन करणे, म्हणजेच, स्वतःशी संवाद साधणे (आणि म्हणूनच, मोठ्याने बोलणे), उच्चारणे, संवाद साधणे, तक्रार करणे, घोषणा करणे, मनन करणे, प्रार्थना करणे, बोलणे किंवा संभाषण

करणे" असा होतो. द स्पिरिट-फिल्ड लाईफ बायबलमध्ये पहिल्या शब्दावर पुढील टिप्पण्या आहेत. त्यात म्हटले आहे की, *"हागाह हे इंग्रजी "मनन" पेक्षा अगदी वेगळे असे काहीतरी दर्शवते, जे कदाचित फक्त एक मानसिक व्यायाम असू शकते. इब्री विचारसरणीनुसार, शास्त्रवचनांवर मनन करणे म्हणजे बाहेरील विचलित करणाऱ्या गोष्टींना पूर्णपणे सोडून देऊन, त्यांना शांतपणे सौम्य, गुणगुणणाऱ्या आवाजात त्यांचे पठण करणे होय. या परंपरेतून "डेव्हनिंग" नावाची एक विशेष प्रकारची यहूदी प्रार्थना उदयास आली आहे, म्हणजेच ग्रंथांचे पठण करणे, अत्यंत तल्लीन होऊन प्रार्थना करणे, किंवा वाकत-झुकत अथवापुढे-मागे डोलत असताना देवाशी एकरूप होऊन जाणे. स्पष्टतः मनन आणि प्रार्थना यांचे हे उत्साही स्वरूप दाविदाच्या काळापासून चालत आले आहे"* (पृष्ठे 753-754, थॉमस नेल्सन पब्लिशर्स, 1991).

मनन ही मूलतः मानवी आत्म्याची एक क्रिया आहे जी प्राणाप्रत (विचार, बुद्धी, कल्पनाशक्ती, भावना आणि इच्छाशक्तीचे केंद्र) जाऊन पोहोचते आणि भौतिक शरीरावर परिणाम करते. शिक्षण देण्यासाठी, आपण मनन प्रक्रियेचा सारांश तीन शब्दांत देऊ इच्छितो-**चिंतन, कल्पनाचित्र रंगवणे** आणि **पत्कर** अथवा **अंगीकार**. कोणत्याही वेळी, ध्यान करताना, एखादी व्यक्ती या तीनपैकी कोणत्याही एका किंवा अधिक प्रक्रियांमध्ये सहभागी होऊ शकते. एखादी व्यक्ती एखाद्या विशिष्ट विषयावर खोलवर चिंतन करू शकते, किंवा एखाद्या विशिष्ट विषयावर मनन आणि कल्पना करू शकते, किंवा अंगीकारात सहभागी होऊ शकते.

या प्रत्येकाचा सविस्तर विचार करूया.

## मनन-स्वतःमध्ये विचार करणे

**स्तोत्रसंहिता 143:5**

**मी प्राचीन काळचे दिवस मनात आणतो; तुझ्या सर्व कृत्यांचे मनन करतो; तुझ्या हातच्या कृतींचे चिंतन करतो.**

मननाचा हा पैलू आपल्या विचारांस व बुद्धीस खिळवून ठेवतो. आपण एखाद्या विशिष्ट विषयावर मनन करतो, चिंतन करतो आणि सखोल विचार करतो. उदाहरणार्थ, जर आपण वचनातील एखाद्या विशिष्ट विषयावर, उदाहरणार्थ दैवी आरोग्यप्राप्तीवर, चिंतन करत असाल आणि आपण यशया 53:4 हे वचन शास्त्रवचन म्हणून निवडले असेल, तर मनन करताना आपण या वचनाचा अर्थ, त्याचे महत्त्व आणि त्याचे परिणाम विचारात घेऊ शकतो. आपण हे ओळखतो की येशूने आपले सर्व आजार सहन केले आणि आपले सर्व दुःख वाहून नेले. त्याने ते आमचा प्रतिनिधी म्हणून केले आणि म्हणूनच, आपल्याला आता ते सहन करण्याची गरज नाही. आपण स्वतः समजून घेतो आणि त्यांवर विचार करतो. आपण आपल्या दैनंदिन जीवनात त्यांचा कसा उपयोग होईल, याचा आपण सखोल विचार करतो. आपण पूर्वी असलेल्या चुकीच्या कल्पना आणि विचारांची तपासणी करतो आणि त्यांना दूर करण्यास सुरुवात करतो.

आमचा विश्वास आहे की, जेव्हा आपण देवाच्या वचनाचे सखोल मनन करण्यात वेळ घालवतो, तेव्हा देवाच्या आत्म्याला आनंद होतो. कित्येकदा, जेव्हा आपण आमचे लक्ष वेधून घेणाऱ्या सर्व बाह्य गोष्टींपासून स्वतःला वेगळे करतो आणि चिंतनात आपले मन वचनावर केंद्रित करतो, तेव्हा प्रभूचा आत्मा आपल्या विचार प्रक्रियेत आपल्याला हळूवारपणे घेऊन जातो. तो आपल्या मनात नवीन कल्पना आणि अंतर्दृष्टी रोवून आपल्या विचारांना प्रेरणा देतो आणि निर्देशित करतो. प्राचीन काळातील लोकांना शास्त्रवचने लिहिण्याची प्रेरणा कशी मिळाली याचे वर्णन करताना प्रेषित पेत्र म्हणाला, *"कारण संदेश मनुष्यांच्या इच्छेने कधी आलेला नाही; तर पवित्र आत्म्याने प्रेरित झालेल्या पवित्र मनुष्यांनी देवापासून आलेला संदेश सांगितला आहे"* (2 पेत्र 1:21). *"प्रेरित झालेला"* हा शब्द ग्रीक शब्द *'फेरो'* पासून आला आहे ज्याचा अर्थ *"सोबत घेऊन जाणे, वाहून नेणे"* असा होतो. द व्हाइन डिक्शनरीमध्ये जुन्या करारातील या संदेष्ट्यांबद्दल पुढील

टिप्पण्या आहेत. त्यात म्हटले आहे की, *“ते पवित्र आत्म्याच्या सामर्थ्याने “वाहून” गेले किंवा प्रेरित झाले, त्यांनी स्वतःच्या इच्छेनुसार कार्य केले नाही किंवा फक्त त्यांचे स्वतःचे विचार वापरले नाहीत, तर देवाचे मन त्याने दिलेल्या आणि प्रकट केलेल्या शब्दांमध्ये व्यक्त केले”* (पृष्ठ 420, थॉमस नेल्सन पब्लिशर्स, 1985).

संदेष्ट्ये त्यांच्या स्वतःच्या समजापलीकडे असलेल्या गोष्टींबद्दल इतके बोलले की त्यांना शोध घ्यावा लागला. *“त्यांच्यामध्ये जो ख्रिस्ताचा आत्मा होता त्याने ख्रिस्ताची दुःखे व त्यानंतरच्या गौरवयुक्त गोष्टी पूर्वीच सांगितल्या; त्यांत त्याने कोणता अथवा कसा काळ सुचवला ह्याविषयी ते शोध करत होते”* (1 पेत्र 1:11). त्याचप्रमाणे, वचनाचे मनन करत असताना पवित्र आत्मा आपल्या विचारांना मार्गदर्शन करतो. पवित्र आत्मा आपला शिक्षक आहे. येशूने म्हटले की पवित्र आत्मा येशूला जे बोलताना ऐकतो तेच तो आपल्याला सांगेल (योहान 16:12-15). जेव्हा आपण स्वतःला सर्व विचलित करणाऱ्या गोष्टींपासून वेगळे करून वचनावर मनन करतो तेव्हा असे अनेकदा घडते. अहा! हा किती विलक्षण अनुभव आहे जेव्हा आपण वचनाचे गहन चिंतन करत असतो, तेव्हा “प्रभूचा हात”, जो मधुर पवित्र आत्मा आहे, तो हळुवारपणे आपल्यावर उतरतो आणि आपल्या विचारांना मार्गदर्शन करू लागतो. बरेचदा, प्रभूची उपस्थिती इतकी प्रबळ असते की तो देत असलेल्या अद्‌त प्रकाशनामुळे आणि नवीन समजामुळे आपल्या डोळ्यांत आनंदाचे आणि कृतज्ञतेचे अश्रू ओघळू लागतात.

चिंतन आपल्या विचारसरणीवर प्रभाव टाकते. ते देवाच्या वचनाने नवीकरण केलेले मन उत्पन्न करते. पवित्र शास्त्र आपल्याला आपल्या मनाच्या नवीकरणाबद्दल शिकवते (रोमकरांस पत्र 12:2अ). आम्हास आज्ञा देण्यात आली आहे की आपण आपल्या मनावृत्तीत नवे व्हावे (इफिसकरांस पत्र 4:23). ज्या व्यक्तीचे मन देवाच्या संपूर्ण योजनेनुसार (देवाच्या संपूर्ण वचनानुसार) नवीन झाले आहे, ती व्यक्ती *“देवाची*

*उत्तम, ग्रहणीय व परिपूर्ण इच्छा काय आहे"* (रोमकरांस पत्र 12:2ब) हे जाणण्यास सक्षम आहे. देवाच्या वचनातील मनन / चिंतनाच्या शिस्तबद्ध सरावाद्वारे, आमच्या *"ज्ञानेंद्रियांना वहिवाटीने चांगले आणि वाईट समजण्याचा सराव झाला आहे"* (इब्री 5:14ब).

## कल्पनाचित्र रंगवणे

**उत्पत्ती 15:1-6**

**1 ह्या गोष्टी घडल्यावर अब्रामाला दृष्टान्तात परमेश्वराचे वचन प्राप्त झाले ते असे "अब्रामा, भिऊ नको. मी तुझी ढाल आहे, तुला मोठे प्रतिफळ मिळेल."**
**2 अब्राम म्हणाला, "हे प्रभू, परमेश्वरा, तू मला काय देणार? मी तर नि:संतान जाणार आणि दिमिष्की अलियेजर माझ्या घराचा मालक होणार."**
**3 अब्राम आणखी म्हणाला, "आणि पाहा, तू मला काही संतान दिले नाहीस तर माझ्या घरात जन्मलेला दास माझा वारस होणार."**
**4 तेव्हा परमेश्वराचे वचन त्याला प्राप्त झाले की, "हा मनुष्य तुझा वारस होणार नाही, तर तुझ्या पोटचाच तुझा वारस होईल."**
**5 मग त्याने त्याला बाहेर आणून म्हटले, "आकाशाकडे दृष्टी लाव; तुला हे तारे मोजवतील तर मोज." मग त्याने त्याला सांगितले, "तुझी संतती अशीच होईल."**
**6 अब्रामाने परमेश्वरावर विश्वास ठेवला आणि अब्रामाचा हा विश्वास परमेश्वराने त्याचे नीतिमत्त्व गणला.**

देवाने अब्रामाला एका महान राष्ट्राचा पिता बनवण्याचे अभिवचन दिले होते त्या काळापासून अनेक वर्षे निघून गेली होती. सारा आणि अब्रामास अजूनही संतती नव्हती आणि साहजिकच ही त्यांच्यासाठी चिंतेची बाब होती. या काळात, परमेश्वर अब्रामला मूळ अभिवचनाची खात्री देण्यासाठी त्याच्याशी बोलला. परमेश्वराने काय केले ते काळजीपूर्वक पहा. एके रात्री प्रभू अब्रामास घराबाहेर घेऊन गेला. त्याने त्यास सांगितले, *"आकाशाकडे दृष्टी लाव; तुला हे तारे मोजवतील तर मोज."* मग त्याने अब्राहामाला सांगितले, *"तुझी संतती अशीच होईल"* (उत्पत्ती 15:5). प्रत्यक्षात, देव अब्रामाला त्याच्या अभिवचनाचे कल्पनाचित्र किंवा चित्र देत होता. अब्राम त्याच्या कल्पनेने हे चित्र वारंवार पाहू शकत होता की देवाच्या वचनाची

पूर्तता कशी असेल. नंतर, परमेश्वराने अब्राहामाला असेही म्हटले *"ह्यास्तव मी तुला आशीर्वादित करीन व वृद्धीच वृद्धी करून तुझी संतती आकाशातील ताऱ्यांइतकी, समुद्रतीरीच्या वाळूइतकी होईल असे करीन"* (उत्पत्ती 22:17).

व्हिज्युअलायझेशन अर्थात कल्पनाचित्र रंगवणे ही एक महत्त्वाची प्रक्रिया आहे जिचे आपण मनन करतांना पालन करतो. देवाचे वचन आपल्याला काय सांगत आहे हे आपण आपल्या कल्पनाशक्तीच्या सामर्थ्याने पाहतो. उदाहरणार्थ, जर आपण आजारी असलो तर आपण स्वतःला बरे आणि निरोगी पाहतो. आपण स्वतःला असे पाहतो जसे वचन आपल्याला सांगते आणि ते करतांना पाहतो जसे वचन आपल्याविषयी सांगते. ध्यान-मननाच्या प्रक्रियेत व्हिज्युअलायझेशन आपल्या कल्पनाशक्तीस कामी लावते.

सर्वसाधारणपणे, मंडळीने कल्पनाशक्तीचा वापर करण्याकडे दुर्लक्ष केले आहे. दुसरीकडे, हे जग प्रसारमाध्यमांतील जाहिराती, छापील जाहिराती आणि अशाच इतर माध्यमांतून आपल्या कल्पनाशक्तीवर सतत प्रभाव टाकत असते. कल्पनाशक्ती हा आपल्या अस्तित्वाचा एक महत्त्वाचा भाग आहे. देवाने ते घडवले आहे आणि आपल्याला उपयोग करण्यासाठी ती दिली आहे. आपली कल्पनाशक्ती आपल्या वर्तनावर आणि आपण घेत असलेल्या निर्णयांवर प्रभाव टाकते. ती आपल्या जीवनाच्या दृष्टिकोनावर प्रभाव पाडते आणि आपला आत्मसन्मान ठरवते. अनेक लोक स्वतःच्या एका कमकुवत प्रतिमेमुळे (किंवा स्वतःविषयीच्या एका चुकीच्या "कल्पनेमुळे") त्रस्त असतात; ही प्रतिमा त्यांना लोकांची भीती, अज्ञात गोष्टींची भीती, जोखीम पत्करण्याची भीती यांसारख्या गोष्टींनी जखडून ठेवते, किंवा मग त्यांच्या मनात न्यूनगंडाची भावना निर्माण करते—आणि अशाच प्रकारे इतरही अनेक नकारात्मक परिणाम घडवून आणते. तथापि, जेव्हा आपण देवाच्या वचनावर मनन करतो आणि देव आपल्याबद्दल

जे सांगतो, तसे आपण स्वतःला पाहू (कल्पना करू लागतो) लागतो, तेव्हा आपली स्वतःबद्दलची प्रतिमा बदलू लागते. खरे म्हणजे, केवळ आपली स्वतःची प्रतिमाच नाही तर जीवनाबद्दलचा आणि आपल्या सभोवतालच्या परिस्थितीबद्दलचा आपला संपूर्ण दृष्टिकोन बदलू लागतो.

गणना 13 मध्ये आढळणारी एक परिचित जुन्या कराराची घटना येथे एक उत्तम उदाहरण ठरते. प्रभूने आपल्या लोकांना कनान देश वारसा म्हणून देण्याचे अभिवचन देऊन मिसरच्या गुलामगिरीतून बाहेर काढले होते. वचनदत्त देशात प्रवेश करण्याच्या तयारीत, प्रभूने मोशेला प्रत्येकी 12 वंशातील एक पुढारी, याप्रकारे 12 पुरुषांना, देश हेरण्यासाठी पाठवण्याची आज्ञा दिली. त्या 12 पुरुषांनी 40 दिवस देशाचा शोध घेतला. त्यानंतर ते परत आले आणि आपला अहवाल सादर केला. त्या सर्वांनी मान्य केले की हा देश फलदायी आणि समृद्ध आहे. तथापि, त्यापैकी 10 जण त्या देशात राहणाऱ्या महाकाय लोकांस घाबरले. ते म्हणाले, *"पण जे पुरुष त्याच्याबरोबर गेले होते ते म्हणाले, "त्या लोकांवर स्वारी करण्यास आपण मुळीच समर्थ नाही, कारण ते आपल्याहून बलाढ्य आहेत." त्याचप्रमाणे जो देश हेरून ते आले होते त्याविषयी इस्राएल लोकांना त्यांनी अनिष्ट बातमी दिली; ते म्हणाले, "जो देश हेरण्यासाठी आम्ही गेलो होतो तो तेथील रहिवाशांना ग्रासून टाकणारा आहे; तेथे आम्ही पाहिलेले सर्व लोक मोठे धिप्पाड आहेत. तेथे नेफिलीम म्हणजे नेफिली घराण्यातील अनाकाचे वंशज आम्ही पाहिले; त्यांच्यापुढे आम्ही स्वतःच्या दृष्टीने टोळांसारखे दिसलो आणि त्यांनाही तसेच भासलो"* (गणना 13:31-33). त्यांच्यापैकी केवळ दोघा जणांनी सकारात्मक समाचार दिला आणि म्हटले, *"आपण त्या देशावर आताच्या आता हिम्मत धरून चढाई करून जाऊ आणि तो घेऊ; कारण तो जिंकण्यास आपण पूर्णपणे समर्थ आहोत"* (गणना 13:30). या सर्व 12 पुरुषांनी एकसारखेच दानव पाहिले असतील, परंतु त्यांची प्रतिक्रिया वेगळी होती. त्यापैकी दोघांना विश्वास होता कारण त्यांना

आठवले की देव त्यांच्यासोबत आहे (गणना 14:6-9). इतर 10 जणांनी त्यांच्या नकारात्मक कल्पनाशक्तीला वर्चस्व दिले. त्यांनी आपल्या कल्पनेच्या डोळ्यांनी जे पाहिले, तेच त्यांना दुर्बल करणारे ठरले. त्यांनी स्वतःला दानवांसमोर लहान टोळांसारखे चित्रित केले. यामुळे ते भयभीत झाले आणि देवावरील त्यांचा विश्वासही उडाला. दुर्दैवाने, अनेक ख्रिस्ती लोक या 10 पुरुषांप्रमाणेच जीवनातील परिस्थितींतून जातात. ते त्यांच्या अंतःचक्षूंनी-त्यांच्या कल्पनाशक्तीने-जे पाहतात ते त्यांना विश्वासाचे जीवन जगण्यापासून आणि प्रभूच्या समृद्ध आशीर्वादांचा उपभोग घेण्यापासून परावृत्त करते. तथापि, ध्यान-मननाच्या शिस्तीद्वारे आपण आपल्या कल्पनाशक्तीच्या भिंतींवर नवीन चित्रे रंगवू शकतो.

हे लक्षात घेण्यासारखे आहे की पवित्र शास्त्रात अनेक ठिकाणी-विशेषतः जुन्या करारात-देव आपण जे पाहतो, याच्याशी व्यवहार करतो. जुन्या करारात त्याने आपल्या करारातील लोकांना असा एक आदेश दिला होता ज्यात म्हटले आहे, *"म्हणून तुम्ही माझी ही वचने आपल्या ध्यानीमनी साठवून ठेवा, ती चिन्हांदाखल आपल्या हातांना बांधा आणि आपल्या डोळ्यांच्या मध्यभागी कपाळपट्टी म्हणून लावा"* (अनुवाद 11:18; पहा अनुवाद 6:8; निर्गम 13:9,16). एकेकाळी लोक पवित्र शास्त्राचा काही भाग आपल्या डाव्या हाताला आणि कपाळाभोवती बांधत असत आणि अशाप्रकारे या आज्ञेचे पालन करीत. "चिन्ह" या शब्दाचा एक अर्थ "दृश्यमान चित्रण" असा आहे. देवाची इच्छा होती की त्याच्या लोकांकडे त्याच्या वचनाची आणि त्याने त्यांच्यासाठी केलेल्या कार्याची एक दृश्य आठवण असावी. देवाला त्यांनी जे पाहिले ते प्रभावित करायचे होते कारण त्यांनी जे पाहिले ते त्यांच्या स्मृतीस प्रभूच्या कृत्यांची आठवण करून देणार होते. नवीन करारात अशी प्रथा नसली तरी, आपल्याला वैयक्तिकरित्या असे वाटते की आपल्या कल्पनांच्या भिंतींवर देवाचे वचन रंगवले पाहिजे जेणेकरून आपल्याला ते सतत "दिसू" शकेल आणि देवाच्या समृद्ध

अभिवचनांची आठवण करता येईल. जुन्या करारातील एका परिचित उताऱ्यात, प्रभू म्हणतो, *"माझ्या मुला, माझ्या वचनांकडे लक्ष लाव; माझ्या सांगण्याकडे कान दे. ती तुझ्या डोळ्यांपुढून जाऊ देऊ नकोस"* (नीतिसूत्रे 4:20,21अ). पुन्हा एकदा, आपल्याला एक आज्ञा मिळते जी सतत वचन "पाहण्याच्या" महत्त्वाशी संबंधित आहे. आमचा असा विश्वास आहे की एका अर्थाने, हे आपण आपल्या मनात काय कल्पना करतो, काय कल्पनाचित्र रंगवतो आणि काय चित्रित करतो याच्याशी संबंधित आहे.

## अंगीकार किंवा पत्कर-देवाने जे म्हटले आहे ते म्हणणे

**यहोशवा 1:8**

**नियमशास्त्राचा हा ग्रंथ तुझ्या मुखी सदैव असू दे; त्यात जे काही लिहिले आहे ते तू काळजीपूर्वक पाळ आणि रात्रंदिवस त्याचे मनन कर, म्हणजे तुझा मार्ग सुखाचा होईल व तुला यशप्राप्ती घडेल.**

येथे, परमेश्वर यहोशवाला *"रात्रंदिवस"* मनन करण्याची आज्ञा देत होता. लक्षात घ्या की त्याने असे म्हणण्याद्वारे सुरुवात केली, *"नियमशास्त्राचा हा ग्रंथ तुझ्या मुखी सदैव असू दे."* दुसऱ्या शब्दांत, परमेश्वर यहोशवाला सांगत होता की नियमशास्त्राच्या ग्रंथात असलेले शब्द त्याच्या बोलण्याचा सतत भाग असावेत. म्हणून, ध्यानाच्या प्रक्रियेचा एक भाग म्हणून, आपण पवित्र शास्त्रातील वचने आपल्या मुखात ठेवायची आहेत, म्हणजेच, आपण पवित्र शास्त्रातील वचने बोलायची / पुनरावृत्ती करायची / पठण करायची आहेत. आधी सांगितल्याप्रमाणे, ही इब्री लोकांची मनन करण्याची पद्धत होती. मनन करताना, ते वाकून किंवा पुढे-मागे झुलत, बाह्य विचलनांचा पूर्णपणे त्याग करून, मंद, गुणगुणत्या आवाजात धर्मग्रंथातील वचनांचे शांतपणे पठण करत असत.

नव्या करारात, आपल्याला *"पत्कर करणे"* आणि *"अंगीकार करणे"* या शब्दांचा परिचय करून दिला गेला आहे. हे ख्रिस्ती

विश्वासातील अतिशय महत्त्वाचे शब्द आहेत.जेव्हा आपण आपल्या मुखाने प्रभु येशूस पत्करतो आणि आपल्या अंतःकरणात विश्वास ठेवतो की देवाने त्याला मेलेल्यातून उठवले आहे (रोमकरांस पत्र 10:9) तेव्हा तारण खरे ठरते. शिवाय, नवा करार आपल्याला आपली पापे पत्करण्याबद्दल (1 योहान 1:9) आणि आपल्या विश्वासाचा अंगीकार करण्याबद्दल (इब्री 3:1) शिकवतो. "पत्कर करणे" किंवा "अंगीकार करणे" असे भाषांतर केलेल्या दोन ग्रीक शब्दांपैकी *'होमोलोजिओ'* हा शब्द सामान्यतः वापरला जातो आणि त्याचा शब्दशः अर्थ "एकच गोष्ट बोलणे, संमती देणे, एकमत असणे" असा होतो. मननाच्या या तिसऱ्या पैलूचे वर्णन करण्यासाठी आम्ही "पत्कर" अथवा अंगीकार, कबूलीजबाब हा शब्द वापरण्याचा निर्णय घेतला कारण जेव्हा प्रभु आपल्याला त्याचे वचन प्रभावीपणे पुन्हा सांगण्याची / पुनरावृत्ती करण्याची / बोलण्याची आज्ञा देतो तेव्हा तो आपल्याला त्याच्या वचनाचा अंगीकार अथवा "पत्कर" करण्याची सूचना देत असतो. तो आम्हास "तेच बोलायला", त्याचे वचन जे सांगते तेच म्हणायला, आपले शब्द त्याच्या वचनाशी "सहमत" करायला सांगतो.

उदाहरणार्थ, असे मानूया की आपण वचनावर, विशेषतः यशया 53:4 आणि मत्तय 8:17 मध्ये आढळणाऱ्या शास्त्रवचनांवर **मनन** करत आहोत. ही वचने ख्रिस्ताने वधस्तंभावरील त्याच्या प्रतिनिधिक कार्याद्वारे आपल्या आरोग्यप्राप्तीची कशी तरतूद केली हे सांगतात.या वचनांचा अर्थ काय आहे आणि ते आपल्यावर कसे लागू होतात यावर आपण चिंतन करतो. ही शास्त्रवचने आपल्या जीवनात खरी असल्याची आपण **कल्पना** करतो. आपण स्वतःला आजारांपासून मुक्त, सर्व वेदनांपासून बरे झालेले, संपूर्ण आणि पूर्णपणे निरोगी असल्याची कल्पना करतो आणि पाहतो. आपल्या मननाचा भाग म्हणून, आपण ही वचने कबूल करतो. आपण मृदू पण ऐकू येईल अशा आवाजात **म्हणतो**, *"खरोखर आमचे व्याधी त्याने आपल्यावर घेतले, आमचे क्लेश त्याने वाहिले; तरी त्याला ताडन केलेले, देवाने त्याच्यावर प्रहार केलेले*

*व त्याला पिडलेले असे आम्ही त्याला लेखले"* (यशया 53:4). आपण याची वारंवार पुनरावृत्ती करतो. किंवा कदाचित आपण स्वतःशी या शास्त्रवचनांचा अर्थ काय आहे याबद्दल बोलू इच्छितो. माझ्या स्वतःच्या मननाच्या वेळी, कधीकधी मी स्वतःला वचनाचा प्रचार करतो. इतर वेळी, मी देवासमोर प्रार्थनेत पवित्र शास्त्रातील वचनांचा अंगीकार करतो. उदाहरणार्थ, या शास्त्रवचनावर मनन करत असताना, आपण प्रार्थना करतो आणि म्हणतो, पित्या, तुझ्या वचनासाठी तुझे आभार मानते. *"धन्यवाद पित्या, की या वचनांनुसार, येशूने खरोखर माझे व्याधी त्याने आपल्यावर घेतले, माझ्या वेदना वाहून नेल्या. त्याने माझी दुर्बळता स्वतःवर घेतली आणि माझे आजार सोसले. धन्यवाद पित्या, की म्हणून मला माझ्या शरीरात आजार आणि रोग सहन करण्याची गरज नाही."*

अशाप्रकारे वचनाचा अंगीकार करण्याचा आमच्या जीवनावर मोठा परिणाम घडतो. ते आपल्या अंतरात्म्यात देवाच्या वचनाला बळकटी देते. आमचा विश्वास दृढ होतो कारण विश्वास देवाचे वचन ऐकण्याद्वारे येतो (रोमकरांस पत्र 10:17). जेव्हा आपण अशा प्रकारे वचन कबूल करतो तेव्हा आपण प्रभावीपणे वचन ऐकत असतो. वचन कबूल करण्याच्या सातत्यपूर्ण सरावामुळे आपण कसे बोलतो ते नक्कीच बदलेल. खरे म्हणजे, जेव्हा प्रभु आपल्याला त्याचे वचन सतत आपल्या मुखात बाळगण्याची आज्ञा देतो, तेव्हा याचा अर्थ असा होतो की त्याच्या वचनाच्या विरुद्ध असलेली कोणतीही गोष्ट आपल्या बोलण्यात नसावी.

## त्याच्या वचनावर मनन करून देवाशी भेटणे आणि संवाद साधणे

**स्तोत्रसंहिता 63:1-6**

**1 हे देवा, तू माझा देव आहेस; मी आस्थेने तुझा शोध करीन; शुष्क, रुक्ष व निर्जल प्रदेशात माझा जीव तुझ्यासाठी तान्हेला झाला आहे, माझ्या देहालाही तुझी उत्कंठा लागली आहे.**

**2 अशा प्रकारे तुझे बळ व वैभव पाहण्यास पवित्रस्थानी मी तुझ्याकडे दृष्टी**

**लावली आहे.**
**3 तुझे वात्सल्य जीवनाहून उत्तम आहे; माझे ओठ तुझे स्तवन करतील.**
**4 मी जिवंत आहे तोपर्यंत तुझा धन्यवाद असाच करीन; तुझ्या नावाने मी आपले हात उभारीन.**
**5 मज्जेने व मेदाने व्हावा तसा माझा जीव तृप्त होईल; आणि माझे मुख हर्षभरित होऊन तुझे स्तवन करील.**
**6 मी रात्री आपल्या अंथरुणावर पडून तुझे स्मरण करतो, व प्रहरोप्रहरी तुझे ध्यान करीत असतो.**

पवित्र शास्त्रांनुसार मनन हा प्रामुख्याने परमेश्वराशी निकट सहभागित्वाचा काळ आहे. वर उद्‌त केलेल्या उताऱ्यात स्तोत्रकर्त्याने देवाबद्दलची त्याची तीव्र तळमळ व्यक्त केली आहे. देवाप्रीत्यर्थ त्याच्या इच्छेने त्याला पवित्रस्थानात देवाचा शोध घेण्यास प्रवृत्त केले आणि हात वर करून आणि आनंदी ओठांनी देवाची स्तुती करण्यास प्रवृत्त केले. त्यामुळे तो रात्रीच्या शांततेत प्रभूचे ध्यान करण्यास प्रवृत्त झाला. त्याचप्रमाणे, देवाशी जवळीक साधण्याच्या आपल्या अंतःकरणाच्या तीव्र इच्छेतून, आपण आपले विचार आणि बोलणे पूर्णपणे परमेश्वरावर केंद्रित करू देतो. आपण वचनावर खोलवर मनन करत असताना, आपल्या बुद्धीने वचनाचे विश्लेषण करण्यापासून दूर होतो जेथे आपली भेट देवाशी होते आणि आपण त्याच्याशी सहभागिता साधतो. ते वचन बनते जे देव आपल्याशी थेट वर्तमानात बोलत आहे. त्याची *"शांत, मंद वाणी"* (1 राजे 19:12) त्या क्षणाच्या शांततेत मोठी आणि स्पष्ट होते. देवाची उपस्थिती आपल्याला भारावून टाकते. तो असा समय बनतो जेव्हा प्रभु आपल्या आत खोलवर काम करतो, त्याच्या प्रबळ वचनाद्वारे आपल्या अंतरंगात आपल्याला बदलतो. या काळात, आपण आपल्या अंतःकरणात प्रभु जे बोलतो आणि करतो त्याला प्रतिसाद देऊ शकतो. आपण त्याच्या वचनावर आधारित पश्चात्ताप, विश्वास, आनंद, स्तुती आणि कृतज्ञता व्यक्त करू शकतो. सखोल आंतरिक प्रार्थनांद्वारे, किंवा कुजबुजलेल्या शब्दांद्वारे, किंवा ठामपणे उच्चारलेल्या कबुलींद्वारे असो, आपण आपले विचार, भावना, इच्छा आणि दृढ विश्वास

आपण प्रभूच्या चरणी समर्पित करतो. सत्याचे प्रकटीकरण आपल्या अंतर्यामी उचंबळून येऊ लागते. त्याच्या राज्याची रहस्ये पाहण्यासाठी व समजून घेण्यासाठी आपले आध्यात्मिक डोळे उघडले आहेत. सत्य आपल्या आतील व्यक्तीमत्वात अधिक दृढ आणि मजबूत होते. आपल्या मनातील खोटेपणा, फसवणूक आणि गड पाडले जातात. हा प्रभूच्या पवित्र वचनावर मनन करत असताना त्याच्याशी वैयक्तिक, जिव्हाळ्याचा आणि मधुर सहवासाचा काळ आहे.

## मननाचे परिणाम

**2 करिंथ 10:3-5**

**3 कारण आम्ही देहात चालणारे असूनही आम्ही देहस्वभावाप्रमाणे युद्ध करत नसतो.**

**4 कारण आमच्या युद्धाची शस्त्रे दैहिक नाहीत, तर तटबंदी जमीनदोस्त करण्यास ती देवाच्या दृष्टीने समर्थ आहेत.**

**5 तर्कवितर्क व देवविषयक ज्ञानाविरुद्ध उंच उभारलेले असे सर्वकाही पाडून टाकून आम्ही प्रत्येक कल्पना अंकित करून तिला ख्रिस्तापुढे मान वाकवण्यास लावतो.**

विश्वासणारे ज्या आव्हानांना तोंड देतात त्यापैकी अनेक आव्हाने वरील शास्त्रवचनांमध्ये यादीबद्ध करण्यात आली आहेत. हे *"तटबंदी"*, *"तर्कवितक"*, *"देवाच्या ज्ञानाच्या विरोधात स्वतःला उंचवणारी प्रत्येक गोष्ट"* आणि *"प्रत्येक विचार"* आहेत. या सर्वांचा संबंध विश्वासणाऱ्याच्या मनाशी आहे. मन हे एक युद्धभूमी आहे. आणि देवाने आपल्याला यशस्वी युद्ध करण्यासाठी शस्त्रे दिली आहेत जेणेकरून आपण संघर्षाच्या या प्रत्येक क्षेत्रात विजयाचा अनुभव घेऊ शकू. तथापि, समस्या अशी आहे की अनेक लोक जे विश्वासणारे बनतात ते देवाच्या ज्ञानाच्या विरुद्ध असलेल्या तटबंदी, कल्पना, तर्कवितर्क आणि कल्पनांसह पुढे जातात (जसे की देवाच्या लिखित वचनात दिले आहे). परिणामतः, अनेक जण त्यांच्या जीवनाच्या अनेक क्षेत्रांमध्ये पराभूत जीवन जगतात आणि बंधनात राहतात.

वचनावर मनन करणे, जरी सर्व गोष्टींचा उपाय नसला तरी, मनातील या आव्हानांना तोंड देण्यास आपल्याला मदत करणारी एक महत्त्वाची शिस्त आहे. वचनावर मनन  करण्याच्या शिस्तबद्ध सरावाद्वारे तटबंदी उध्वस्त करता येते. जी व्यक्ती देवाच्या वचनावर मनन करत असते, त्याला आपल्या कल्पना, तर्क आणि विचार देवाच्या ज्ञानाच्या (देवाच्या वचनाच्या) अधीन करणे सोपे जाते.

वचनावर सतत मनन केल्याने मनाचे नवीकरण होते, नवीन पद्धतीने बोलणे आणि नवीन विश्वास निर्माण होतो. आपले विचार, आपली आत्मप्रतिमा, आपला आत्मसन्मान आणि आपल्या मनाच्या स्थितीवर अवलंबून असलेल्या आपल्या व्यक्तिमत्त्वाच्या इतर पैलूंत बदल घडून येऊ लागतो. आपण जीवनाबद्दल आणि आपल्या भविष्याबद्दल सकारात्मक, आत्मविश्वासू आणि आशावादी बनतो. पूर्वी आपण दृष्टांत नसलेले लोक होतो, पण आता बदलून धाडसी आणि आक्रमक स्वप्न पाहणारे बनलो आहोत. आमच्या शब्दसंग्रहाचे नवीकरण झाले आहे. गरिबी, पराजय आणि आत्म-दया यांच्या बंधनात असलेल्या संभाषणात अडकण्याऐवजी, आपण देवावरील आपल्या दृढ विश्वासाने बोलतो. मननाद्वारे आपल्या अंतःकरणात वचनाची सतत पेरणी आणि जलसिंचनाने आपल्यामध्ये देवावर एक जिवंत विश्वास निर्माण होतो.

## मननाचे फळ

**स्तोत्रसंहिता 1:1-3**

**1 जो पुरुष दुर्जनांच्या मसलतीने चालत नाही; पापी जनांच्या मार्गात उभा राहत नाही; आणि निंदकांच्या बैठकीत बसत नाही,**

**2 तर परमेश्वराच्या नियमशास्त्रात रमतो, त्याच्या नियमशास्त्राचे रात्रंदिवस मनन करतो, तो धन्य.**

**3 जे झाड पाण्याच्या प्रवाहाजवळ लावलेले असते, जे आपल्या हंगामात फळ देते, ज्याची पाने कोमेजत नाहीत, अशा झाडासारखा तो आहे; आणि जे काही तो हाती घेतो ते सिद्धीस जाते.**

देवाचे वचन हे चमत्कारिक बीज आहे. त्यात फलद्रूप करण्याची प्रचंड क्षमता आहे. आपल्या अंतःकरणात पेरलेले वचनाचे बीज आपल्या जीवनात देवाचा सत्संकल्प पूर्ण करील.मननाच्या प्रक्रियेद्वारेच आपण आपल्या अंतःकरणात देवाच्या वचनाचे बीज पेरतो आणि त्याचे संगोपन करतो. ते बीज अंकुरित होईल आणि योग्य वेळी नक्कीच फळ देईल. म्हणूनच, मननाचा सुसंगतपणे सराव हा देवाच्या अभिवचनांस प्रकट वास्तविकता बनवण्याच्या प्रक्रियेत एक महत्त्वाचा दुवा आहे.

देवाचे वचन आपल्या जीवनात कोणती फळे उत्पन्न करू शकते, याचा विचार करा.

- देवाचे वचन अविनाशी बीज आहे, जे पवित्र आत्म्याच्या कार्याद्वारे आपल्या जीवनात नवीन जन्म घडवून आणते. (1 पेत्र 1:23)
- देवाचे वचन एक औषधासारखे आहे, जे आपल्या शरीराच्या प्रत्येक भागाला बरे करू शकते. (नीतिसूत्रे 4:20-22; स्तोत्रसंहिता 107:20)
- देवाच्या वचनाचा प्रवेश आपल्या अंतःकरणात अंतर्दृष्टी, समज आणि ज्ञान आणतो. (स्तोत्रसंहिता 119:98-100,130)
- देवाचे वचन समृद्धी आणि यश आणते. (यहोशवा 1:8; स्तोत्रसंहिता 1:3)
- देवाचे वचन आध्यात्मिक वाढ आणि परिपक्वता निर्माण करते. (प्रेषितांची कृत्ये 20:32)

आणि मग, देवाने त्याच्या वचनाद्वारे आपल्याला दिलेले अनेक आशीर्वाद आहेत..

जर आपण वचनावर मनन करून ही बीजे पेरली आणि संगोपन केले तर या सर्व गोष्टी आपल्या जीवनात घडून येऊ शकतात.

जो मनुष्य नीतिमान जीवन जगतो आणि देवाच्या वचनावर सतत

मनन करतो तो पाण्याच्या प्रवाहाजवळ लावलेल्या झाडासारखा असतो. त्याची मुळे पोषण आणि ताजेपणाच्या अखंड स्रोताशी जोडलेली असतात. जेव्हा आपण देवाच्या वचनाचे सातत्याने मनन करतो, तेव्हा नेमके हेच घडते. आपल्या अंतरात्म्याला पोषण आणि ताजेपणाचा कधीही न संपणारा पुरवठा प्राप्त होतो. परिणामी, आपले जीवन फलदायी आणि उत्पादक बनते.

## मननाची शिस्त अंगी बाणणे

### *दैनंदिन शिस्त*

**स्तोत्रसंहिता 119:97**

**अहाहा, तुझे नियमशास्त्र मला किती प्रिय आहे! दिवसभर मी त्याचे मनन करतो.**

तुम्ही दररोज देवाच्या वचनावर मनन करण्याची सवय लावावी, यासाठी आम्ही तुम्हाला प्रोत्साहन देऊ इच्छितो. ही सवय असावी, अगदी एक दैवी आसक्ती सुद्धा. वचनावर मनन करणे ही एक अशी शिस्त आहे जी सूचित करते की आपण ते करण्याची इच्छा नसताना किंवा आपण खूप व्यस्त आहोत असे वाटत असतांनाही आपण ते केलेच पाहिजे. दुसरीकडे, आपण देवाच्या वचनातील शुद्ध आनंदाने हे केले पाहिजे. आपण प्रभूवर प्रीती करतो आणि म्हणूनच, आपण त्याच्या वचनाला अत्यंत मोलाचे मानतो. यामुळे आपण अशा काळात पोहोचतो, जिथे आपण मननाच्या माध्यमातून देवाच्या वचनावर पूर्ण लक्ष केंद्रित करतो.

### *विशेष गरजेच्या वेळी*

**स्तोत्रसंहिता 119:23,24,78**

**23 अधिपतीही बसून आपसांत माझ्याविरुद्ध बोलतात; पण तुझा दास तुझ्या नियमांचे मनन करतो.**

**24 तुझे निर्बंध मला आनंददायी आहेत. ते माझे मंत्री आहेत.**

**78 गर्विष्ठ फजीत होवोत, कारण त्यांनी लबाडीने माझ्यावर अन्याय केला आहे; मी तर तुझ्या विधींचे मनन करीन.**

असे अनेक प्रसंग आले आहेत आणि आजही येत आहेत, जेव्हा मला वेगवेगळ्या संघर्षांना, आव्हानांना, प्रश्नांना आणि चिंतांना सामोरे जावे लागते. अशा वेळी, आत्म्याने प्रार्थना करण्याबरोबरच, मी माझ्यासमोर असलेल्या आव्हानांना तोंड देणाऱ्या शास्त्रवचनांवर मनन करण्याचा प्रयत्न करतो. माझे मन गोंधळलेले असू शकते, प्रश्नांनी भरलेले असू शकते आणि अनिश्चित असू शकते, पण मी त्या विषयाशी संबंधित देवाचे विचार प्रकट करणारी शास्त्रवचने वाचतो. मी त्यांवर मनन करतो. ते माझ्या हृदयात शांती, स्तब्धता आणि खात्री आणतात. इतर वेळी, मी कदाचित एखाद्या विशिष्ट आव्हानाचा स्वीकार करतो आणि मला माहित आहे की मला प्रभूकडून अतिरिक्त बळ आणि प्रोत्साहन प्राप्त करावे लागेल. अशा वेळी, मी पुन्हा एकदा परिस्थितीशी संबंधित असलेल्या शास्त्रवचनांकडे वळतो आणि त्यांवर मनन करतो. शास्त्रवचने आत्मविश्वास आणि सामर्थ्याचा स्रोत बनतात. आपण सर्वजण अशा आशीर्वादांचा लाभ घेऊ शकतो.

## एक उद्देशपूर्ण सराव

**स्तोत्रसंहिता 119:148**

**तुझ्या वचनाचे चिंतन करायला रात्रीच्या प्रत्येक प्रहरापूर्वी माझे डोळे उघडे असतात.**

देवाच्या वचनावर मनन करणे हे निरर्थक कार्य नाही, तसेच, ते केवळ अत्यंत आध्यात्मिक लोकांसाठीच मर्यादित नाही. ते आमच्या सर्वांच्या पालनासाठी आहे. जलद सुधारणा आणि तात्काळ चमत्कारांना प्राधान्य देणाऱ्या जगात (ख्रिस्ती जगातही) आध्यात्मिक शिस्त विकसित करण्याचा विषय लोकप्रिय ठरणार नाही. तथापि, आपल्याला आध्यात्मिक गोष्टींचा अभ्यास करण्यास स्वतःस प्रोत्साहित केले जाते (1 तीमथ्य 4:7). व्यायाम ही एक शिस्त आहे. आणि काही वेळा शिस्त (आत्मशिस्त) पाळणे सोपे नसते. त्यासाठी कदाचित काही त्यागही करावा लागेल. तथापि, शिस्तीचे प्रतिफळ समृद्ध आणि

टिकाऊ असते. वचनावर मनन करण्याचा आनंद घेणारे आणि त्याचे समृद्ध प्रतिफळ मिळवणाऱ्यांपैकी तुम्ही एक व्हा!

## व्यावहारिक कल्पना

आता मी काही व्यावहारिक उपाय सांगतो जी आम्हास देवाच्या वचनावर मनन करण्याची शिस्त विकसित करण्यात मदत करू शकतात. हे कोणत्याही प्रकारचे नियम किंवा कायदे नाहीत, आणि आपण स्वतःला कोणत्याही पद्धतीत, प्रक्रियेत किंवा प्रणालीत अडकवू नये. माझ्या जीवनात ज्या गोष्टी उपयुक्त ठरल्या, त्या मी फक्त सांगत आहे; मी हे माझ्या किशोरवयात सुरू केले होते. तुम्हालादेखील हे सल्ले उपयुक्त वाटतील आणि तुमच्या स्वतःच्या आध्यात्मिक जीवनाशी थोडाफार बदल करून घेता येतील. प्रभू तुम्हाला त्याच्या वचनावर मनन करण्यासाठी इतर अशा पद्धतीही दाखवू शकतो ज्या तुम्हाला अधिक योग्य वाटतील.

मी येथे तीन व्यावहारिक कल्पना सांगत आहे:

1) वचनाचे बीज

2) दैनिक वचन-मनन दिनचर्या

3) चिंतनशील पवित्र शास्त्र वाचन

## *वचनाचे बीज*

माझ्या आध्यात्मिक प्रवासाच्या सुरुवातीला, म्हणजेच माझ्या किशोरवयात, मी शास्त्रवचनांचे विषयवार किंवा मुद्द्यांनुसार वर्गीकरण करायला शिकलो. हे अगदी ग्रंथालयातील पुस्तकांचे वर्गीकरण करून, त्यांना व्यवस्थितपणे मांडून ठेवण्यासारखेच आहे. या पुस्तकाच्या शेवटच्या प्रकरणात असे अनेक विषय आणि त्यांच्या यादींचे नमुने दिलेले आहेत. जेव्हा मला देवाच्या वचनातील एखाद्या विशिष्ट विषयावर किंवा संकल्पनेवर मनन करायचे असे, तेव्हा मी संबंधित शास्त्रवचने

सहजपणे आठवून वाचू शकत असे. म्हणून, जर मला विश्वासाच्या विषयावर मनन करण्याची गरज जाणवली, तर मी विश्वासाशी संबंधित संकलन केलेली शास्त्रवचने वाचतो. हे बी पेरण्यासारखेच आहे. जसे नैसर्गिक जगात आपण हंगामाच्या इच्छेनुसार बी पेरतो, कारण आपल्याला माहीत असते की प्रत्येक बीज त्याच्या स्वतःच्या जातीप्रमाणे फळ देते. त्याचप्रमाणे, विशिष्ट विषयांवर किंवा मुद्यांवरील शास्त्रवचनांवर मनन करून, आपण आपल्या गरजांनुसार बी पेरत असतो. याने पाठांतर प्रक्रियेत देखील मदत मिळते कारण जेव्हा आपण या शास्त्रवचनांवर वारंवार मनन करतो तेव्हा ती आपल्या स्मृतीत कोरले जातात.

मी विशिष्ट उद्दिष्टासाठी ठरविलेल्या सभांत सेवा करण्यासाठी देखील याचा वापर करतो. आपण वचनाची सेवा करताना प्रत्येक वेळी चिन्हे, चमत्कार, अद्‌त कृत्ये आणि आरोग्यदानाद्वारे पवित्र आत्म्याच्या प्रदर्शनांसाठी तयार राहण्याची इच्छा बाळगतो, तर आपल्याकडे अशा सभा देखील असतात ज्यात विशेषतः अलौकिक चिन्ह-चमत्कार अपेक्षित असतात. आपण सुवार्ता प्रचार सभा, विशेष आरोग्यदानाच्या आणि चमत्काराच्या सभा घेत असू जेथे चमत्कार आणि आरोग्यप्राप्तीसाठी लोकांची सेवा करणे हा हेतू असतो. अशा सभांमध्ये सेवा करण्याच्या तयारीचा एक भाग म्हणून, अन्यान्य भाषांमध्ये प्रार्थना करण्याव्यतिरिक्त, मी आत्म्याचा अभिषेक, विश्वासणाऱ्याचा अधिकार, आत्म्याची कृपादाने, आरोग्यप्राप्ती, येशूचे चमत्कार, विश्वास, भविष्यवाणी इत्यादी विषयांशी संबंधित शास्त्रवचनांवर मनन करण्यासाठी देखील वेळ काढतो. हे माझ्या आत्म्याला तीक्ष्ण आणि सुसंवादी बनवते आणि मला सेवा करण्यासाठी तयार करते.

## *वचनावर दैनिक मनन करण्याचा परिपाठ*

जे खेळाडू विशिष्ट खेळासाठी प्रशिक्षण घेतात त्यांची साप्ताहिक दिनचर्या असते. ते तोच व्यायाम वारंवार करतात, प्रत्येक वेळी थोडे

अधिक प्रयत्न करतात. माझ्या आध्यात्मिक प्रवासाच्या सुरुवातीच्या काळात, मी दररोज वचनावर दैनिक मनन करण्याचा परिपाठ तयार केला होता. मी दररोज विशिष्ट विषयांवर मनन करण्याचा निर्धार केला. मी माझ्याकडे असलेल्या वर्ड सीड्समधील शास्त्रवचनांचा उपयोग करत असे आणि त्याची उजळणी करीत असे, प्रत्येक शास्त्रवचनावर मी क्षणभर मनन करीत असे—ते वाचत असे, त्याचा अंगीकार करीत असे, त्या वचनासोबत देवाची उपासना करीत असे. त्या अनुषंगाने, मी आणखी उत्स्फूर्त गोष्टीकडे वळलो जेथे मी गरजेनुसार विषयांवर मनन करू लागलो. तुमची सध्याची परिस्थिती आणि गरजा लक्षात घेऊन, तुम्ही देखील अशाच प्रकारची एखादा दैनंदिन परिपाठ तयार करू शकता.

एका विशिष्ट कालावधीत मी वापरलेल्या दैनंदिन परिपाठाच्या नित्यक्रमाचे एक उदाहरण येथे दिले आहे

| रविवार | सोमवार | मंगळवार | बुधवार | गुरुवार | शुक्रवार | शनिवार |
|---|---|---|---|---|---|---|
| प्रार्थनेतील औदार्य | विश्वास | दैवी आरोग्य | कुटूंब | ज्ञान आणि समज | यश आणि समृद्धी | सेवा आणि चमत्कार |

## *चिंतनशील पवित्र शास्त्र वाचन*

माझ्या संपूर्ण आध्यात्मिक प्रवासात मला ज्या सवयीची अतिशय मदत झाली आहे ते म्हणजे चिंतनशील पवित्र शास्त्र वाचन. अनेक पवित्र शास्त्र  वाचन योजनांचा भर ठराविक कालावधीत ठराविक अध्याय आणि पुस्तके पूर्ण करण्यावर असतो. जरी हे चांगले आहे आणि त्याचे फायदे आहेत, तरी मी जे वाचत आहे त्यावर वाचन आणि सखोल मनन करण्यात माझा वेळ घालवणे पसंत करतो. म्हणून, वचनातील माझा नियमित वेळ विशिष्ट संख्येचे अध्याय पूर्ण करण्याबद्दल नाही तर वचनातून आत्मिक गोष्टीवर लक्ष केंद्रित करण्याबद्दल आहे. म्हणून, मी एका अध्यायातील काही वचने वाचतो आणि त्या काही वचनांवर मनन

करण्यात आणि देवाची भेट घेण्यात, प्रकटीकरण प्राप्त करण्यात, ते आत्मसात करण्यात वेळ घालवतो आणि मग जेव्हा मला पुढे जाण्याची गरज वाटते, तेव्हा पुढील वचनांकडे वळतो. बरेचदा, मी त्याच वचनांच्या संचावर काही दिवस घालवू शकतो, 30 मिनिटे किंवा त्याहून अधिक वेळ ती वचने वाचण्यात, त्यावर मनन करण्यात, ध्यान करण्यात आणि त्या वचनांद्वारे देवाचा अनुभव घेण्यात घालवतो. बऱ्याचदा, देवाच्या उपस्थितीने मी भारावून जातो, साक्षात्काराचा वर्षाव होतो आणि मला जे काही दिसत आहे व समजत आहे, ते मी लिहून ठेवतो. माझे जीवन बदलले आहे. आणि अर्थातच, माझ्या अनेक उपदेशांचा जन्म अशाच समयी झाला आहे.

उदाहरणार्थ, सप्टेंबर 2019 मध्ये कधीतरी, मी मार्कचे शुभवर्तमान पुन्हा वाचण्यास सुरुवात केली. मी मार्क 1:1 वाचले, *"देवाचा पुत्र येशू ख्रिस्त याच्या शुभवर्तमानाची सुरुवात,"* आणि मी त्या एका वचनाच्या पलीकडे जाऊ शकलो नाही. मी चार दिवस, दररोज सुमारे 30 मिनिटे किंवा त्याहून अधिक काळ मार्क 1:1 वर राहिलो, फक्त त्या वचनात मग्न राहिलो, त्या वचनात बुडालो. मी जेव्हा जेव्हा ते वचन वाचले तेव्हा तेव्हा देवाची उपस्थिती मला भारावून टाकत असे. *"देवाचा पुत्र"* हेच शब्द फक्त पानावरून अगदी उठून दिसत होते. मी मार्क 1:1 च्या त्या भागावर मनन करत असताना, माझ्या कल्पनेच्या विश्वात, मी काळाच्याही आरंभापूर्वीच्या—अनादी काळाच्या—अतीत प्रवास केला; जिथे त्या 'अनादी शब्दाला' पित्याशी आणि आत्म्याशी एकरूप झालेले मी पाहिले. त्यानंतर, आपल्याला ज्ञात असलेल्या या काळाच्या प्रवासात मी पुढे वाटचाल केली; जिथे त्या 'अनादी शब्दाने' स्वतःला कसे प्रकट केले आणि स्वतःचा मृत्यू, दफन, पुनरुत्थान, स्वर्गारोहण व गौरव यांद्वारे त्याने जे कार्य केले, ते सर्व मी प्रत्यक्ष अनुभवले. संबंधित शास्त्रवचने पवित्र शास्त्राच्या पानांवरून बाहेर पडत असल्याचे दिसत होते. आणि ज्या शुभवर्तमानाचा आपण प्रचार करतो ते देवाच्या पुत्राचे शुभवर्तमान आहे हे सत्य समजून घेणे अत्यंत भारावून टाकणारे

होते. मार्क 1:1 मधील ते चार दिवस खरोखरच देवाच्या पुत्राची भेट घेण्याचा एक उच्च कोटीचा अनुभव होता. जे काही लिहिता आले ते मी लिहून काढले. मी ते वचन माझ्या आत्म्यात धरून ठेवले आणि त्याला अंतर्मनात खोलवर रुजू दिले. अखेरीस, नाताळच्या दिवशी—2019 साली—मी त्यावर उपदेश केला; आणि उपस्थित असलेल्या सर्वांसाठी तो एक आध्यात्मिक आधार ठरला (प्रवचन **apcwo.org/sermons** वर उपलब्ध आहे).

तुम्ही ही पद्धत विकसित करू शकाल आणि देवाच्या वचनावर मनन करण्याचा आनंद घेऊ शकाल.

# 7
# बीजाचे रक्षण आणि संगोपन केलेच पाहिजे

## सैतान वचनाच्या मागे आहे

**मत्तय 13:19**
**कोणी राज्याचे वचन ऐकतो पण ते त्याला समजत नाही, तेव्हा तो दुष्ट येऊन त्याच्या अंतःकरणात पेरलेले ते हिरावून घेतो; वाटेवर पेरलेला तो हा आहे.**

**मार्क 4:14,15**
**14 पेरणारा वचन पेरतो.**
**15 वाटेवर वचन पेरले जाते तेथील लोक हे आहेत की, त्यांनी ऐकल्याबरोबर सैतान येऊन त्यांच्यातले पेरलेले वचन हिरावून घेतो.**

**लूक 8:11,12**
**11 हा दाखला असा आहे: बी हे देवाचे वचन आहे.**
**12 वाटेवर असलेले हे आहेत की, ते ऐकतात; नंतर त्यांनी विश्वास ठेवू नये व त्यांना तारणप्राप्ती होऊ नये म्हणून सैतान येऊन त्यांच्या अंतःकरणांतून वचन काढून घेतो.**

पेरणाऱ्याच्या दाखल्यातून आपल्याला एक महत्त्वाची आध्यात्मिक अंतर्दृष्टी मिळते-सैतान वचनाच्या मागे आहे. यावरून दिसून येते की देवाचे वचन आपल्या अंतःकरणात ऐकणे, स्वीकारणे आणि त्याची संगोपन करणे किती महत्त्वाचे आहे! सैतानाला माहित आहे की जर आपण वचन स्वीकारले तर ते आपल्या जीवनात फळ उत्पन्न करेल आणि आपल्याला विजय, अधिकार आणि वर्चस्व यांमध्ये चालण्यास लावेल. प्रेषित योहानाने 1 योहान 2:14 मध्ये लिहिले आहे की, *"तरुणांनो, मी तुम्हांला लिहिले आहे, कारण तुम्ही बलवान आहात. तुमच्या ठायी देवाचे वचन राहते आणि त्या दुष्टाला तुम्ही जिंकले आहे."*

म्हणून, आपल्याला देवाच्या वचनापासून दूर ठेवण्यासाठी, सैतान आपली शक्ती पणास लावतो

- उदासीनता, आळस, व्यग्रता, व्यस्तता, विचलितता इत्यादींद्वारे आपल्याला वचन ऐकण्यापासून रोखण्याचा प्रयत्न करेल.
- गोंधळ, खोटेपणा, फसवणूक इत्यादींद्वारे ते आपल्याला समजण्यापासून रोखणे.
- शंका, अविश्वास, भीती इत्यादींद्वारे त्यावर विश्वास ठेवण्यापासून आपल्याला रोखणे.

तथापि, प्रभु येशूने आपल्यासाठी सैतानाची 'रणनीती' प्रकट केली आहे त्यामुळे, आपण प्रतिकारात्मक उपाययोजना करू शकतो आणि आपल्या हृदयात देवाच्या वचनाचा समृद्ध साठा करण्यासाठी आपली भूमिका बजावू शकतो याची खात्री करू शकतो. देवाचे वचन तुमच्यामध्ये भरपूर राहो!

## बीजाचे संरक्षण आणि संगोपन करा

पेरणाऱ्याच्या दाखल्यातून आपल्याला मिळणारी आणखी एक महत्त्वाची शिकवण अशी आहे की, जर बीजाला फळ द्यायचे असेल, तर कालांतराने त्याचे रक्षण आणि संगोपन करणे आवश्यक आहे. बागकाम किंवा शेतीच्या आपल्या ज्ञानावरून आपल्याला हे सहज समजते.

प्रभु येशूने दोन महत्त्वाच्या क्षेत्रांकडे लक्ष वेधले, जिथे आपल्याला अशा धोक्यांचा सामना करावा लागेल—जे बीजाला फलद्रूप होण्यापासून रोखू शकतात किंवा आपल्याकडून पीक हिरावून घेऊ शकतात. त्याने खालील गोष्टींचा उल्लेख केला आहे...

- वचनाविरुद्ध छळ आणि संकटे आणि

- संसाराच्या चिंता, द्रव्याचा मोह, इतर गोष्टींची इच्छा आणि जीवनातील सुखे.

आपण कापणीस अडखळण आणणाऱ्या या दोन्ही संचांचा स्वतंत्र प्रकरणांमध्ये विचार करू.

आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे बियाण्याचे संगोपन करणे. नैसर्गिक परिस्थितीत, आपण खात्री करतो की बियाण्याला पुरेसा सूर्यप्रकाश, पाणी आणि पोषक तत्वे मिळावीत जेणेकरून ते अंकुरित होऊ शकेल, वाढू शकेल आणि फळ देऊ शकेल. त्याचप्रमाणे, आपल्याला आपल्या अंतःकरणात एक योग्य वातावरण राखण्याची आवश्यकता आहे जेथे वचनाच्या बीजाचे संगोपन होऊ शकते. देवाच्या वचनाचा उल्लेख पाणी (इफिसकरांस पत्र 5:26) आणि प्रकाश (स्तोत्रसंहिता 119:105) असाही केला जातो. म्हणून, आपण सतत वचनावर चिंतन करू (पाणी आणि प्रकाश पुरवून), सतत प्रकटीकरण प्राप्त करून (कदाचित पोषक तत्वांसारखे) आणि आत्म्याने परिपूर्ण होऊन चालण्याद्वारे (कलस्सै 3:15; इफिसकरांस पत्र 5:18,19) आपण वचनाच्या बीजाचे पोषण करतो.

## देवाच्या राज्याचे बीज-तत्त्व

**मार्क 4:26-29**

**26 आणखी तो म्हणाला, "परमेश्वराचे राज्य असे आहे की, जणू काय एखादा माणूस जमिनीत बी टाकतो, रात्री झोपी जातो, दिवसा उठतो,**

**27 आणि ते बी रुजते व वाढते, पण हे कसे होते हे त्याला कळत नाही.**

**28 जमीन आपोआप पीक देते; पहिल्याने अंकुर, मग कणीस, मग कणसात भरलेला दाणा.**

**29 पीक तयार झाल्यावर तो लगेच विळा घालतो, कारण कापणीची वेळ आली आहे."**

बिजांकुरण सामान्यतः मातीखाली होते. आपल्याला ते दिसत नसले तरी ते घडत आहे हे आपल्याला माहिती असते. आणि त्यासाठी वेळ

लागतो. कालांतराने, मातीच्या वर कोंब दिसू लागल्यावर आपल्याला वाढीची चिन्हे दिसू लागतात. आणि ते रोप किंवा झाड वाढण्यास आणि फळे देण्यास आणखी काही काळ लोटणे आवश्यक आहे.

पेरणाऱ्याच्या दाखल्यानंतर लगेच, प्रभू येशूने पुन्हा एकदा बीजाचे रूपक वापरून, देवाच्या राज्याबद्दल शिकवण्यासाठी आणखी एक दाखला सांगितला (मार्क 4:26-29). या दाखल्यात, प्रभू येशूने आपल्याला देवाच्या राज्यात कार्य करणारे एक सामान्य बीज-तत्व प्रकट केले. हे बीज-तत्व देवाच्या राज्यात आपल्या जीवनाच्या अनेकविध पैलूंना लागू आहे. देवाचे वचन, चमत्कारिक बीज आपल्या जीवनात ज्या प्रक्रियेद्वारे उत्पन्न करते त्याला देखील बीज-तत्व लागू होते.

देवाच्या राज्याच्या बीज-तत्वाबद्दल मुख्य अंतर्दृष्टी खालीलप्रमाणे आहेत:

1) बी पेरले पाहिजे.

2) वाढीची कोणतीही चिन्हे दिसण्यासाठी काही काळ जातो.

3) बीज कसे वाढते हे आपल्याला माहित नसले तरीही ते फळ उत्पन्न करेल.

4) जेव्हा कापणीचा हंगाम येतो तेव्हा आपण विळा लावून तो गोळा केला पाहिजे (दुसऱ्या शब्दात सांगायचे तर, कापणी गोळा करण्याचे काम आपले आहे).

समजून घेण्यासारखे महत्त्वाचे सत्य म्हणजे बियाणे फळ देण्याआधी काही काळ जातो. देवाच्या वचनाची ही बीजे, जी आपल्या अंतःकरणात पेरली गेली आहेत (आणि पेरली जात आहेत), कदाचित रातोरात भरघोस पीक देणार नाहीत. साधारणपणे, आपण आपल्या

अंतःकरणात जी बीजे पेरली आहेत, त्यांचे परिणाम आणि प्रभाव आपल्याला दिसून येईपर्यंत काही काळ लोटलेला असतो.

सुरुवातीला, आपल्याला फक्त तीसपट पीक मिळेल. पण आपल्याला माहित आहे की बीज अंकुरित होण्यासाठी आणि वाढण्यासाठी काही काळ लागतो. कापणीची वेळ लवकरच येईल हे जाणून आपण आपल्या हृदयात ‘वचन’ पेरत राहतो. आणि मग, जेव्हा आपण वचनाचे बीज पेरत राहू तेव्हा आपण वचन जे उत्पन्न करील त्याच्या समृद्ध आणि भरघोस पिकाची कापणी करू.

आपल्या अंतकरणात देवाच्या वचनाचे बीज पेरल्याने ते वचन आपल्या जीवनात कसे फळ आणेल हे आपण पूर्णपणे स्पष्ट करू शकत नाही. उदाहरणार्थ, यश आणि समृद्धीबद्दल वचनाचे बीज पेरणारी व्यक्ती आपल्या प्रत्येक कार्यात यश आणि समृद्धीचा अनुभव कसा घेईल—हे आपण पूर्णपणे स्पष्ट करू शकत नाही. त्याचप्रमाणे, जो कोणी रोगमुक्ती आणि उत्तम आरोग्यासाठी देवाच्या वचनाचे बीज पेरतो, त्याला देवाची ती शक्ती कशा प्रकारे अनुभवास येईल—जी त्याला आजारपणातून व व्याधींतून बरे करेल आणि चांगले आरोग्य देईल—हे आम्ही पूर्णपणे स्पष्ट करू शकत नाही. आम्ही केवळ इतकेच म्हणू शकतो की, ‘वचन’ हे एका बीजासारखे आहे; आणि ते बीज—ते कसे फलद्रूप होते हे आम्हाला ठाऊक नसले तरीही—नक्कीच फळ देईल. जेव्हा वचन चांगल्या जमिनीवर पेरले जाते आणि त्याचे संगोपन केले जाते, तेव्हा ते तेच फळ उत्पन्न करेल जे करण्यासाठी ते घडविण्यात आले आहे.

# 8
# प्रकटीकरण: आध्यात्मिक समज प्राप्त करणे

## जेव्हा आपल्याला वचन समजत नाही

**मत्तय 13:19**

**कोणी राज्याचे वचन ऐकतो पण ते त्याला समजत नाही, तेव्हा तो दुष्ट येऊन त्याच्या अंतःकरणात पेरलेले ते हिरावून घेतो; वाटेवर पेरलेला तो हा आहे.**

प्रभू येशूने सांगितले की जेव्हा आपणास वचन समजत नाही तेव्हा सैतान येऊन ते बीज हिरावून नेतो अशाप्रकारे ते आमच्या जीवनात मूळ धरू शकत नाही आणि फळ उत्पन्न करू शकत नाही. सैतानास वचन चोरण्यापासून रोखण्यासाठी आपण वचन समजले पाहिजे, (आध्यात्मिक सत्याची समज प्राप्त झाली पाहिजे). सैतान वादविवाद, गोंधळ, खोटेपणा, फसवणूक इत्यादींद्वारे आपल्याला वचन समजण्यापासून रोखण्यासाठी त्याचे सर्वोत्तम प्रयत्न करेल.

"समजणे" या शब्दासाठी वापरल्या जाणाऱ्या ग्रीक शब्दाचा अर्थ "एकत्र करणे, आकलन करणे, समजून घेणे" असा होतो. आपल्याला वचन सुज्ञपणे आणि बौद्धिकरित्या समजून घेतले पाहिजे, परंतु आध्यात्मिक सत्याची समज प्राप्त करण्याचा एक पैलू देखील आहे ज्याला आपण "प्रकटीकरण" म्हणतो.

**लूक 8:12**

**वाटेवर असलेले हे आहेत की, ते ऐकतात; नंतर त्यांनी विश्वास ठेवू नये व त्यांना तारणप्राप्ती होऊ नये म्हणून सैतान येऊन त्यांच्या अंतःकरणांतून वचन काढून घेतो.**

सैतानाची इच्छा नाही की आपण अशा टप्प्यावर पोहोचावे जिथे आपण वचनावर विश्वास ठेवू. म्हणून आम्हास वचनाचे प्रकटीकरण प्राप्त होण्यापूर्वी आणि आपण त्यावर विश्वास करण्यापूर्वी तो आमच्यापासून वचन दूर करण्याचा प्रयत्न करतो. तथापि, जेव्हा आपण वचनाचे प्रकटीकरण समजतो आणि प्राप्त करतो, तेव्हा मग आपण वचनावर विश्वास करू शकतो आणि आमच्या जीवनात कार्य करीत असलेल्या वचनाच्या सामर्थ्याचा अनुभव करू शकतो.

## पवित्र शास्त्र आणि मानवी बुद्धी

**1 करिंथ 2:14**

**स्वाभाविक वृत्तीचा माणूस देवाच्या आत्म्याच्या गोष्टी स्वीकारीत नाही, कारण त्या त्याला मूर्खपणाच्या वाटतात; आणि त्याला त्या समजू शकणार नाहीत, कारण त्यांची पारख आत्म्याच्या द्वारे होते.**

आपल्या बुद्धीच्या क्षमतेने आपण शास्त्रातील वचने वाचतो आणि त्यांचा अर्थ समजतो. आपण आपल्या बुद्धीचा वापर हिब्रू आणि ग्रीक भाषेचा, ऐतिहासिक पार्श्वभूमीचा आणि शास्त्रे ज्या संदर्भात लिहिली गेली त्याचा अभ्यास करण्यासाठी करतो. देवाने आपल्याला आपली बुद्धी दिली आहे आणि आपण तिचा योग्य वापर केला पाहिजे.

स्वाभाविक वृत्तीचा मनुष्य त्याच्या स्वाभाविक बुद्धीने देवाच्या वचनाद्वारे त्याच्या आत्म्याने कळविलेली दैवी सत्ये ओळखण्यास असमर्थ असतो. आत्म्याच्या गोष्टी स्वीकारण्यासाठी आध्यात्मिक विवेक (किंवा आध्यात्मिक अंतर्दृष्टी) लागते. येथूनच मानवी बुद्धीची 'क्षमता' संपते आणि पवित्र आत्म्याच्या कार्यावर अवलंबून राहणे सुरू होते.

**1 करिंथ 2:9-12**

**9 हे तर ह्या शास्त्रलेखाप्रमाणे आहे, "डोळ्यांनी जे पाहिले नाही, कानांनी जे ऐकले नाही, आणि माणसाच्या मनात जे आले नाही, ते देवाने आपल्या वर प्रीति करणाऱ्यांसाठी सिद्ध केले आहे;**

**10 कारण देवाने ते आत्म्याच्या द्वारे आपल्याला प्रकट केले; कारण आत्मा हा सर्व गोष्टींचा व देवाच्या गहन गोष्टीचाही शोध घेतो.**
**11 मनुष्याच्या ठायी वसणारा जो आत्मा त्याच्यावाचून मनुष्यांच्या गोष्टी ओळखणारा मनुष्यांमध्ये कोण आहे? तसा देवाच्या गोष्टी ओळखणारा देवाच्या आत्म्याशिवाय कोणी नाही.**
**12 आपल्याला जगाचा आत्मा नव्हे, तर देवापासून निघणारा आत्मा मिळाला आहे; ह्यासाठी की, जे देवाने आपल्याला कृपेने दिले ते आपण ओळखून घ्यावे.**

देव त्याच्या पवित्र आत्म्याद्वारे आपल्याला आध्यात्मिक सत्य आणि वास्तव प्रकट करतो (अनावरण करतो, आच्छादन काढतो). त्याद्वारे देवाने आपल्याला विनामूल्य दिलेल्या गोष्टी जाणून घेण्याचे (समजण्यास, खात्री करण्यास, पाहण्यास, जाणण्यास) सामर्थ्य प्राप्त होते.

पवित्र आत्मा हा प्रकटीकरणाचा आत्मा आहे. तो आपल्याला शास्त्रवचनांत समाविष्ट असलेले दैवी सत्य पाहण्याचे सामर्थ्य देतो. तो आपल्याला प्राचीन काळातील माणसांनी लिहिलेल्या शब्दांच्या अर्थाच्या पलीकडे आणि देवाने व्यक्त केलेल्या मूळ विचारांमध्ये घेऊन जातो. मानवी विचार आणि देवाच्या विचारांमध्ये खूप फरक आहे. प्रभु देव म्हणाला, *"कारण आकाश जसे पृथ्वीहून उंच आहे, तसे माझे मार्ग तुमच्या मार्गांहून आणि माझ्या कल्पना तुमच्या कल्पनांहून उंच आहेत"* (यशया 55:9).

प्रकटीकरण हे बौद्धिक समजापासून आध्यात्मिक समजाकडे जाणे आहे. प्रकटीकरणाद्वारेच आपणास देवाचे विचार प्राप्त होतात. आपण आध्यात्मिक सत्ये समजू शकतो. जेव्हा एखाद्या व्यक्तीला आध्यात्मिक सत्याचे प्रकटीकरण मिळत नाही (म्हणजेच त्याला वचनाचा आध्यात्मिक समज प्राप्त होत नाही), तेव्हा येशू म्हणतो, *"तेव्हा तो दुष्ट येऊन त्याच्या अंतःकरणात पेरलेले ते हिरावून घेतो; वाटेवर पेरलेला तो हा आहे"* (मत्तय 13:19).

## प्रकटीकरणासाठी प्रार्थना करणे

**इफिसकरांस पत्र 1:17-19**
**17 आपला प्रभू येशू ख्रिस्त ह्याचा देव जो वैभवशाली पिता, ह्याने तुम्हांला आपल्या ओळखीसंबंधीच्या ज्ञानाचा व प्रकटीकरणाचा आत्मा द्यावा;**
**18 म्हणजे त्यामुळे तुमचे अंतःचक्षु प्रकाशित होऊन त्याच्या पाचारणामुळे निर्माण होणारी आशा कोणती, 'पवित्र जनांमध्ये' त्याने दिलेल्या 'वतनाच्या' वैभवाची समृद्धी केवढी,**
**19 आणि जे आपण विश्वास ठेवणारे त्या आपणांविषयीच्या त्याच्या सामर्थ्याचे अपार महत्त्व ते काय हे तुम्ही त्याच्या बलशाली पराक्रमाच्या कृतीवरून ओळखून घ्यावे.**

इफिसमधील विश्वासणाऱ्यांसाठी पौलाने केलेल्या प्रार्थनेत, तो आपल्या ओळखीसंबंधी ज्ञान आणि प्रकटीकरणाचा आत्मा यासाठी विशिष्टरित्या विनंती करतो यासाठी की त्यांना देवाच्या पाचारणाचा हेतू जाणून घेता यावा, देवाजवळ त्याच्या लोकांसाठी असलेले गौरवी वतनाची समृद्धी ओळखता यावी आणि देवाने त्याच्या लोकांस उपलब्ध करून दिलेल्या सामर्थ्याची थोरवी जाणून घेता यावी. म्हणून, अशा आध्यात्मिक सत्याचे ज्ञान आणि समज पवित्र आत्म्याच्या प्रकटीकरणाद्वारे आणि प्रकाशाद्वारे येते. पवित्र आत्मा आपले अंतःचक्षु प्रकाशित करतो यासाठी की आपणास आध्यात्मिक सत्य जाणून घेता यावे.

जेव्हा आपण प्रकटीकरणाच्या प्रक्रियेद्वारे आध्यात्मिक समज प्राप्त करतो, तेव्हा आपण स्वाभाविक बौद्धिक ज्ञानापासून निघून आमच्या आत्म्यामध्ये जाणण्याप्रत पोचतो. नैसर्गिक ज्ञान आणि आध्यात्मिक ज्ञान किंवा बौद्धिक ज्ञान आणि अंतःकरणाचे ज्ञान यात हा फरक आहे. जेव्हा आपल्याला एखादी गोष्ट आपल्या अंतःकरणात (आत्म्यात) उमजते, तेव्हा याचा अर्थ असा होतो की—ती गोष्ट समजून घेण्यासाठी आपल्या अंतःकरणाचे नेत्र प्रकाशित झाले आहेत. म्हणून आपण ते जाणतो आणि त्यावर अंतःकरणापासून विश्वास ठेवतो. आपण आध्यात्मिक सत्याचा स्वीकार करतो त्यावर विश्वास ठेवतो

आणि त्यामध्ये चालतो आणि त्याचा अनुभव घेतो.

म्हणून, जेव्हा आपण वचन ऐकतो किंवा वचन वाचतो, तेव्हा आपण प्रकटीकरणासाठी आणि आध्यात्मिक सत्याच्या समजासाठी प्रार्थना केली पाहिजे. जेव्हा आपल्याला वचनाचे प्रकटीकरण प्राप्त होते आणि आपण त्यावर विश्वास ठेवतो, तेव्हा सैतान ते वचन आपल्यापासून चोरून किंवा हिसकावून घेऊ शकत नाही. आपण ते पाहतो. आपण त्यावर विश्वास ठेवतो. ते आता आपले आहे!

# 9
# कापणीस अडखळण आणणारे: वचनास विरोध

**मत्तय 13:20,21**
**[20] खडकाळीवर पेरलेला तो हा आहे की, तो वचन ऐकतो व ते तत्काळ आनंदाने ग्रहण करतो;**
**[21] परंतु त्याला मूळ नसल्याकारणाने तो थोडाच वेळ टिकतो, आणि वचनामुळे संकट आले किंवा छळ झाला म्हणजे तो लगेच अडखळतो.**

**मार्क 4:16,17**
**[16] तसेच खडकाळ जमिनीत पेरलेले हे आहेत की, वचन ऐकताच ते आनंदाने ग्रहण करतात;**
**[17] तथापि त्यांच्यामध्ये मूळ नसल्याकारणाने ते अल्पकाळ टिकाव धरतात; मग वचनामुळे संकट आले किंवा छळ झाला म्हणजे ते लगेच अडखळतात.**

**लूक 8:13**
**खडकाळीवर असलेले हे आहेत की, ते ऐकतात तेव्हा वचन आनंदाने ग्रहण करतात; पण त्यांना मूळ नसते; ते काही वेळपर्यंत विश्वास ठेवतात व परीक्षेच्या वेळी माघार घेतात.**

आता आपण येशूने बीजास फळ देण्यापासून रोखणाऱ्या कोणत्या घटकांकडे लक्ष वेधले आहे ते पाहू. बीजात काहीही चुकीचे नाही. बीज हे देवाचे वचन आहे आणि म्हणूनच ते परिपूर्ण आहे. परंतु काही बाह्य घटक आहेत जे वचनाच्या बीजास फळ देण्यापासून रोखतात.

येशूने सांगितलेल्या कापणीच्या मार्गात अडखळण आणणाऱ्या बाह्य घटकांचा एक संच म्हणजे वचनामुळे होणारा त्रास किंवा छळ आणि परीक्षेचा काळ.

## वचनाला होणाऱ्या विरोधासमोर ठाम राहा

जसे आपण देवाचे वचन ऐकतो आणि स्वीकारतो, तसतसे वचनामुळे संकट (त्रास, दबाव), छळ (मानवी विरोध) आणि मोह (अडचणी, पापाकडे प्रवृत्त करणे) येतील. हे विरोध बहुतेकदा त्याच क्षेत्रात असतात जेथे आपण वचन ऐकतो आणि स्वीकारतो.कधीकधी, सैतानाची परीक्षा ही वचनाच्या सत्यावर शंका घेण्यास, प्रश्न विचारण्यास आणि देवाच्या वचनातील सत्याला तर्कशुद्धतेने नाकारायला आणि भीती किंवा अविश्वासाच्या ठिकाणी जाण्यास प्रवृत्त करतात. विरोधाचे स्वरूप आणि स्रोत काहीही असो, संकट असो, छळ किंवा परीक्षा असो, आपल्याला मिळालेल्या वचनावर विश्वास ठेवत आपण स्थिर राहिले पाहिजे. आपण देवाचे वचन घट्ट धरून ठेवले पाहिजे आणि त्याला आपल्या अंतःकरणात रुजू दिले पाहिजे, जेणेकरून ते आपल्या जीवनात फलदायी ठरू शकेल.

उदाहरणार्थ, आपण असे म्हणूया की आपण दैवी आरोग्यप्राप्तीबद्दल वचन ऐकतो. दैवी आरोग्यप्राप्तीचे प्रकटीकरण आपल्याला आनंदाने आणि मोठ्या उत्साहाने भरून टाकते. त्यानंतर लवकरच, आपल्याला एखाद्या आजारास तोंड द्यावे लागते. मग आपण काय करणार? “अरे, ते सर्वांसाठी नाही,” किंवा “कदाचित दैवी आरोग्य केवळ सुरुवातीच्या मंडळीसाठी होते आणि आज आपल्यासाठी नाही,” किंवा अशाच प्रकारचा दुसरा युक्तिवाद करून आपण दैवी आरोग्यप्राप्तीविषयीचे वचन नाकारू का? किंवा आपण जाणीवपूर्वक देवाच्या वचनाकडे परत जातो का, ते पुन्हा वाचतो, पुन्हा ऐकतो, त्यावर मनन करतो आणि दैवी आरोग्यप्राप्तीसाठी वचनाद्वारे आपल्या आत्म्याला आणखी जास्त पोषण देतो का? दुसरे करणे महत्त्वाचे आहे, जेणेकरून दैवी आरोग्याविषयी आपण ऐकलेले वचन आपल्यामध्ये अधिक खोलवर रुजेल.

## देवाचे वचन तुमच्यामध्ये खोलवर रुजू द्या

आपण वचन मोठ्या उत्साहाने, आनंदाने आणि जोमानें स्वीकार करू शकतो. पण खरी परीक्षा ही आहे की काळानुसार आपण वचनात टिकून राहणार का, जेणेकरून ते आपल्या जीवनात खरोखर *"मूळ धरू शकेल"*, म्हणजे आपल्या हृदयात खोलवर जाऊन दृढ राहू शकेल. जर वचनाची मुळे आपल्यामध्ये खोलवर रुजलेली नसतील, तर आपण अडखळू शकतो (दुखावले जाऊ शकतो, पाय घसरू शकतो) आणि वचनापासून दूर जाऊ शकतो (माघार घेऊ शकतो, विलग होऊ शकतो)

देवाचे वचन आपल्यामध्ये खोलवर रुजण्यासाठी, आपण देवाच्या वचनाचे सेवन करत राहिले पाहिजे आणि त्याविषयीची आपली समज अधिक दृढ केली पाहिजे. जेव्हा वेळ चांगली असते आणि वचनाला कुठलाही विरोध नसतो तेव्हा आपण हे केले पाहिजे. साधारणतः जेव्हा आपण एकाच संदेशाची पुनरावृत्ती ऐकतो-तोच शब्द आपल्याकडे वारंवार आणला जातो तेव्हा त्याकडे दुर्लक्ष करण्याची किंवा ते न ऐकण्याची आपली प्रवृत्ती होते. परंतु आपणास ते वचन ऐकण्याची आणि ऐकत राहण्याची गरज आहे जेणेकरून ते आपल्या आत खोलवर मुळावेल आणि जेव्हा आपल्याला वचनाचा विरोध होतो तेव्हा आपण स्थिर उभे राहू शकू. इब्री 2:1 मध्ये म्हटल्याप्रमाणे, *"ह्या कारणास्तव ऐकलेल्या गोष्टींकडे आपण विशेष लक्ष लावले पाहिजे, नाहीतर आपण त्यांपासून वाहवत जाऊ."*

तुम्हाला मिळालेल्या सत्याने आणि प्रकटीकरणाने तुमच्या आत्म्याचे सतत पोषण करा जेणेकरून ते तुमच्यात खोलवर मुळावेल. यामुळे हे सुनिश्चित होईल की तुम्ही अडचणीच्या काळात हार मानणार नाही.

# 10
# कापणीस अडखळण आणणारे: वचनाची वाढ खुंटविणारें

**मत्तय 13:22**
**काटेरी झाडांमध्ये पेरलेला तो हा आहे की, तो वचन ऐकतो, परंतु संसाराची चिंता व द्रव्याचा मोह वचनाची वाढ खुंटवतात आणि तो निष्फळ होतो.**

**मार्क 4:18,19**
**18 काटेरी झुडपांमध्ये पेरलेले हे आहेत की, ते वचन ऐकून घेतात,**
**19 व नंतर प्रपंचाची चिंता, द्रव्याचा मोह व इतर गोष्टींचा लोभ ही त्यांच्यामध्ये शिरून वचनाची वाढ खुंटवतात आणि ते निष्फळ होते.**

**लूक 8:14**
**काटेरी झाडांमध्ये पडलेले हे आहेत की, ते ऐकतात, आणि संसाराच्या चिंता, धन व विषयसुख ह्यांत आयुष्यक्रमण करत असता त्यांची वाढ खुंटते व ते पक्व फळ देत नाहीत.**

कापणीच्या कामात अडखळण आणणाऱ्या ज्या पुढील गोष्टीकडे येशूने लक्ष वेधले ते काटे आहेत जे वचनाचा गळा घोटतात. काटे हे संसाराच्या चिंता, द्रव्याचा मोह, इतर गोष्टींची इच्छा आणि जीवनातील सुखविलास दर्शवतात. या सर्वांचा एक सामान्य परिणाम म्हणजे लक्ष विचलित होणे. ते आपले लक्ष वचनापासून दूर इतर गोष्टींकडे वळवतात. म्हणून, हे काट्यांसारखे काम करतात जे पुरेसा प्रकाश, पाणी आणि पोषक तत्वे लहान रोपापर्यंत पोहोचण्यापासून रोखतात आणि अशा प्रकारे त्यांचा नाश करतात. आपल्या बाबतीतही हेच घडते. आपण विचलित होतो आणि इतर गोष्टींमध्ये गुंतून जातो आणि आपल्या हृदयात वचनाचे संरक्षण आणि संगोपन करण्याकडे आपण दुर्लक्ष करतो. अखेरीस, वचन आपल्या जीवनात निष्फळ ठरते.

## वचनास खुंटवणाऱ्या काट्यांपासून सावध असा

आपण आपल्या हृदयाचे रक्षण या संसाराच्या चिंता, द्रव्याचा मोह, इतर गोष्टींची जीवनाच्या सुखाची इच्छा यापासून केले पाहिजे. आपल्या सर्वांना चिंता असते (जबाबदाऱ्या ज्या आपण पूर्ण केल्या पाहिजेत), आपण संपत्ती (पैसा, वित्त, द्रव्य) हाताळतो, इतर आवडी बाळगतो आणि योग्य सुखांचा (चांगल्या गोष्टी) उपभोग करतो, परंतु आपण हे सुनिश्चित केले पाहिजे की या गोष्टींमुळे आपले अंतःकरण देवापासून आणि त्याच्या वचनापासून दूर जाता कामा नये.

काट्यांपासून सावध राहण्याचे काही व्यावहारिक मार्ग येथे आहेत.

1) देवावर आणि त्याच्या वचनावर तुमच्या प्रेमाची पुष्टी करा.

2) स्वतःच्या हृदयाचे रक्षण करा.

## *देवावर आणि त्याच्या वचनावर तुमच्या प्रेमाची पुष्टी करा*

स्तोत्रकर्त्याने स्तोत्रसंहिता 119 मध्ये सांगितल्याप्रमाणे, देव आणि त्याच्या वचनाबद्दल आपले प्रेम व आवड यांची वारंवार पुष्टी करणे खरोखर अद्‌त आहे.

स्तोत्रसंहिता 119 मधील काही निवडक वचने येथे आहेत जी आपल्याला देवाच्या वचनाबद्दल आपले प्रेम कसे व्यक्त करावे ते शिकवतात.

**स्तोत्रसंहिता 119:16,36,37,47,72,97,127,162**

**16 मी तुझ्या नियमांनी आनंदित होईन; मी तुझे वचन विसरणार नाही.**

**36 माझ्या मनाचा कल अन्याय्य लाभाकडे नको तर तुझ्या निर्बंधाकडे असू दे.**

**37 निरर्थक गोष्टी पाहण्यापासून माझी दृष्टी वळव. तुझ्या मार्गांत मला नवजीवन दे.**

**47 मी तुझ्या आज्ञांत आनंद मानीन, त्या मला प्रिय आहेत.**

**72 सोन्यारुप्याच्या लक्षावधी नाण्यांपेक्षा तुझ्या तोंडचे नियमशास्त्र मला मोलवान आहे.**

**97 अहाहा, तुझे नियमशास्त्र मला किती प्रिय आहे! दिवसभर मी त्याचे मनन करतो.**
**127 ह्यामुळे मी तुझ्या आज्ञा सोन्यापेक्षा, बावनकशी सोन्यापेक्षा प्रिय मानतो.**
**162 मोठी लूट सापडलेल्या मनुष्याला जसा आनंद होतो तसा तुझ्या वचनाविषयी मला आनंद होतो.**

## *आपल्या अंतःकरणाचे रक्षण करा*

आपल्याला आपल्या हृदयातील आवडी-निवडी आणि भावना यांवर सतत लक्ष ठेवले पाहिजे. आपले हितसंबंध कुठे आहेत आणि ते कशावर आधारित आहेत यावर आपण लक्ष ठेवतो. जेव्हा आपल्याला वाटते की आपण विचलित झालो आहोत किंवा आपल्या पहिल्या प्रेमापासून दूर जात आहोत, तेव्हा आपण ते कबूल करतो आणि प्रभूला विनंती करतो की त्याने आपले हृदय पुन्हा वळवावे आणि आपल्याला त्याच्याकडे परत आणावे. आपण देवाचा शोध घेण्याद्वारे जाणूनबुजून आणि व्यावहारिकरित्या देवाला आपल्या जीवनात प्रथम स्थान देत आहोत याची खात्री करून घ्या (मत्तय 6:33). उपासना, प्रार्थना आणि त्याच्या वचनात देवासोबत त्याच्या सान्निध्यात राहण्यासाठी वेळ आणि जागा काढा. *"...संपत्ती वाढली तरी तिच्यावर चित्त ठेवू नका"* (स्तोत्रसंहिता 62:10).

# 11
# तीन किल्ल्या: समजणे, स्वीकारणे, राखणे

प्रभू येशूने आपल्याला हे दाखवून दिले की शेवटी कोणती गोष्ट आपल्या जीवनात देवाच्या वचनाचे बीज फलद्रूप होण्यास कारणीभूत ठरते. तीन शुभवर्तमानांत हे कसे नमूद करण्यात आले आहे ते पाहिल्यावर आपल्याला कळते की जेव्हा आपण (मत्तय 13:23) वचन समजून घेऊ, स्वीकारू (मार्क 4:20) आणि आपल्या हृदयात ठेवू (लूक 8:15) तेव्हा आपण आपल्या जीवनात फळे उत्पन्न करू.

## समजून घ्या

**मत्तय 13:23**

**चांगल्या जमिनीत पेरलेला तो हा आहे की, तो वचन ऐकून ते समजतो; तो फळ देतोच देतो; कोणी शंभरपट, कोणी साठपट, तर कोणी तीसपट असे देतो.**

आपण मागील प्रकरणात आध्यात्मिक सत्य समजून घेण्याच्या आणि प्रकटीकरण प्राप्त करण्याच्या महत्वाचे परीक्षण केले आहे. आध्यात्मिक सत्याचे प्रकटीकरण आपल्या हृदयात टप्प्याटप्प्याने होते. पवित्र आत्म्याद्वारे आपल्या अंतःकरणात जसजसा प्रकाश पडत जातो तसतसे आम्हास आध्यात्मिक सत्य अधिक स्पष्टपणे दिसून येते. त्याच्या वचनात आम्हास दिलेल्या सत्याच्या विविध क्षेत्रांबद्दल आम्हास प्रकटीकरण मिळत राहिले पाहिजे. आपण आपल्या प्रभूच्या ज्ञानात सतत वाढत गेले पाहिजे (कलस्सै 1:10), कृपेत आणि ज्ञानात वाढत गेले पाहिजे (2 पेत्र 3:18), आपल्या ज्ञानात नवीकरण झाले पाहिजे (कलस्सै 3:10), ख्रिस्ताचे प्रेम समजून आणि जाणून घेतले पाहिजे (इफिसकरांस पत्र 3:18-19) आणि देवाच्या पुत्राच्या ज्ञानाप्रत पोहोचले पाहिजे (इफिसकरांस पत्र 4:13). आपला आध्यात्मिक प्रवास म्हणजे

आपल्या देवाचे प्रकटीकरण, त्याचे उद्देश, त्याने आपल्यासाठी दिलेला वारसा आणि त्याने आपल्यासाठी उपलब्ध करून दिलेले सामर्थ्य यांमध्ये सतत होणारी वाढ होय.

म्हणून, वचन ऐकत रहा. वचनावर मनन करत रहा. शास्त्रवचनांचा अभ्यास करत रहा. ख्रिस्ती विश्वासाच्या आणि प्रवासाच्या सर्व क्षेत्रांमध्ये प्रकटीकरण आणि नवीन अंतर्दृष्टी प्राप्त करत रहा. स्तोत्रकर्त्याप्रमाणे, आपण सतत प्रार्थना करतो, *"तू माझे नेत्र उघड, म्हणजे तुझ्या नियमशास्त्रातील अद्भुत गोष्टी माझ्या दृष्टीस पडतील"* (स्तोत्रसंहिता 119:18).

## स्वीकार करा

**मार्क 4:20**

**चांगल्या जमिनीत पेरलेले हे आहेत की, ते वचन ऐकून ते स्वीकारतात; मग कोणी तीसपट, कोणी साठपट, कोणी शंभरपट असे पीक देतात.**

आपण देवाचे वचन ग्रहण केले पाहिजे, स्वीकारले पाहिजे आणि आत्मसात केले पाहिजे, म्हणजेच आपल्या अंतःकरणाने त्यावर विश्वास ठेवला पाहिजे. आपल्या अंतःकरणात आणि जीवनात त्याचे कार्य करण्यासाठी आपण वचनावर पूर्ण मनाने विश्वास ठेवला पाहिजे. इब्री 4:2 आपल्याला काय सांगते याची नोंद घेणे मनोरंजक आहे, *"कारण त्यांच्यासारखी आपल्यालाही सुवार्ता सांगण्यात आली आहे, परंतु ऐकलेले वचन त्यांना लाभदायक झाले नाही; कारण त्याचा ऐकणाऱ्यामध्ये विश्वासाबरोबर संयोग झाला नाही."* जेव्हा आपण विश्वासाला वचनासोबत जोडण्यात अयशस्वी होतो (वचनावर विश्वास ठेवा), तेव्हा वचन आपल्याला फायदा किंवा लाभ देणार नाही. दुसरीकडे, जेव्हा आपण त्या वचनावर विश्वास ठेवतो, तेव्हा ते आपल्या जीवनात फळ देताना आणि पूर्ण होताना आपण पाहू. *"जिने विश्वास ठेवला ती धन्य, कारण प्रभूने तिला सांगितलेल्या गोष्टींची पूर्णता होईल"* (लूक 1:45).

आम्ही आधी उल्लेख केल्याप्रमाणे, सैतान आणि त्याचे दुरात्मे शंका, अविश्वास, भीती इत्यादींद्वारे त्याच्या वचनावर विश्वास ठेवण्यापासून तुम्हास रोखण्याचा आटोकाट प्रयत्न करतील, पण आपण विश्वासात स्थिर राहावे. वचनावर विश्वास करीत रहा. त्याचे वचन सत्य आहे (योहान 17:17).

## धरून ठेवा

**लूक 8:15**

**चांगल्या मातीत पडलेले हे आहेत की, ते वचन ऐकून सालस व चांगल्या अंतःकरणात धरून ठेवतात आणि धीराने फळ देत जातात.**

वरील वचनात "धरून ठेवणे" या शब्दाचा ग्रीक अर्थ आहे घट्ट धरून ठेवणे, टिकवून ठेवणे, टिकून राहणे, चिकटून राहणे आणि बिलगून राहणे. म्हणून, आपल्या मार्गात येणाऱ्या सर्व संकटांत आणि काळातही, आपण धीराने देवाचे वचन धरून ठेवले पाहिजे. हेच वचन आपल्या जीवनात फळ उत्पन्न करेल.

जर आमच्या जीवनात वचनाद्वारे फळ यावयाचे असेल तर, या तीन किल्ल्या-वचन समजणे, वचन ग्रहण करणे आणि वचनात टिकून राहणे अतिशय महत्त्वाच्या आहेत. सुरुवातीला जेव्हा आपण वचनावर मनन करतो आणि वचनाचा स्वीकार करतो, तेव्हा आपल्याला फार कमी प्रमाणात (तीस पट) फळ येताना दिसत असेल. आपण यात टिकून राहिले पाहिजे आणि वचनासोबत राहिले पाहिजे. प्रकटीकरण प्राप्त करत राहा, वचनावर विश्वास ठेवा आणि आपल्या जीवनात वचनाचे पालन करा. लवकरच आपण मोठ्या प्रमाणात फळ येताना पाहू, साठ पट आणि नंतर शंभर पट.

## वचनाच्या आधारे जीवन जगा

**याकोब 1:22,25**

**22 वचनाप्रमाणे आचरण करणारे असा, केवळ ऐकणारे असू नका; अशाने**

**तुम्ही स्वतःची फसवणूक करता.**
**25 परंतु जो स्वातंत्र्याच्या परिपूर्ण नियमांचे निरीक्षण करून ते तसेच करत राहतो, तो ऐकून विसरणारा न होता, कृती करणारा होतो व त्याला आपल्या कार्यात धन्यता मिळेल.**

शेवटी, देवाच्या वचनाचे प्रकाशन मिळण्याचा हेतू हा आहे की त्याद्वारे आपल्या मनाचे नवीकरण होईल आणि आपले जीवन बदलले जाईल (रोमकरांस पत्र 12:2). आपल्याला प्रकट होणाऱ्या आध्यात्मिक सत्यांचा आपल्या विचारांवर प्रभाव पडलाच पाहिजे. आपल्या विचारसरणीवर, तर्कशक्तीवर आणि मन वळवण्याच्या क्षमतेवर आपल्याला प्राप्त झालेल्या आध्यात्मिक ज्ञानाचा प्रभाव असला पाहिजे आणि त्यानेच त्यांना नियंत्रित केले पाहिजे. या प्रक्रियेस "मनाचे नवीकरण" म्हणतात. जेव्हा असे घडते, आपण देवाच्या वचनातून मिळालेल्या प्रकाशनानुसार सातत्याने जीवन जगू शकतो. आपण देवाच्या वचनानुसार वागणारे बनले पाहिजे आणि आपल्याला मिळालेल्या सत्यानुसार जगले पाहिजे. जेव्हा आपण वचनाप्रमाणे जगतो, तेव्हा आपण वचनात दिलेल्या आशीर्वादांमध्ये चालू लागतो.

देवाने आपल्याला शास्त्रवचने देण्याचा हेतू हा आहे की आपण नेहमी त्यानुसार जगावे. त्याने आपल्याला त्याचे वचन समजण्यासाठी त्याचा आत्मा उपलब्ध करून दिला आहे. तथापि, केवळ देवाच्या वचनाचे प्रकटीकरण प्राप्त होणे, त्याच्या अभिवचनांमधील पूर्ण आशीर्वादांचा अनुभव घेण्यासाठी पुरेसे नाही. जी व्यक्ती दैवी प्रकटीकरणाला सातत्यपूर्ण कृतीत उतरवते, तीच देवाने वचन दिलेल्या समृद्धीत चालते.

आमचे तुम्हाला आव्हान हे आहे की, पवित्र शास्त्राचे सखोल आकलन होण्यासाठी तुम्ही पवित्र आत्म्यावर अवलंबून राहाल. नंतर तुम्ही प्राप्त केलेल्या प्रकटीकरणाद्वारे तुमच्या मनाचे नवीकरण होऊ द्यावे. आणि मग, तुम्ही मिळवलेल्या त्या प्रकाशनाला तुमच्या दैनंदिन

जीवनात शिस्तबद्ध कृतीत उतरवा. मग तुम्ही अशी व्यक्ती बनाल, जसे पवित्र शास्त्र म्हणते, तो जे काही करतो त्यामध्ये तो आशीर्वादित असतो.

## टिकणारे वचन

प्रेषित योहान आपल्यासाठी लिहून ठेवतात की देवाचे वचन आपल्यामध्ये राहणे आणि आपण त्या वचनात राहणे किती महत्त्वपूर्ण आहे. "राहणे" चा सरळ अर्थ "आहे टिकून राहणे, वस्ती राहणे, राखणे, सातत्याने चालू ठेवणे." याचा अर्थ असा त्याच्या वचनास घट्ट धरून ठेवणे आणि काळाच्या ओघात सातत्याने त्या वचनानुसार जीवन जगणे. येशूने आम्हास शिकवले की जेव्हा आपण त्याच्या वचनात राहतो, तेव्हा त्यावरून दिसून येते की आपण त्याचे खरे शिष्य आहोत. असे केल्याने आपण त्या सत्यामध्ये प्रवेश करतो जे आपल्याला मुक्त करते आणि बदलून टाकते (योहान 8:31,32). आपले त्यावरील प्रेम आपण त्याच्या वचनात राहून व्यक्त करतो. जो व्यक्ती त्याच्या वचनाचे पालन करतो त्यास तो स्वतःविषयी आणखी प्रगट करील. जेव्हा आपण त्याच्या वचनात टिकून राहू तेव्हा आपल्याला त्याच्या सानिध्याचा अनुभव होईल (योहान 14:21,23). त्याच्या ठायी राहणे आणि त्याचे वचन आमच्या ठायी या प्रार्थना पूर्ण होण्याच्या चाव्या आहेत. येशूने म्हटले, *"तुम्ही माझ्यामध्ये राहिलात व माझी वचने तुमच्यामध्ये राहिली तर जे काही तुम्हांला पाहिजे असेल ते मागा म्हणजे ते तुम्हांला प्राप्त होईल"* (योहान 15:7). तसेच, आपण आधी उल्लेख केल्याप्रमाणे, त्याच्या शाश्वत वचनाद्वारेच आपण सैतानावर विजय मिळवून जगतो *"तरुणांनो, मी तुम्हांला लिहिले आहे, कारण तुम्ही बलवान आहात. तुमच्या ठायी देवाचे वचन राहते आणि त्या दुष्टाला तुम्ही जिंकले आहे"* (1 योहान 2:14).

## तुम्ही देवाची बाग आहात

शेवटी, आपण, आपल्यापैकी प्रत्येक जण स्वतःची कल्पना देवाची बाग

म्हणून करू शकतो. देवाने आपल्याला आपले वचन-चमत्कारिक बीज-दिले आहे, जे तो इच्छितो की आपण आपल्या स्वतःच्या हृदयात आणि जीवनात पेरावे. आशीर्वाद, विजय, आरोग्यप्राप्ती, समृद्धी, शांती, प्रेम, पावित्र्य, शुद्धता, सामर्थ्य आणि आणखी बऱ्याच गोष्टींची बीजे आहेत, ज्या आपल्या जीवनात या ह्या गोष्टी उत्पन्न करू शकतात. आपण आपल्या हृदयात आणि जीवनात देवाच्या वचनाचे बी पेरण्याची शिस्त अंगी बाणू या. देवाच्या वचनाच्या सामर्थ्याद्वारे त्याला आपल्या जीवनात त्याचा उद्देश आणि इच्छा पूर्ण करू देऊया.

# 12
# वचनाची बीजे

हे समान विषयावर आधारित शास्त्रवचनांचा संग्रह आहे. तुम्ही यामध्ये आणखी वचने जोडू शकता आणि तुम्हाला महत्त्वाच्या वाटणाऱ्या विषयांवर शास्त्रवचने संकलित करू शकता. गरजेच्या वेळी त्यांचा त्वरित संदर्भ म्हणून उपयोग करा. देवाच्या वचनावर वारंवार मनन करा.

## एक दैवी संरक्षण

• स्तोत्र 34:7; स्तोत्र 91:11,12; स्तोत्र 103:20 • दानीएल 6:22 •मत्तय 18:10 • लूक 22:41-43 •प्रेषितांची कृत्ये 5:19,20; प्रेषितांची कृत्ये 8:26; प्रेषितांची कृत्ये 12:7-11; प्रेषितांची कृत्ये 27:23,24 •इब्री 1:14

## अभिषेक

• निर्गम 30:25-33 • 1 शमुवेल 24:6 • 1 इतिहास 16:21,22 • स्तोत्र 28:8; स्तोत्र 45:7; स्तोत्र 92:10; • यशया 10:27; यशया 61:1-3 • मीखा 3:8 • जखऱ्या 4:6,7 • मत्तय 12:28 • लूक 1:35; लूक 4:14,18,19; लूक 5:17; लूक 6:19; लूक 8:43-48; लूक 24:49 • योहान 7:37-39 • प्रेषितांची कृत्ये 1:8; प्रेषितांची कृत्ये 4:33; प्रेषितांची कृत्ये 5:12-16; प्रेषितांची कृत्ये 6:8; प्रेषितांची कृत्ये 10:38 •रोमकरांस पत्र 1:3,4; रोमकरांस पत्र 15:13,18,19 • 1 करिंथ 2:4,5; 1 करिंथ 5:4 • 2 करिंथ 1:21,22 • इफिसकरांस पत्र 1:19,20; इफिसकरांस पत्र 3:16,20,21; • 1 थेस्सलनीकाकरांस 1:5 • 2 तीमथ्य 1:7 • इब्री 2:3,4 • 1 योहान 2:20,27

## प्रार्थनेचे उत्तर

• स्तोत्रसंहिता 37:4; स्तोत्रसंहिता 65:2; स्तोत्रसंहिता 84:11 • नीतिसूत्रे 10:24; नीतिसूत्रे 15:29ब •मत्तय 7:7-11; मत्तय 18:18-20; मत्तय 21:22 • मार्क 11:22-24 • लूक 18:1 • योहान 14:13,14; योहान 15:7; योहान 16:23,24 • फिलिप्पैकरांस पत्र 4:6,7 • याकोब 1:5-7; याकोब 5:14-16 • 1 पेत्र 3:12 •1 योहान 3:21,22; 1 योहान 5:14,15

## देवाचे शस्त्र

• रोमकरांस पत्र 13:12-14 • 2 करिंथ 6:3-7; 2 करिंथ 10:3-5 • इफिसकरांस पत्र 6:10-18 •1 तीमथ्य 1:18

## गर्भातील बाळ

• उत्पत्ती 20:17,18 • निर्गम 23:25,26 • अनुवाद 7:12-15; अनुवाद 28:4 • ईयोब 31:15 •स्तोत्रसंहिता 8:2; स्तोत्रसंहिता 71:5-7; स्तोत्रसंहिता 113:9; स्तोत्रसंहिता 119:73; स्तोत्रसंहिता 138:8; स्तोत्रसंहिता 139:13-17 • यशया 66:9 • यिर्मया 1:5 • गलतीकरांस पत्र 1:15,16

## विश्वासणाऱ्याचा अधिकार

• मत्तय 10:1,7-8; मत्तय 16:18,19; मत्तय 28:18-20; • मार्क 3:14,15; मार्क 9:38-40; मार्क 16:17,18 • लूक 10:17-20 • प्रेषितांची कृत्ये 3:6-9,16; प्रेषितांची कृत्ये 4:9,10; प्रेषितांची कृत्ये 16:16-18 • इफिसकरांस पत्र 2:4-6 • फिलिप्पैकरांस पत्र 2:9-11

## आशीर्वाद देणे आणि आशीर्वादित होणे

• उत्पत्ती 12:1-3; उत्पत्ती 17:7; उत्पत्ती 22:17-18; उत्पत्ती 24:1,35; उत्पत्ती 26:12-14 • गणना 6:23-27 • अनुवाद 28:1-14 • स्तोत्रसंहिता 103:1-6; स्तोत्रसंहिता 112:1-10; स्तोत्रसंहिता 128:1-6 • नीतिसूत्रे 10:22; •गलतीकरांस पत्र 3:9,13,14,29 • इफिसकरांस

पत्र 1:3 • इब्री 8:6

## येशूचे रक्त

• निर्गम 12:13,23; निर्गम 24:8 • लेवीय 17:11 •जखऱ्या 9:11 • मत्तय 26:28 • प्रेषितांची कृत्ये 20:28 • रोमकरांस पत्र 3:24-26; रोमकरांस पत्र 5:9 • 1 करिंथ 5:7; 1 करिंथ 10:16 • इफिसकरांस पत्र 1:7; इफिसकरांस पत्र 2:13 • कलस्सै 1:14,20-22; कलस्सै 2:14,15 • इब्री 2:14,15; इब्री 9:12-14; इब्री 10:19-22,28,29; इब्री 12:22-24; इब्री 13:12,20,21; 1 पेत्र 1:1,2,18,19; • 1 योहान 1:7 •प्रकटीकरण 1:5,6; प्रकटीकरण 5:9,10; प्रकटीकरण 7:14,15; प्रकटीकरण 12:10,11

## धैर्य

• स्तोत्रसंहिता 138:3 • नीतिसूत्रे 28:1 • प्रेषितांची कृत्ये 4:13, 29-31; प्रेषितांची कृत्ये 14:3• 2 करिंथ 3:11,12 • फिलिप्पैकरांस पत्र 1:20 • 2 तीमथ्य 1:7• 1 योहान 4:17,18

(धैर्य, आत्मविश्वास देखील पहा)

## हाडे

• स्तोत्रसंहिता 34:20 • नीतिसूत्रे 3:5-8; नीतिसूत्रे 14:30; नीतिसूत्रे 17:22 • यशया 58:11

## भुते काढणे

• मत्तय 4:23,24; मत्तय 8:16,17; मत्तय 9:32,33; मत्तय 10:1,7,8; मत्तय 12:28,29; मत्तय 17:18-21• मार्क 3:14,15; मार्क 6:7,12,13; मार्क 9:38-40; मार्क 16:17,18 • लूक 9:1,2; लूक 10:17-20; लूक 13:10-13 • योहान 14:12 • प्रेषितांची कृत्ये 16:16-18; प्रेषितांची कृत्ये 19:11,12

## मुले

• अनुवाद 4:9; अनुवाद 6:4-7; अनुवाद 28:4; अनुवाद 30:6 • स्तोत्रसंहिता 25:12,13; स्तोत्रसंहिता 37:25,26; स्तोत्रसंहिता 78:4-6; स्तोत्रसंहिता 90:16; स्तोत्रसंहिता 103:17; स्तोत्रसंहिता 112:1,2; स्तोत्रसंहिता 113:9; स्तोत्रसंहिता 127:1-5 • नीतिसूत्रे 13:22; नीतिसूत्रे 14:26; नीतिसूत्रे 20:7; नीतिसूत्रे 22:6; नीतिसूत्रे 31:28 • यशया 8:18; यशया 44:3,4; यशया 49:25; यशया 54:13; यशया 59:21 • मलाखी 4:5,6 • लूक 1:17 • इफिसकरांस पत्र 6:4 • कलस्सै 3:21 •1 तीमथ्य 3:4,5,12 • 2 तीमथ्य 1:5; 2 तीमथ्य 3:15 • 3 योहान 1:4

## विश्वास

• स्तोत्रसंहिता 65:5; स्तोत्रसंहिता 118:8,9 • नीतिसूत्रे 3:26; नीतिसूत्रे 14:26

(हिंमत, धैर्य देखील पहा)

## धैर्य

• अनुवाद 31:6 • यहोशवा 1:7,9 • 2 इतिहास 32:7 • स्तोत्रसंहिता 27:14

(धैर्य, आत्मविश्वास देखील पहा)

## कर्ज रद्द

• अनुवाद 15:6; अनुवाद 28:8,11,12 • 2 राजे 4:1-7 • स्तोत्रसंहिता 128:1,2 • नीतिसूत्रे 3:9,10; नीतिसूत्रे 22:7 • यशया 65:22 • मलाखी 3:10,11 • मत्तय 17:24-27 • मार्क 11:22,23 • लूक 5:4-7 • रोमकरांस पत्र 2:11; रोमकरांस पत्र 13:8

## मुक्ती

• स्तोत्रसंहिता 18:1,2,17,19,43,48,50; स्तोत्रसंहिता 32:7;

स्तोत्रसंहिता 34:4,7,17,19; स्तोत्रसंहिता 91:3,14,15; स्तोत्रसंहिता 107:20; स्तोत्रसंहिता 116:8 • मत्तय 6:13 • कलस्सै 1:12,13 • गलतीकरांस पत्र 1:4 • 2 तीमथ्य 4:18 • 2 पेत्र 2:9

## महत्कृत्ये

• यहोशवा 1:5 • स्तोत्रसंहिता 60:12 • यशया 45:1-3 • दानीएल 11:32ब • 1 करिंथ 2:9,10 •इफिसकरांस पत्र 2:10; इफिसकरांस पत्र 3:20, 21 • फिलिप्पैकरांस पत्र 1:6; फिलिप्पैकरांस पत्र 2:13 • इब्री 11:33,34

## विश्वास

• मत्तय 9:28,29; मत्तय 17:20; मत्तय 21:21 • मार्क 9:23; मार्क 11:22,23 • लूक 1:45; लूक 17:5,6 • योहान 11:40 • प्रेषितांची कृत्ये 3:16; प्रेषितांची कृत्ये 6:8; प्रेषितांची कृत्ये 27:25 • रोमकरांस पत्र 4:12,17-21; रोमकरांस पत्र 10:8-10; रोमकरांस पत्र 12:3 • 2 करिंथ 4:13; 2 करिंथ 5:7 • गलतीकरांस पत्र 5:6 • इफिसकरांस पत्र 6:16 • 2 थेस्सलनीकाकरांस 1:3,11;1 तीमथ्य 6:12; फिलेमोन 1:6; इब्री 3:1; इब्री 4:2,14; इब्री 6:12; इब्री 10:22,23,35,36; याकोब 1:5-7; याकोब 2:17,18,21,22,26

## कृपा आणि चांगले संबंध

• उत्पत्ती 39:2-4,21 • निर्गम 12:36 • 1 इतिहास 29:12 • स्तोत्रसंहिता 5:12; स्तोत्रसंहिता 30:5; स्तोत्रसंहिता 119:74 •नीतिसूत्रे 3:3,4; नीतिसूत्रे 4:7,8; नीतिसूत्रे 12:2; नीतिसूत्रे 16:7; नीतिसूत्रे 22:4; नीतिसूत्रे 29:23 •यशया 61:7 • 1 तीमथ्य 4:1

## भविष्य

• स्तोत्रसंहिता 31:15; स्तोत्रसंहिता 71:6,7,17,18; स्तोत्रसंहिता 138:8 • नीतिसूत्रे 3:5,6; नीतिसूत्रे 4:18 • यशया 46:3,4; यशया 64:8

• यिर्मया 29:11 • मत्तय 6:25-34 • रोमकरांस पत्र 8:28 • 1 करिंथ 2:9,10 • इफिसकरांस पत्र 2:10 •फिलिप्पैकरांस पत्र 3:12-14; फिलिप्पैकरांस पत्र 4:6,7

## आत्म्याची कृपादाने

• प्रेषितांची कृत्ये 2:22,43; प्रेषितांची कृत्ये 5:12-16; प्रेषितांची कृत्ये 6:8; प्रेषितांची कृत्ये 7:36; प्रेषितांची कृत्ये 14:3 • रोमकरांस पत्र 12:6; रोमकरांस पत्र 15:18,19 • 1 करिंथ 2:4,5; 1 करिंथ 4:20; 1 करिंथ 12:1-11,31; 1 करिंथ 14:1,3,12,26,31,39; • 2 करिंथ 12:12 • 1 थेस्सलनीकाकरांस 1:5 •इब्री 2:3,4

## देवाचे गौरव

• निर्गम 24:16,17; निर्गम 29:43; निर्गम 33:18,19; निर्गम 40:33-35 • गणना 9:15-23; गणना 14:21 • अनुवाद 5:24 • 1 शमुवेल 4:21,22 • 1 राजे 8:10,11• 2 इतिहास 5:13,14 • स्तोत्रसंहिता 24:7-10; स्तोत्रसंहिता 26:8; स्तोत्रसंहिता 63:1,2; स्तोत्रसंहिता 85:9; स्तोत्रसंहिता 90:16,17 • यशया 4:5,6; यशया 11:10; यशया 35:1,2; यशया 40:5; यशया 42:8; यशया 48:11; यशया 58:8; यशया 60:1-7 •यहेज्केल 1:28; यहेज्केल 3:12; यहेज्केल 10:4,18 • हबक्कूक 2:14; हबक्कूक 3:3,4 • हाग्गय 2:7-9 • योहान 1:14; योहान 2:11; योहान 11:4,40; योहान 14:21-23; योहान 17:5,22,24 • प्रेषितांची कृत्ये 7:55 • रोमकरांस पत्र 8:15-25 • 1 करिंथ 3:16; 1 करिंथ 10:31 • 2 करिंथ 3:7-18; 2 करिंथ 4:6,7,16-18; • इफिसकरांस पत्र 2:21,22 • कलस्सै 1:26,27 • इब्री 1:3 • 1 पेत्र 4:14 • 2 पेत्र 1:16-18

## दैवी इच्छा

• स्तोत्रसंहिता 27:4; स्तोत्रसंहिता 37:4; स्तोत्रसंहिता 42:1,2;

स्तोत्रसंहिता 84:1-3,10; स्तोत्रसंहिता 63:1-8; स्तोत्रसंहिता 145:19 • नीतिसूत्रे 10:24; • यशया 26:9 • मत्तय 6:33 • मार्क 12:29-31 • रोमकरांस पत्र 8:13• 2 करिंथ 5:14,15 • गलतीकरांस पत्र 2:20; गलतीकरांस पत्र 5:24; गलतीकरांस पत्र 6:7,8,14 • फिलिप्पैकरांस पत्र 3:7-11; फिलिप्पैकरांस पत्र 4:8 • कलस्सै 3:1-3 • 2 तीमथ्य 2:19-21 • याकोब 4:4 • 1 योहान 2:15-17

## आपल्या देवाची महानता

• स्तोत्रसंहिता 86:8-12; स्तोत्रसंहिता 121:2; स्तोत्रसंहिता 145:1-21; स्तोत्रसंहिता 147:4,5 • यशया 37:16; यशया 40:21-31; यशया 45:12,18 • यिर्मया 32:17,27; यिर्मया 51:15 • रोमकरांस पत्र 11:33-36 • 1 तीमथ्य 6:14-16 •प्रकटीकरण 5:11-14; प्रकटीकरण 7:9-12; प्रकटीकरण 19:4-6

## मार्गदर्शन

• स्तोत्रसंहिता 25:12; स्तोत्रसंहिता 32:8,9; स्तोत्रसंहिता 37:23,24; स्तोत्रसंहिता 119:103-105,130,133; • नीतिसूत्रे 3:5,6; नीतिसूत्रे 4:18,26; • यशया 58:11 • रोमकरांस पत्र 8:14 • कलस्सै 3:15

## आरोग्यदान आणि आरोग्य

• उत्पत्ती 20:17 • निर्गम 15:26; निर्गम 23:25,26 • अनुवाद 7:15 • ईयोब 33:19-28 • स्तोत्रसंहिता 30:2; स्तोत्रसंहिता 41:1-3; स्तोत्रसंहिता 91:5-10; स्तोत्रसंहिता 103:1-5; स्तोत्रसंहिता 107:20 • नीतिसूत्रे 3:7-8; नीतिसूत्रे 4:20-22; नीतिसूत्रे 12:18; नीतिसूत्रे 18:21,22 • यशया 6:10; यशया 53:4,5; यशया 58:8 • यिर्मया 17:14 •यहेज्केल 34:4; यहेज्केल 47:8,9 • मत्तय 4:24; मत्तय 8:16,17; मत्तय 12:15; मत्तय 15:25-28 •मार्क 5:34 • लूक 4:40; लूक 13:11-13,16 • प्रेषितांची कृत्ये 10:38 • रोमकरांस पत्र 8:11 •1 करिंथ 6:19,20 • इब्री 11:11 • याकोब 5:14,15 • 1 पेत्र

2:24 • प्रकटीकरण 22:1,2

## आजारी लोकांना बरे करणे

• मत्तय 4:23,24; मत्तय 10:1,7,8; मत्तय 15:29-31 • मार्क 6:7,12,13; मार्क 16:17,18 • लूक 5:17; लूक 6:17-19; लूक 9:1,2,11; लूक 10:1,9 • योहान 14:12 • प्रेषितांची कृत्ये 10:38 • 1 करिंथ 12:7-11 • याकोब 5:14-16 • 1 योहान 3:8

## पवित्रता (पापावर विजय मिळवणे, शुद्धता)

• निर्गम 15:11; निर्गम 19:6 • अनुवाद 7:6; अनुवाद 23:14 • ईयोब 31:1 स्तोत्रसंहिता 1:1-3; स्तोत्रसंहिता 4:3; स्तोत्रसंहिता 15:1-5; स्तोत्रसंहिता 19:12-14; स्तोत्रसंहिता 24:3-5; स्तोत्रसंहिता 29:2; स्तोत्रसंहिता 96:9; स्तोत्रसंहिता 119:9-11 • नीतिसूत्रे 5:15-23; नीतिसूत्रे 6:23-25 • उपदेशक 7:26 • यशया 52:11 • ओबद्या 1:17 • मलाखी 3:1-3 •मत्तय 5:29,30 • रोमकरांस पत्र 1:4; रोमकरांस पत्र 6:6,7,12-14; रोमकरांस पत्र 8:5-8,12-13; रोमकरांस पत्र 12:1,2; रोमकरांस पत्र 13:11-14 • 1 करिंथ 3:16,17; 1 करिंथ 6:12,13,17-20 • 2 करिंथ 6:14-18; 2 करिंथ 7:1;2 करिंथ 10:3-5 •इफिसकरांस पत्र 4:20-32; इफिसकरांस पत्र 5:1-5 • फिलिप्पैकरांस पत्र 2:14,15; फिलिप्पैकरांस पत्र 4:4-8 • 1 थेस्सलनीकाकरांस 4:3-7 • 2 तीमथ्य 2:19-22 • तीत 2:11-14 • इब्री 10:26,27; इब्री 12:1-4,14-16; • याकोब 3:8-10; याकोब 4:4-8 • 1 पेत्र 1:13-17; 1 पेत्र 2:9-12; 1 पेत्र 4:1,2 • 2 पेत्र 3:14,17,18 • 1 योहान 2:15-17 • यहूदा 1:17-25

## घर आणि कुटुंब

• उत्पत्ती 18:19; उत्पत्ती 22:16-18; उत्पत्ती 39:2-5 • अनुवाद 28:1-12 • यहोशवा 24:14,15 • 2 शमुवेल 6:12 • ईयोब 5:24 • स्तोत्रसंहिता 68:5; स्तोत्रसंहिता 91:10; स्तोत्रसंहिता 101:1,2,7; स्तोत्रसंहिता 112:1-3; स्तोत्रसंहिता 118:15; स्तोत्रसंहिता 127:1-5;

स्तोत्रसंहिता 128:1-4; स्तोत्रसंहिता 144:12-15 • नीतिसूत्रे 3:33; नीतिसूत्रे 12:7; नीतिसूत्रे 14:11; नीतिसूत्रे 15:6 • यशया 32:17-19; यशया 65:21-23 • योहान 14:23

## पती

• उत्पत्ती 2:22-24 • स्तोत्रसंहिता 128:1-4 • नीतिसूत्रे 19:14; नीतिसूत्रे 31:10,11,23,28 • मलाखी 2:14-16 • मत्तय 19:4-6 • 1 करिंथ 7:3-5,10-11; 1 करिंथ 11:3 • इफिसकरांस पत्र 5:23-33 •कलस्सै 3:19 • 1 तीमथ्य 5:4 • 1 पेत्र 3:7

## आनंद (दुःख, दुःखावर मात करणे)

• नहेम्या 8:10 • स्तोत्रसंहिता 5:11; स्तोत्रसंहिता 16:11; स्तोत्रसंहिता 30:5; स्तोत्रसंहिता 32:11; स्तोत्रसंहिता 33:1,3,21; स्तोत्रसंहिता 35:9; स्तोत्रसंहिता 43:4; स्तोत्रसंहिता 126:5,6 • यशया 12:3; यशया 29:19; यशया 51:11; यशया 61:3,7•हबक्कूक 3:17,18 • मत्तय 5:12 • योहान 16:22-24; योहान 17:13 • प्रेषितांची कृत्ये 13:52 • रोमकरांस पत्र 14:17; रोमकरांस पत्र 15:13 •गलतीकरांस पत्र 5:22-23 • फिलिप्पैकरांस पत्र 4:4 • कलस्सै 1:11 • 1 थेस्सलनीकाकरांस 1:6; 1 थेस्सलनीकाकरांस 5:16-18 • इब्री 1:9 • याकोब 1:2,3 • 1 पेत्र 1:8,9; 1 पेत्र 4:12-14 • 1 योहान 1:4

## जमीन आणि मालमत्तेच्या बाबी

• अनुवाद 28:8,11,12 • स्तोत्रसंहिता 16:5; स्तोत्रसंहिता 37:29; स्तोत्रसंहिता 125:3 • मार्क 10:29,30

## कायदेशीर आव्हाने

• अनुवाद 10:18; अनुवाद 28:7 • स्तोत्रसंहिता 3; स्तोत्रसंहिता 12:5; स्तोत्रसंहिता 37:6,28; स्तोत्रसंहिता 72:14; स्तोत्रसंहिता 89:14; स्तोत्रसंहिता 103:6; स्तोत्रसंहिता 119:121; स्तोत्रसंहिता 140:12;

स्तोत्रसंहिता 146:7 • यशया 28:5,6; यशया 54:14,17

## दीर्घायुष्य

• उत्पत्ती 6:3 • निर्गम 23:25,26 • अनुवाद 34:7 • ईयोब 5:26 • स्तोत्रसंहिता 34:12-14; स्तोत्रसंहिता 71:5-9,17,18; स्तोत्रसंहिता 90:10-12; स्तोत्रसंहिता 91:14-16; स्तोत्रसंहिता 92:12-15; स्तोत्रसंहिता 103:15-17; स्तोत्रसंहिता 128:1,6 •नीतिसूत्रे 3:1,2; नीतिसूत्रे 17:6 • यशया 46:4 •2 करिंथ 4:16-18; 2 करिंथ 5:1-9 • फिलिप्पैकरांस पत्र 1:21 •2 तीमथ्य 4:7-8

## प्रेम

• मार्क 12:29-31 • योहान 13:34-35 • रोमकरांस पत्र 5:5; रोमकरांस पत्र 12:9-21; रोमकरांस पत्र 13:8 • 1 करिंथ 13:1-13 •गलतीकरांस पत्र 5:22,23 •इफिसकरांस पत्र 4:31,32; इफिसकरांस पत्र 5:1,2 • कलस्सै 3:12-14 •1 थेस्सलनीकाकरांस 4:9,10 •1 तीमथ्य 1:5 • इब्री 6:10 • 1 योहान 2:9-11; 1 योहान 3:14-18; 1 योहान 4:7-12,16-21 • यहूदा 1:20,21

## मन

• 1 इतिहास 28:9 • ईयोब 38:36 • स्तोत्रसंहिता 26:2; स्तोत्रसंहिता 19:7,14; स्तोत्रसंहिता 23:3; स्तोत्रसंहिता 35:9; स्तोत्रसंहिता 42:5,6,11; स्तोत्रसंहिता 62:1,5; स्तोत्रसंहिता 94:19; स्तोत्रसंहिता 103:1,2; स्तोत्रसंहिता 131:2; स्तोत्रसंहिता 138:3; स्तोत्रसंहिता 139:2 •यशया 26:3,9; यशया 55:7-9 • विलापगीत 3:21-23 • मत्तय 5:28; मत्तय 15:18,19 • मार्क 12:30 • रोमकरांस पत्र 8:5-8; रोमकरांस पत्र 12:1,2,16; रोमकरांस पत्र 14:5 • 1 करिंथ 2:16 • 2 करिंथ 10:3-5 • इफिसकरांस पत्र 4:23,24 •फिलिप्पैकरांस पत्र 2:3,5-8,15; फिलिप्पैकरांस पत्र 3:12-15; फिलिप्पैकरांस पत्र 4:8 •कलस्सै 3:2,3 • 1 थेस्सलनीकाकरांस 5:23 • 2 तीमथ्य 1:7 • इब्री

4:12; इब्री 8:10 • 1 पेत्र 2:11; 1 पेत्र 4:1 • याकोब 1:21 • 3 योहान 2

## शांती (भीती, अस्वस्थता, काळजी यावर मात करणे)

• शास्ते 6:23,24 • स्तोत्रसंहिता 4:8; स्तोत्रसंहिता 37:11,37; स्तोत्रसंहिता 119:165 •यशया 9:6-7; यशया 26:3,12; यशया 32:17,18; यशया 48:17,18; यशया 53:5; यशया 54:10,13; यशया 55:12 • मत्तय 5:9 • योहान 14:27; योहान 16:33 • रोमकरांस पत्र 5:1; रोमकरांस पत्र 8:6; रोमकरांस पत्र 12:18; रोमकरांस पत्र 14:17-19; रोमकरांस पत्र 15:13,33; रोमकरांस पत्र 16:20 •1 करिंथ 1:3; 1 करिंथ 14:33 • 2 करिंथ 13:11 • गलतीकरांस पत्र 5:22,23 • फिलिप्पैकरांस पत्र 4:6-9 • 2 थेस्सलनीकाकरांस 3:16 • इब्री 12:14

## प्रोत्साहन

• अनुवाद 28:13 • ईयोब 8:6-7 • स्तोत्रसंहिता 37:4,5; स्तोत्रसंहिता 75:6,7 •नीतिसूत्रे 16:3; नीतिसूत्रे 22:4,29; •यशया 1:19; यशया 48:17; यशया 54:1-3; यशया 60:22 • योहान 15:5 • 1 तीमथ्य 6:17

## समृद्धी आणि यश

• उत्पत्ती 26:12; उत्पत्ती 39:2,3,23 • अनुवाद 29:9; अनुवाद 30:5 • यहोशवा 1:7-8 • 1 राजे 2:3 • 2 इतिहास 20:20; 2 इतिहास 26:5; 2 इतिहास 31:21 •नहेम्या 2:20 • ईयोब 8:6,7; ईयोब 36:10,11 • स्तोत्रसंहिता 1:1-3; स्तोत्रसंहिता 25:12,13; स्तोत्रसंहिता 35:27; स्तोत्रसंहिता 118:25 • नीतिसूत्रे 28:25 •जखऱ्या 8:12 • 3 योहान 1:2

(आशीर्वाद आणि आशीर्वादित होणे देखील पहा)

## संरक्षण

• स्तोत्रसंहिता 3:3-6; स्तोत्रसंहिता 27:1-5; स्तोत्रसंहिता 32:7; स्तोत्रसंहिता 34:4,7,17,19; स्तोत्रसंहिता 50:15; स्तोत्रसंहिता 91:10-12; स्तोत्रसंहिता 121:1-8 • नीतिसूत्रे 19:23; नीतिसूत्रे 21:31 • यशया

54:14,15,17; यशया 59:19

## तरतुदी

• उत्पत्ती 22:13,14 • स्तोत्रसंहिता 23:1-6; स्तोत्रसंहिता 34:9,10; स्तोत्रसंहिता 37:25; स्तोत्रसंहिता 84:11 • मत्तय 6:31-33 • 2 करिंथ 9:6-8 •फिलिप्पैकरांस पत्र 4:19

## शांतता

• स्तोत्रसंहिता 131:2 • यशया 30:15; यशया 32:17,18 • विलापगीते 3:26 • सफन्या 3:17 •1 थेस्सलनीकाकरांस 4:11 • 2 थेस्सलनीकाकरांस 3:11,12 • 1 पेत्र 3:3,4

## मृतांना जिवंत करणे

• 1 राजे 17:17-24 • 2 राजे 4:32-37; 2 राजे 13:20,21 •मत्तय 10:7,8; मत्तय 11:4,5 • मार्क 5:35-43 •लूक 7:11-17 • योहान 11:38-45 • प्रेषितांची कृत्ये 9:36-42; प्रेषितांची कृत्ये 14:19,20; •प्रेषितांची कृत्ये 20:9,10; प्रेषितांची कृत्ये 26:8 • रोमकरांस पत्र 4:17 • इब्री 11:35

## झोप

• स्तोत्रसंहिता 4:8; स्तोत्रसंहिता 16:7; स्तोत्रसंहिता 127:2 • नीतिसूत्रे 3:24; नीतिसूत्रे 6:22-23

## आत्म्याने भरलेले आणि आत्म्याने चालणारे

• मत्तय 4:1 • योहान 16:13-15 • प्रेषितांची कृत्ये 5:32; प्रेषितांची कृत्ये 8:29; प्रेषितांची कृत्ये 10:19,20; प्रेषितांची कृत्ये 13:2,3; प्रेषितांची कृत्ये 15:28,29; प्रेषितांची कृत्ये 16:6-10; प्रेषितांची कृत्ये 18:5; प्रेषितांची कृत्ये 19:21; प्रेषितांची कृत्ये 20:22-23; प्रेषितांची कृत्ये 21:4,10,11; •रोमकरांस पत्र 8:1,2,13-17 •2 करिंथ 13:14

• गलतीकरांस पत्र 5:16-26 • इफिसकरांस पत्र 4:30; इफिसकरांस पत्र 5:17-21 • 1 थेस्सलनीकाकरांस 5:19

## सामर्थ्य

• निर्गम 15:2 • अनुवाद 33:25 • 1 शमुवेल 30:6 •2 शमुवेल 22:33 • स्तोत्रसंहिता 27:1,14; स्तोत्रसंहिता 31:24; स्तोत्रसंहिता 46:1-3; स्तोत्रसंहिता 73:26 • यशया 11:2; यशया 28:5,6; यशया 40:28-31; यशया 41:10 • 2 करिंथ 12:9 •इफिसकरांस पत्र 3:16; इफिसकरांस पत्र 6:10 •फिलिप्पैकरांस पत्र 4:13 •कलस्सै 1:11

## पत्नी

• नीतिसूत्रे 12:4; नीतिसूत्रे 14:1; नीतिसूत्रे 31:10-31 •1 करिंथ 7:2-4,10,11 • इफिसकरांस पत्र 5:22-24,33; • कलस्सै 3:18 • तीत 2:1-5; 1 पेत्र 3:1-6

## ज्ञान आणि समज

• उत्पत्ती 41:38,39 • निर्गम 31:1-5; निर्गम 35:30-35; निर्गम 36:1 • 1 इतिहास 28:11,12,19 • 1 राजे 4:29 •ईयोब 12:13; ईयोब 28:20,28; ईयोब 32:8 • स्तोत्रसंहिता 18:28; स्तोत्रसंहिता 25:14; स्तोत्रसंहिता 51:6; स्तोत्रसंहिता 111:10; स्तोत्रसंहिता 112:5; स्तोत्रसंहिता 119:97-99,130 • नीतिसूत्रे 2:6; नीतिसूत्रे 3:32; नीतिसूत्रे 4:5-9; नीतिसूत्रे 8:11-21; नीतिसूत्रे 20:27 •यशया 11:1,2; यशया 28:23-29; यशया 29:24; यशया 40:28 •यिर्मया 51:15 • दानीएल 1:17; दानीएल 2:20-22,28; दानीएल 5:12-14 • लूक 24:45 • 1 करिंथ 2:9-12 •याकोब 1:5

# आमच्यात ऑनलाइन सहभागी व्हा

## (JOIN US ONLINE)

### इंग्रजी

### (ENGLISH)

https://youtube.com/allpeopleschurchbangalore
https://instagram.com/allpeopleschurchbangalore
https://facebook.com/apcwo

https://youtube.com/apcbiblecollege
https://instagram.com/apcbiblecollege

https://youtube.com/APCMusicindia

https://www.youtube.com/@apc-free-christian-books

https://youtube.com/@chrysalislifecounseling

https://instagram.com/ChrysalisLifeCounseling

### हिंदी

### (HINDI)

https://youtube.com/APCHindi

https://www.instagram.com/apc_bangalore_hindi

# आपणास माहीत आहे का की देव आपणावर प्रीती करतो?

सुमारे 2000 वर्षांपूर्वी, देव मानव म्हणून या जगात आला. त्याचे नाव येशू आहे. तो सिद्ध पापरहित जीवन जगला. येशू हा देहधारी परमेश्वर होता, म्हणून जे काही त्याने म्हटले आणि केले, त्याद्वारे त्याने देवास आमच्यावर प्रगट केले. तो जी वचने बोलला, तो देवाची वचने बोलला. त्याने जी कार्ये केली, ती देवाची कार्ये होती. येशूने पृथ्वीवर अनेक चमत्कार केले. त्याने रोग्यांस व क्लेशितांस बरे केले. त्याने आंधळ्यांचे डोळे उघडले, लंगड्यांस चालविले आणि प्रत्येक प्रकारचे रोग व आजार त्याने बरे केले. भाकरीच्या तुकड्यास आश्चर्यजनकरित्या बहुगुणित करून त्याने भुकेल्यास अन्न दिले, वादळ शांत केले आणि इतर अनेक अद्‌त गोष्टी केल्या.

**ह्या सर्व गोष्टी आम्हास प्रगट करतात की देव चांगला परमेश्वर आहे ज्याची इच्छा आहे की लोकांनी बरे, स्वस्थ, आरोग्यसंपन्न आणि आनंदित असावे. देव लोकांच्या गरजा पूर्ण करू इच्छितो.**

तर, देवाने मनुष्य बनण्याचा आणि आमच्या जगात प्रवेश करण्याचा निर्णय का घ्यावा? येशू का आला?

आम्ही सर्वांनी पाप केले आहे आणि अशा गोष्टी केल्या आहेत ज्या आम्हास उत्पन्न करणाऱ्या देवासमोर अमान्य आहेत. पापाचे परिणाम आहेत. पाप हे देव आणि मानवातील एका मोठ्या भिंतीसारखे आहे जी पार करता येत नाही. पाप हे आम्हास देवापासून वेगळे करते. ज्याने आम्हास उत्पन्न केले आहे त्यास जाणण्याच्या आणि त्याच्यासोबत अर्थपूर्ण नाते स्थापन करण्याच्या मार्गात ते आम्हास अडखळण आणते. म्हणून, आमच्यापैकी कित्येक जण इतर गोष्टींनी हे रिक्त स्थान भरून टाकण्याचा प्रयत्न करतात.

आमच्या पापांचा दुसरा परिणाम देवापासून सदाकाळसाठी अलग होणे होय. देवाच्या न्यायालयात, पापाचे वेतन मरण आहे. मृत्यू देवापासून दूर नरकात सार्वकालिक ताटातूट आहे.

पण, सुवार्ता ही आहे की आपण पापांपासून मुक्त राहू शकतो आणि देवाशी पुन्हा नाते स्थापन करू शकतो. बायबल म्हणते, ***"पापाचे वेतन मरण आहे, पण देवाचे कृपादान आपल्या प्रभु येशू ख्रिस्तामध्ये सार्वकालिक जीवन आहे"* (रोमकरांस पत्र 6:23).** येशूने जेव्हा वधस्तंभावर आपला प्राण दिला, तेव्हा त्याने संपूर्ण जगाच्या पापांची किंमत चुकविली, मग तीन दिवसानंतर तो पुन्हा जीवंत झाला, त्याने अनेकांस स्वतःला जीवंत दाखविले आणि मग तो स्वर्गास परतला.

देव प्रीती आणि दयेचा देव आहे. त्याची अशी इच्छा नाही की कोणीही व्यक्तीने नरकात नाश व्हावे. म्हणून तो संपूर्ण मानवजातीस पापापासून आणि त्याच्या स्थायी परिणामांपासून मुक्त होण्याचा मार्ग दाखवावयास आला. तो पाप्यांस तारावयास—आपल्यासारख्या आणि माझ्यासारख्या लोकांस पापापासून आणि सार्वकालिक मृत्यूपासून वाचवावयास आला.

पापांची ही विनामूल्य क्षमा प्राप्त करण्यासाठी, बायबल आम्हास सांगते की आम्ही फक्त एक गोष्ट केली पाहिजे—प्रभु येशू ख्रिस्ताने वधस्तंभावर जे काही केले त्याचा स्वीकार करणे आणि संपूर्ण अंतःकरणाने त्याच्याठायी विश्वास धरणे.

***"त्याच्यावर विश्वास ठेवणाऱ्या प्रत्येकाला त्याच्या नावाने क्षमा मिळेल अशी साक्ष सर्व संदेष्टे त्याच्याविषयी देतात"* (प्रेषितांची कृत्ये 10:43).**

***"की येशू प्रभु आहे असे जर तू आपल्या मुखाने कबूल करशील आणि देवाने त्याला मेलेल्यांतून उठविले असा आपल्या अंतःकरणात विश्वास ठेवशील तर तुझे तारण होईल"* (रोमकरांस पत्र 10:9).**

जर आपण प्रभु येशू ख्रिस्ताठायी विश्वास ठेवला, तर आपण देखील पापांपासून क्षमा प्राप्त करू शकता आणि शुद्ध होऊ शकता.

प्रभु येशू ख्रिस्तामध्ये आणि वधस्तंभावर त्याने आपणासाठी जे काही केले आहे त्याच्यावर विश्वास करण्याचा निर्णय घेण्यात आपली मदत करण्यासाठी खाली एक सोपी प्रार्थना दिलेली आहे. येशूने आपणासाठी काय केले आहे त्याचा स्वीकार व्यक्त करण्यात आणि आपल्या पापांपासून शुद्धता प्राप्त करण्यात ही प्रार्थना आपली मदत करील. ही प्रार्थना केवळ एक मार्गदर्शक आहे. आपण आपल्या शंब्दांत देखील प्रार्थना करू शकता.

*प्रिय प्रभु येशू, आज मला कळले की वधस्तंभावर तू माझ्यासाठी काय केले. तू माझ्यासाठी मरण पत्करलेस: तू तुझे बहुमूल्य रक्त वाहिलेस आणि माझ्या पापांचा दंड चुकविलास, यासाठी की मला क्षमा प्राप्त व्हावी. बायबल मला सांगते की जो कोणी तुजवर विश्वास ठेवील, त्याला त्याच्या पापांची क्षमा केली जाईल.*

*आज, मी तुजवर विश्वास ठेवण्याचा निर्णय घेतो आणि वधस्तंभावर माझ्यासाठी मरण पत्करून व पुन्हा मेलेल्यांतून जीवंत होऊन तू जे काही माझ्यासाठी केलेस, त्याचा मी स्वीकार करतो. मी जाणतो की माझ्या सत्कृत्यांद्वारे मी स्वतःचे तारण साध्य करू शकत नाही, इतर कोणीही मनुष्य माझे तारण घडवून आणू शकत नाही. मी माझ्या पापांची क्षमा कमवू शकत नाही.*

*आज, मी आपल्या अंतःकरणात विश्वास धरतो आणि माझ्या मुखाने हे कबूल करतो की तू मजसाठी मरण पत्करलेस, तू माझ्या पापांची किंमत चुकविलीस, तू पुन्हा मेलेल्यांतून उठलास, आणि तुझ्यावरील विश्वासाद्वारे, मला माझ्या पापांची क्षमा आणि शुद्धता प्राप्त होते.*

*येशू, मी तुझे उपकार मानतो. तुजवर प्रीती करण्यात, तुला आणखी जाणून घेण्यात, आणि तुझ्याप्रत विश्वासू राहण्यात माझी मदत कर.*

*आमेन.*

# ऑल पीपल्स चर्च विषयी

बँगलोर शहरात मीठ आणि प्रकाश ठरावे, आणि भारत देशात तसेच संपूर्ण जगातील राष्ट्रांत एक आवाज़ बनणे हा ऑल पीपल्स चर्च (एपीसी) चा दृष्टांत आहे.

ऑल पीपल्स चर्च ही एक **येशूवर प्रीती करणारी, वचनावर केंद्रित, आत्म्याने भरलेली**, कौटुंबिक मंडळी, सुसज्जीकरण केंद्र, मिशन ठिकाण आणि जागतिक सुवार्ता केन्द्र आहे.

- एक **कौटुंबिक चर्च** म्हणून, आम्ही ख्रिस्त केंद्रित सहभागित्वामध्ये एक समुदाय म्हणून एकत्र वाढतो, देवाची मंडळी म्हणून प्रेमाने एकमेकांची काळजी घेतो आणि सेवा करतो.
- एक **सुसज्जीकरण केंद्र** म्हणून, आम्ही प्रत्येक विश्वासणाऱ्याला विजयाने जगण्यासाठी, ख्रिस्ताच्या समानतेमध्ये परिपक्व होण्यासाठी आणि त्यांच्या जीवनासाठी देवाचे हेतू पूर्ण करण्यासाठी सक्षम आणि सुसज्ज करतो.
- एक **मिशन स्थळ** म्हणून, आम्ही देवाच्या वचनाद्वारे आणि पवित्र आत्म्याच्या सामर्थ्याच्या अलौकिक प्रकटीकरणाद्वारे येशू ख्रिस्ताच्या संपूर्ण सुवार्तेसह आमच्या शहरास, राष्ट्रास आणि राष्ट्रांना आशीर्वादित करण्यासाठी अर्थपूर्ण सेवेत सहभागी होतो.
- एक **जागतिक सुवार्ता केंद्र** म्हणून, आम्ही धार्मिक पुढाऱ्याचे आणि आत्म्याने भरलेल्या मंडळ्यांचे पालनपोषण करून स्थानिक आणि जागतिक स्तरावर सेवा करतो, जेणेकरून त्यांना देवाच्या राज्यासाठी त्यांच्या क्षेत्रांवर प्रभाव टाकता यावा.

एपीसी मध्ये, आम्ही देवाचे संपूर्ण वचन कुठल्याही प्रकारची तडजोड न करता, पवित्र आत्म्याच्या अभिषेकाने व प्रकटीकरणाने सादर करण्याप्रत वचनबद्ध आहोत. आमचा विश्वास आहे की उत्तम संगीत, रचनात्मक सादरीकरण, बुद्धिमत्तापूर्ण तत्वसमर्थन, समकालीन सेवाकार्याच्या पद्धती, आधुनिक तंत्रज्ञान इत्यादी गोष्टी पवित्र आत्म्याची चिन्हे, चमत्कार, अद्‍त कार्ये, आणि पवित्र आत्म्याच्या कृपादानांद्वारे वचनाची घोषणा करण्याच्या देवाने नेमलल्या पद्धतीची जागा घेऊ शकत नाहीत (1 करिंथ 2:4,5; इब्री 2:3,4). आमचा विषय येशू आहे, आमची विषयवस्तु वचन आहे, आमची पद्धत पवित्र आत्म्याचे सामर्थ्य आहे, आमचा आवेश लोक आहेत, आणि आमचे ध्येय ख्रिस्तासमान परिपक्वता आहे.

आमचे मुख्यालय बँगलोर येथे आहे, पण ऑल पीपल्स चर्चच्या भारतात कित्येक ठिकाणी शाखा आहेत. ऑल पीपल्स चर्चची वर्तमान यादी आणि संपर्क सूचना यासाठी आमच्या संकेतस्थळास भेट द्यावी **apcwo.org/locations** किंवा या पत्त्यावर ई-मेल पाठवावा **contact@apcwo.org.**

# विनामूल्य प्रकाशने

A Church in Revival
A Real Place Called Heaven
A Time for Every Purpose
Ancient Landmarks
Baptism in the Holy Spirit
Being Spiritually Minded and Earthly Wise
Biblical Attitude Towards Work
Breaking Personal and Generational Bondages
Change
Code of Honor
Divine Favor
Divine Order in the Citywide Church
Don't Compromise Your Calling
Don't Lose Hope
Equipping the Saints
Foundations (Track 1)
Fulfilling God's Purpose for Your Life
Gifts of the Holy Spirit
Giving Birth to the Purposes of God
God Is a Good God
God's Word—The Miracle Seed
How to Help Your Pastor
Integrity
Interpreting Scripture
Kingdom Builders
Laying the Axe to the Root
Living Life Without Strife
Marriage and Family
Ministering Healing and Deliverance
Offenses—Don't Take Them
Open Heavens
Our Redemption
Receiving God's Guidance
Revivals, Visitations and Moves of God
Shhh! No Gossip!
Speak Your Faith
The Conquest of the Mind
The End Times
The Father's Love
The House of God
The Kingdom of God
The Mighty Name of Jesus
The Night Seasons of Life
The Power of Commitment
The Presence of God
The Redemptive Heart of God
The Refiner's Fire
The Spirit of Wisdom, Revelation and Power
The Wonderful Benefits of Praying in Tongues
Timeless Principles for the Workplace
Understanding the Prophetic
Water Baptism
We Are Different
Who We Are in Christ
Women in the Workplace
Work—Its Original Design

नवीन पुस्तके नियमितपणे प्रकाशित केली जातात. PDF, ऑडियो तसेच इतर स्वरूपात विनामूल्य ऑल पीपल्स चर्च पुस्तके डाऊनलोड करण्यासाठी कृपा करून **apcwo.org/books** या संकेतस्थळास भेट द्यावी. यापैकी अनेक पुस्तके इतर भाषांतही उपलब्ध आहेत. तसेच, विनामूल्य ऑडियो आणि विडियो संदेश, संदेशाचे नोट्स टी.वी. कार्यक्रम आणि इतर अनेक सामुग्रींसाठी आमच्या संकेतस्थळास भेट द्यावी: **apcwo.org/sermons.**

# क्रिसलिस कॉउंसलिंग

क्रिसलिस कॉउंसलिंग लोकांना जीवनातील आव्हानांना तोंड देण्यासाठी आणि त्यावर मात करण्यासाठी वैयक्तिक सल्ला देते. क्रिसलिस कॉउंसलिंग हा व्यावसायिक, प्रशिक्षित आणि अनुभवी ख्रिस्ती सल्लागारांचा संघ आहे.

आमच्या सेवा सर्व वयोगटांसाठी आहेत आणि जीवनातील अनेक आव्हानांना सामोरे जातात.

- **किशोरवयीन मुलांसाठी**
- **वैयक्तिक सल्ला**
- **नातेसंबंधांशी संबंधित आव्हाने**
- **शैक्षणिक क्षेत्रात यशाची उणीव**
- **कामाशी संबंधित समस्या**
- **कुटुंब / संपत्ती / विवाहपूर्व वैवाहिक**
- **पालक / मुले /भावंडे / समवयस्क**
- **वर्तणूक विकार**
- **व्यक्तिमत्व विकार**
- **मानसिक / भावनिक अडचणी**
- **तणाव / आघात**
- **मद्यपान / अमली पदार्थांचे सेवन**
- **आध्यात्मिक समस्या**
- **लाईफ कोचिंग**

क्रिसलिस कॉउंसलिंग सेवांसाठी शुल्क परवडणारे आणि प्रवेशयोग्य आहेत.

आमच्या प्रशिक्षित सल्लागारांसोबत भेटीची वेळ निश्चित करण्यासाठी

**वेबसाईट : chrysalislife.org**
**फोन :** +91-80-25452617 किंवा टोल-फ्री (भारतांतर्गत) 1-800-300-00998
**ई-मेल : counselor@chrysalislife.org**

क्रिसलिस कॉउंसलिंग ही ऑल पीपल्स चर्च आणि वर्ल्ड आऊटरीचची सेवा आहे.

# ऑल पीपल्स चर्चसोबत भागिदारी

ऑल पीपल्स चर्च स्थानिक मंडळ्यांच्या रूपात संपूर्ण भारत देशात, विशेषतः उत्तर भारतात सुवार्ता गाजवीत आपल्या सरहद्दीपलीकडे सेवा करीत आहे. त्याचे विशेष ध्येय (अ) पुढाऱ्यास स्थिर करणे, (आ) तरूणांस सेवेसाठी सुसज्ज करणे आणि (इ) ख्रिस्ताच्या मंडळीची वाढ करणे आहे. तरूणांसाठी प्रशिक्षण सम्मेलन, 'ख्रिस्ती पुढाऱ्यासाठी सभांचे' संपूर्ण वर्षभर आयोजन केले जाते. याशिवाय, पुस्तकांच्या कित्येक हजारो प्रतींचे इंग्रजी आणि इतर अनेक भारतीय भाषांत विनामूल्य वितरण केले जाते, त्यामागे हेतू हा आहे की विश्वासणाऱ्यास वचन आणि आत्म्यात वाढ करून द्यावी.

आम्ही आपणास निमंत्रण देतो की एका वेळेचे दान पाठवून किंवा मासिक आर्थिक दान पाठवून आर्थिकरित्या आमच्यासोबत भागिदारी करावी. संपूर्ण राष्ट्रात हे कार्य करता यावे म्हणून जी दानराशी आपण पाठवू शकता, त्यासाठी आम्ही आपले आभारी राहू.

आपण आपल्या देणग्या चेक / बैंक ड्राफ्टच्या द्वारे "All Peoples Church" बँगलोरच्या नावावर आमच्या कार्यालयाच्या पत्त्यावर पाठवू शकता किंवा खालील माहितीच्या आधारे आमच्या बँक खात्यात टाकू शकता:

**बँक खात्याचे नाव:** All Peoples Church
**बँक खाते क्रमांक:** 50200068829058
**IFSC क्रमांक:** HDFC0004367
**बँक:** HDFC Bank, 7M/308 80 Ft Rd, HRBR Layout, Kalyan Nagar, Bengaluru, Karnataka - 560043

***कृपया लक्षात ठेवा:*** *ऑल पीपल्स चर्च केवळ भारतीय नागरिकांच्या बँकेद्वारे मिळालेली देणगी स्वीकार करू शकते. आपली इच्छा असल्यास, आपली देणगी पाठवीत असतांना, स्पष्टपणे लिहा की आपण एपीसी सेवेच्या कोणत्या क्षेत्रासाठी दान पाठवू इच्छिता. अतिरिक्त माहितीसाठी कृपया या स्थळास भेट द्यावी* **apcwo.org/give.**

त्याचप्रमाणे, आमच्यासाठी व आमच्या सेवाकार्यासाठी शक्य तेव्हा प्रार्थना करणे विसरता कामा नये.

**धन्यवाद आणि परमेश्वर देव आपणास आशीर्वादित करो!**

## DOWNLOAD THE FREE APP!

*Search for*

"All Peoples Church Bangalore"
in the App or Google play stores.

Available on the App Store

ANDROID APP ON Google play




*A daily 5-minute video devotional.*
*A daily Bible reading and prayer guide.*
*5-minute Sermon summary.*
*Toolkit with Scriptures on various topics to build faith and information to share the Gospel.*
*Resources with sermons, sermon notes, TV programs, books, music and more.*

*IF YOU LOVE IT, TELL OTHERS ABOUT IT!*

# निःशुल्क ऐप डाउनलोड करें:

**ऐप स्टोर या प्ले स्टोर में खोजें**
**“ऑल पीपुल्स चर्च (APCWO)”/**
**All Peoples Church Hindi**

Available on the App Store

ANDROID APP ON Google Play




*विश्वास को मजबूत करने और सुसमाचार साझा करने के लिए विभिन्न विषयों पर आधारित वचनों के टूलकिट।*
*उपदेशों, टीवी कार्यक्रमों, पुस्तकों, संगीत और बहुत कुछ से भरे संसाधन।*
*अगर आपको यह पसंद आए, तो*
***दूसरों को भी इसके बारे में बताएं!***

# ऑल पीपल्स चर्च बायबल कॉलेज

**apcbiblecollege.org**

ऑल पीपल्स चर्च बाइबल कॉलेज आणि सेवा प्रशिक्षणकेंद्र भारताच्या बँगलोरमध्ये आत्म्याने परिपूर्ण, अभिषिक्त, सक्रिय सेवेत सहभागी प्रशिक्षणआणि सिद्धांताच्या दृष्टीने योग्य व परमेश्वराच्या वचनाच्या बौद्धिक दृष्टीने प्रेरणादायक अभ्यासासह पवित्र आत्म्याच्या अलौकिक सामर्थ्यात विद्यार्थ्यांस सेवेसाठी तयार करते. आम्ही सेवेसाठी संपूर्ण व्यक्तिमत्त्वाच्या विकासावर विश्वास ठेवतो. तसेच या प्रशिक्षणात ईश्वरीय चारित्र्य, परमेश्वराच्या वचनाचा गंभीर पाया, आणि चिन्ह, चमत्कार व अद्‌भुत कृत्ये यावर जोर दिला जातो—सर्वकाही प्रभुच्या निकट सान्निध्यात प्रवाहित होते.

ऑल पीपल्स चर्च बाइबल कॉलेज (एपीसी-बीसी) मध्ये, योग्य शिक्षणाशिवाय, आम्ही प्रत्यक्षपणे देवाचे प्रेम, अभिषेक आणि पवित्र आत्म्याचे सान्ध्यि आणि देवाच्या अलौकिक कार्यावर जोर देतो. अनेक तरूण स्त्रीपुरुषांनी हे प्रशिक्षण घेतले आहे आणि त्यांच्या आयुष्यात देवाचे पाचारण पूर्ण करण्यासाठी त्यांना सेवेत पाठविण्यात आले आहे.

पुढील तीन पदव्या दिल्या आहेत,

- मध्ये एक वर्षांचा प्रमाणपत्र अभ्यासक्रम थिओलॉजी अँड ख्रिश्चन मिनिस्ट्री (C.Th.)
- मध्ये दोन वर्षांचा डिप्लोमा अभ्यासक्रम थिओलॉजी अँड ख्रिश्चन मिनिस्ट्री (Dip.Th.)
- मध्ये तीन वर्षांचा स्नातक अभ्यासक्रम थिओलॉजी अँड ख्रिश्चन मिनिस्ट्री (B.Th.)

वर्ग प्रत्येक आठवड्याच्या दिवशी, **सोमवार ते शुक्रवार भारतीय वेळ (UTC+5:30) सकाळी 9 ते दुपारी 12** पर्यंत चालविले जातात. आम्ही तीन शिक्षण पर्याय देऊ करतो

**ऑन-कॅम्पस :** कॅम्पसमध्ये वैयक्तिकरित्या वर्गांना उपस्थित रहा
**ऑनलाइन :** ऑनलाइन प्रत्यक्ष व्याख्यानांना उपस्थित रहा
**ई-लर्निंग :** ऑनलाइन पोर्टल **apcbiblecollege.org/elearn** द्वारे स्वतःच्या गतीने शिकणे.

**ऑनलाइन अर्ज,** करण्यासाठी आणि कॉलेज, अभ्यासक्रम, पात्रता निकष, शिकवणी खर्च आणि अर्ज डाउनलोड करण्यासाठी अधिक माहितीकरिता, कृपया या संकेतस्थळास भेट द्या **apcbiblecollege.org.**

आम्हास माहीत आहे की देव त्याच्या वचनाद्वारे कार्य करतो. अशा प्रकारे त्याने सर्व काही निर्माण केले—आपल्या वचनाद्वारे प्रकट झालेल्या त्याच्या सामर्थ्याने. देवाचे वचन देवाच्या जीवनाचे आणि सामर्थ्याचे वाहक आहे जे आमच्या जीवनाच्या प्रत्येक पैलूवर प्रभाव पाडू शकते. देवाने आपल्याला त्याचे वचन दिले आहे आणि त्याच्या वचनाच्या सामर्थ्याद्वारे तो आपल्यामध्ये कार्य करू इच्छितो. त्याने आमच्यावर प्रगट केले आहे की त्याचे वचन कसे ग्रहण करावे यासाठी की त्याच्या वचनात समाविष्ट जीवन आणि सामर्थ्य आमच्यामध्ये प्रकट केले जावे ज्याद्वारे आमच्याठायी त्याचे अलौकिक कार्य घडून यावे. हे खरे आहे की देव, त्याच्या पवित्र आत्म्याच्या सामर्थ्याद्वारे चिन्हे आणि अद्‌भुत कृत्यांद्वारे अद्‌भुतरित्या त्याचे कार्य प्रगट करतो, तरीही आपण हे विसरता कामा नये की देव त्याच्या वचनाद्वारे देखील कार्य करतो. देवाचा आत्मा देवाच्या वचनाद्वारे त्याचे सामर्थ्य मुक्त करतो. देवाचे वचन वाचण्याची, त्यावर मनन करण्याची आणि ते आमच्या जीवनात ग्रहण करण्याची प्रक्रिया जरी अद्‌भुत नसली तरी ती कमी अलौकिक नसते कारण यात कार्य करणारा परमेश्वर आहे. अनेक विश्वासणारे देवाच्या अलौकिक कार्याचा अनुभव घेण्यापासून वंचित राहतात कारण देव आपल्या वचनाद्वारे त्यांच्या दैनंदिन जीवनात ते प्रकट करण्याची इच्छा बाळगतो; पण ते चमत्कारांच्या मागे धावतात.

**All Peoples Church & World Outreach**
# 319, 2nd Floor, 7th Main, HRBR Layout,
2nd Block, Kalyan Nagar, Bangalore 560 043
Karnataka, INDIA

Phone: +91-80-25452617
Email: contact@apcwo.org
Website: apcwo.org